
शनिवार । १८ एप्रिल १९८१ । एक रुपया

# माणूस

जात्रट, जैलवाडी, बेनाडी, सौंदलगा, नागनूर....



## निपाणीचे हत्याकांड कुणी घडविले?

....माणसं दोन-दोन, तीन-तीन वाक्यं बोलत होती; पण त्यांच्यामध्ये वक्तृत्वाच्या धबधब्यानेही फुलवता येणार नाहीत असे रोमांच फुलवण्याचं सामर्थ्य होतं....

समक्ष भेटीवर आधारित वृत्तान्त....

# स. न. वि. वि.

□ २८ मार्च १९८१ च्या अंकातील 'संध्याकाळचे पुणे' ह्या सदरात श्री. दि. बा. मोकाशी ह्यांच्या 'अंडे आणि अण्णा सबनीस' ह्या लेखावर ह्या विषयाचा एक अभ्यासक ह्या नात्याने हे विचार मांडीत आहे. कोंबड्या पाळण्याच्या व्यवसायावर हे एक चांगले पुस्तक आहे, किंबहुना मराठी भाषेतील सर्वोत्तम पुस्तक आहे, हे प्रथम कबूल करावेच लागेल.

माझा व श्री. रा. सबनिसांचा परिचय नाही; पण त्यांचेविषयी माहिती वाचून, ते नुसतेच एक हरहुन्नरी व्यक्ती नसून, त्यांना साहित्याचीही चांगली जाण आहे, हे मला ठाऊक नव्हते. त्यांच्या ह्या लेखनकलेमुळे विषयाची मांडणी त्यांनी फारच सोपी व सहजपणे समजेल अशी केली आहे. त्यातील कोष्टके, परिशिष्टे, तक्ते, आकृत्या वगैरे विषयातही सहजपणा आहेच. अशा ह्या पुस्तकाच्या आजपर्यंत आठ आवृत्त्या निघाल्या, ह्याबद्दलही आनंद वाटला.

एक व्यवसाय म्हणून कोंबड्या पाळणे कितपत फलदायी ठरते ह्याचा मात्र आता विचार करावा लागणार आहे. श्री. सबनिसांनी परदेशात कशा प्रकारे कोंबड्यांचा धंदा आहे, त्या पद्धतीचे वर्णन केले आहे. ह्या धंद्याची निवड करताना अतिशय सावधपणा बाळगावा असेही त्यांनी लिहिले आहे; पण आज महाराष्ट्रात ह्या धंद्याची काय परिस्थिती आहे ?

ह्या समारंभातच माजी व आजी पशुसंवर्धनखात्याच्या प्रमुखांच्या भाषणांचेही उल्लेख आहेत. डॉ. फडके ह्यांचे तांत्रिक ज्ञान रोगसंशोधनापुरतेच मर्यादित होते; पण डॉ. मोकासदारांनी सांगितले की, 'पोल्ट्रीसाठी घेतलेले कर्ज सव्याज फेडणारे श्री. सबनीस हे एकमेव होत !'

महाराष्ट्रात ह्या धंद्यानिमित्त गेल्या वीस वर्षांत सुमारे दीड ते दोन कोट रुपये कर्ज दिले आहे, ह्या कर्जाच्या परतफेडीची परिस्थिती अत्यंत केविलवाणी आहे, हे या खात्याचे संचालकच सांगतात. हीच गोष्ट मांसल कोंबड्यासाठी दिलेल्या कर्जाची. सुमारे पंधरा-वीस वर्षांपूर्वी दोन-अडीच कोट रुपये खर्चून शासनाने पुण्यात सुरू केलेला कोंबड्या सोलण्याचा कारखाना काही वर्षेच जीव धरून चालला व आता गेल्या दोनएक वर्षांपासून तो गंजत पडला आहे !

सर्वच शेतकरी व कोंबड्यापालक कर्ज बुडवे व ठक आहेत असे म्हणणे धाडसाचे होईल. महाराष्ट्रात शासकीय योजना व कोंबड्यांचे फार्मही नुकसानीत चालतात ही परिस्थिती आहे. ह्या विषयावर १५-१२-८० च्या Indian Express मध्ये एक बातमी आहे, ती अशी—

'अंडे व कुक्कुटपालनव्यवसाय माहिती-केंद्राचे प्रमुख श्री. रवी चावला म्हणतात : एक अंडे उत्पादनाचा खर्च गेल्या वर्षात ३९·०८ पैसे होता. गेल्या वर्षीचा सरासरी अंड्याचा बाजारभाव ३५·७२ पैसे हा आहे. महाराष्ट्रात हा धंदा फायद्यात आहे असे ठामपणे सांगणारे हाताच्या बोटावर मोजण्याजोगेच आहेत. उत्पादकांचा हा व्यवसाय कसाबसा चालावा ह्या हेतूने केंद्राने अंड्यांच्या निर्यातीस वीस टक्के अनुदान देऊन व किंमत प्रत्येकी ५० पैसे ठरवून ह्या व्यवसायास कुबड्या दिल्या आहेत.

आजचे शेतकऱ्यांचे नेते श्री. शरद जोशी यांचेही विचार ह्या विषयावर फारसे उत्साहजनक नाहीत.

मुळात इंग्लिश अंड्यांची बाजारपेठच मर्यादित असल्याने ह्या धंद्याचे स्वरूप काय आहे, ह्याची कल्पना येऊ शकेल. पुस्तकाच्या प्रती खूप खपल्या तरी हा धंदा काय स्वरूपात आहे याची कल्पना येऊ शकेल. पुस्तकाची साहित्यिक बाजू जरी यशस्वी ठरली, तरी त्यातील व्यावसायिक तांत्रिक बाजू तोकडी पडते, हे म्हणणे मान्य करावे लागेल. पाश्चात्य पद्धतीवर आधारलेल्या वराहपालन ह्या धंद्याचे स्वरूप तर केविलवाणे व दयनीय झाले आहे. तसेच संकरित गायीच्या दुधाच्या उत्पन्नासंबंधी इंडियन एक्सप्रेसमध्ये ता. ६-४-८१ रोजी श्री एम. जी. जॅकसन ह्यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे, तो उद्‌बोधक ठरेल. म्हशीच्या संगोपनाकडे होणारे दुर्लक्ष व दापचरी प्रकल्पासारख्या योजना धोकादायक ठरू शकतील.

आता अन्न म्हणून अंडे ह्याविषयी थोडेसे लिहावेसे वाटते. 'दूध हे विष आहे' असे ह्या विषयावर डॉ. देशमुख ह्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. खेड्यातून सुकडीऐवजी लहान मुलांना दूध देण्यास सुरुवात झाल्यावर अनेक मुलांना हगवण व अतिसार झाल्याच्या हकीगती आहेत. दूध हे सर्वांनाच मानवते असे नाही. अंड्याचेही तसेच आहे. व्यक्ती तितक्या प्रकृतीनुसार अनेकांना अंडे हानिकारक ठरते, पण कित्येक मुलांना दूध घातक ठरले असता अंड्याने जीवदान दिल्याचे मला ठाऊक आहे अंडे अन्न म्हणूनच नव्हे तर औषध म्हणूनही अनेकांना अत्यंत फायद्याचे ठरले आहे. फक्त अन्न वा औषध म्हणून ज्या प्रकारे अंड्यास प्रसिद्धी मिळावयास हवी, तशी ती मिळत नाही ह्याचे वाईट वाटते. विशेषतः अंडे कच्च्या स्वरूपात घेणे घातक ठरते, असे निष्कर्ष आहेत. पण अंडे कोणत्याही ऋतूत कमी-जास्त प्रमाणात बहुतेकांना विशेष पोषक ठरते, हा सिद्धांत आहे.

आता थोडेसे कोंबड्यांच्या कुटुंबनियोजनाविषयी. कोंबड्यामध्ये विशिष्ट कोंबडी *मिळण्यासाठी होणारी नराची स्पर्धा, शक्ती व* पुरुषी रुबाबाचे प्रदर्शन, प्रियाराधन वगैरे कोंबड्यांच्या कळपात नेहमीच चालते; पण सवतीमत्सर, एकमेकींविषयीचा द्वेष वगैरे भावनाही कोंबड्यात आढळतात. देशी कोंबड्यांच्या झुंजी तर इतिहासकाळापासून, आजसुद्धा विशेष गाजत असतात. एका चांगल्या कोंबड्याची रु. ८० पासून रु. २०० पर्यंत किंमत होते. तसे एक लहानसे झोपडे, एखाद-दुसरी म्हैस, दोन-चार शेळया व दहा-पंधरा गावठी कोंबड्या असलेले कुटुंबच आज फायदेशीर ठरणार आहे. पण अशा प्रकारचे काही विचार मांडल्यास त्या खात्याचे संचालक तयार होतील का ?

श्री. सबनिसांनी इस्राएलचा उल्लेख केला आहे. पण तेथील रहिवाश्यांच्या जिद्दीने सर्वांनीच प्रयत्न केले तर कोंबड्याच काय, आज आपणास भेडसावत असलेल्या झोपडपट्ट्या, बेकारी, सप, अनिश्चितता, वाढती गुन्हेगारी ह्या सर्वांवर मात करता येईल. ह्या जिद्दीत कोंबडीचा जीव तो काय?

११ एप्रिल —परिचित


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**

**अंक : सेहेचाळिसावा**

**१८ एप्रिल १९८१**

**किंमत : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# निपाणीचा गोळीबार : वणव्याची नवी ठिणगी

सतीश कामत

गुरुवार, तारीख नऊ एप्रिल ... सकाळचे दहा वाजायला आलेले. कोल्हापूर–हलकर्णी एष्टी प्रवाशांनी भरून गेलेली. हवेत चांगलाच उष्मा होता. त्यामुळे प्रत्येकजण पेपर, रुमाल, वही, पिशवी अशा हातात असेल त्या साधनाने स्वत:भोवती वाऱ्याची झुळुक निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. शेवटी एकदाची एष्टी सुटली.

सौदलगा आलं आणि एष्टीतल्या प्रवाशांना एकदम सहा एप्रिलची आठवण झाली. या दिवशी निपाणीला सतत बावीस दिवस शांतपणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यावर अमानुष हल्ला झाला आणि त्यात किमान दहा शेतकरी हुतात्मा झाले! या घटनेच्या खुणा आजही सौदलग्याला दिसत होत्या. सौदलग्याच्या लहानशा पुलाजवळ एक पोलिसांची जीप, काही अधिकारी आणि पोलीस बसले होते. प्रत्ये-काच्या चेहऱ्यावर दगडपण आणि मग्रुरी दाटून आलेली. रस्त्याने येणाऱ्या–जाणाऱ्यालाही यानी एक–दोनदा मार दिला. कारण? कारण, याच्या हातात दंडुके होते आणि तो नि:शस्त्र होता म्हणून; हे खाकी वर्दीमध्ये होते आणि त्यानं मळकं धोतर गुडाळलं होतं म्हणून; हे शासनाचे आणि घमेंडखोर व्यापाऱ्याचे कुत्रे होते आणि तो या 'स्वतंत्र, लोकशाहीवादी, समाजवादी प्रजासत्ताका'चा एक सामान्य नागरिक होता म्हणून!

सौदलग्याच्या त्या पुलावरून एष्टी जात असताना अनेक प्रवाशाच्या मनात या भावना आल्या. काहीच्या त्या लगेच व्यक्तही झाल्या. गाडीच्या आवाजाच्यावर आपला आवाज चढवून आपापसात बोलणारे हे प्रवासी या घटनेबद्दल मुख्यत्वे शासनालाच बोल लावत होते. शासन आंदोलन नीट हाताळू शकले नाही, अशीच अनेकांची तक्रार होती आणि त्याचबरोबर आंदोलकांबद्दल भरघोस सहानुभूतीही होती.

सहा एप्रिलच्या त्या भयानक प्रसंगाचं रूप दडवणारा अंतराचा पडदा आणखी बाजूला झाला आणि निपाणी आलं. एष्टीतले अनेक प्रवासी उभं राहून खिडक्यामधून बाहेर पाहू लागले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बाबू, तरटं. गाडगी–मडकी, बैलगाड्या, तंबू आणि झोपड्या–सारं उद्ध्वस्त झालेलं! एका रात्री अचानक झंझावात यावा आणि एखादी सुंदर नगरी त्याच्या गर्तेत गुदमरून जावी, तसं हे दृश्य होतं. बावीस दिवस 'आंदोलननगरा'त शेतकऱ्यांबरोबर राहणारे, गप्पा मारणारे, पान–तंबाखू खाणारे, भजन करणारे पोलीस तेविसाव्या दिवशी मात्र निद्रिस्त सिंहावर कपटी हल्ला चढ-वणाऱ्या कोल्हयासारखे याच निष्पाप शेतकऱ्यावर इथे तुटून पडले होते! हे कोण होते? कृतघ्न? हुकुमाचे तावेदार? की नोटेच्या तुकड्याचे लाचार?

जमावावर गोळीबार करणारे पोलीस व्हॅनमध्ये लपून बसले होते आणि व्हॅनच्या जाळीला मुद्दाम तयार केलेल्या आठ वर्तुळामधून बदुकीच्या नळ्या बाहेर काढून गोळ्या झाडत होते. एकाही लाचार कुत्र्याची रस्त्यावर उतरण्याची हिंमत होत नव्हती आणि गोळ्या नेमक्या कुठून येत आहेत हे न कळल्याने सैरावैरा पळणारे भाबडे शेतकरी आयतेच नळीच्या टप्प्यात सापडत होते! लाव पळून जाणाऱ्यानाही, हवेत स्वच्छंद विहार करणाऱ्या पक्ष्याला उडाणटप्पू मुलाने उगीचच छऱ्यानं टिपावं, तसं नेम धरून टिपलं जात होतं. जमावावर गोळीबार करताना पायांवरच गोळ्या झाडाव्यात, असा नियम आहे; पण व्हॅनमधून गोळ्या झाडल्यामुळे अनेकांच्या डोक्यात, छातीत किंवा पोटात गोळ्या घुसल्या व ते खाली कोसळले, असंही ही घटना प्रत्यक्ष पाहणारे म्हणत होते!

एवढं सगळं घडल्यावर निपाणीच्या परिसरातल्या छोट्या मोठ्या शेतकऱ्यांच्या भावना–प्रतिक्रिया काय आहेत, हे जाणून घ्यायची फार इच्छा होती. म्हणून आज या कोल्हापूर–हलकर्णी एष्टीनं मुद्दाम निपाणीत उतरलो. कोल्हापूरच्या 'सकाळ'चे उपसंपादक विजय साळुंके हेही बरोबर होतेच. या आंदोलनाची बाजू अतिशय उत्कृष्ट फोटो व बातम्याद्वारे वाचकांपुढे मांडणारा 'कोल्हापूर सकाळ' निपाणी परिसरात चागलाच लोकप्रिय झाला आहे निपाणीजवळच्या एका खेडेगावात गेलो तर तिथेही चार–पाच शेतकरी जमिनीवर 'सकाळ' पसरून सामुदायिक वाचन करीत होते.

निपाणीला प्रा सुभाष जोशीच्या घरी गेलो तेव्हा अकरा वाजून गेले होते. सध्या चालू असलेल्या तंबाखू आंदोलनासाठी शेतकऱ्यांना संघटित करण्याचं फार मोठं श्रेय प्रा. जोशी याच्याकडे जातं. कारण गेली पाच–सहा वर्षं ते आणि त्यांच्या पत्नीनी अनेक अडचणीशी, संकटांशी सामना देत या भागातील तंबाखू कारखान्यामध्ये काम करणाऱ्या स्त्रियाची बळकट संघटना बाधली. एके काळी मालकाची मर्जी राखण्यासाठी स्वत:चं शीलही गमावणाऱ्याया स्त्री–कामगारांना त्याच मालकाला घेराओ घालण्याइतकं प्रा. जोशी यानी धीट बनवलं आहे, बलवान केलं आहे सध्याच्या आंदोलनात या स्त्रियाही मोठ्या प्रमाणावर संघटितपणे उतरल्या आहेत. महिनाभर स्वत:च्या रोज-गारावर पाणी सोडून शेतकऱ्याची प्राप्ती वाढावी म्हणून स्वत:ला चिमटा घेणारा हा कामगारवर्ग म्हणजे मोठा अपवादच मानावा लागेल.

प्रा. जोशी याच्या घरी गेलो. समोरच खाटेवर डॉ. बाबा आढाव बसलेले होते. खादीची बंडी व लुंगी अशा अत्यत घरगुती पोषाखातले बाबा त्या दिवशीच्या निरनिराळ्या स्थानिक वृत्तपत्राचे अंक घेऊन

त्यातील मृत व जखमीची यादी तपासत होते. आपल्याजवळच्या नोंदी त्याच्याशी ताडून पहात होते.

बाबांना तिथं पाहून फार बरं वाटलं. कारण प्रा. सुभाष जोशी व शरद जोशी हे दोघेही जण अटकेत असल्यानं कुणा तरी अनुभवी सामाजिक कार्यकर्त्याची किमान उपस्थिती निपाणीमध्ये आवश्यक होती. आंदोलनात सहभागी झालेले तरुण कार्यकर्ते होते; पण आताच्या परिस्थितीत नेमकं कशा तऱ्हेनं नीतिधैर्य टिकवायचं याचं मार्गदर्शन आवश्यक होतं. बाबा ते काम चोखपणे पार पाडत होते. गेले दोन दिवस निपाणीच्या परिसरातल्या छोटया-छोटया खेड्यां-मध्ये बाबा कार्यकर्त्यांसह हिंडत होते. शेतकऱ्याची विचारपूस करत होते. सहा एप्रिलच्या गोळीबारात मृत किंवा जखमी झालेल्यांचा निश्चित आकडा मिळवण्यासाठी या खेड्यांमध्ये जाऊन शेतकऱ्यां-कडूनच प्रत्यक्ष माहिती मिळवण्याचं काम सुरू झालं होतं. या कामाला बाबा चांगला हातभार लावत होते.

प्रा. जोशींच्या घरात बाबाना पाहून आंध्रच्या वादळानंतरच्या एका घटनेची आठवण झाली. आंध्रमध्ये सागरी वादळाचा तडाखा बसल्यानंतर निर्वासित झालेल्यांचं पुनर्वसन करण्यासाठी सबंध देशातून मदत आली; पण या ठिकाणी दोनच संघटनांचे कार्यकर्ते सर्वांत आधी जाऊन पोचले. एक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि दुसरे आनंदमार्गी! निपाणीच्या भयानक हत्याकांडानंतर त्या ठिकाणी जाऊन शेतकऱ्यांच्या 'मानसिक पुनर्वसना'च्या कार्याला सुरुवात करणारे डॉ. बाबा आढाव हे पहिलेच अ-कानडी सामाजिक कार्यकर्ते असावेत. बाकी सगळेजण अजून कुंपणावरच आहेत.

स्वातंत्र्यासाठी तुरुंगात गेलेल्या क्रांतिकारकाच्या घरात असावं तसं प्रा. जोशी यांच्या घरातलं वातावरण होतं. काही निरोप येत होते, काही फोन येत होते, पत्रकारांचाही राबता होताच. दोघं-तिघं स्थानिक कार्यकर्ते आणि स्वतः डॉ. बाबा आढाव या सगळ्याला तोंड देत होते. सौ. जोशी स्वयंपाकघरात होत्या; पण त्यांचे कान आणि मन मात्र बाहेरच असावं. निपाणीपासून चारशे किलोमीटर दूर तुरुंगात डांबलेल्या प्रा. सुभाष जोशी यांच्याशी संपर्क प्रस्थापित झाला होता. 'आम्हा तुरुंगात असलेल्यांची काळजी करू नका, संघटन ढिलं पडू देऊ नका!' असा निरोप प्रा. जोशी यांनी पाठवला होता; पण त्यापलीकडं फारसं काही कळलं नव्हतं. प्रा. जोशींच्या या प्रचंड कार्यात त्यांच्या पत्नीचा वाटा ऐन युद्धात दशरथाच्या रथाचं निखळलेलं चाक सावरणाऱ्या कैकेयीसारखा आहे. स्त्री-कामगार, देवदासी यांच्याशी संपर्क साधण्यासाठी, त्यांचं संघटन करण्यासाठी सौ. जोशी यांचा फार मोठा हातभार लागला आहे.

निपाणीच्या परिसरातील लहान लहान गावांमध्ये जाऊन शेत-कऱ्यांच्या गाठी-भेटी घेण्याचं, वृत्तपत्रामध्ये आलेली मृत आणि जखमींची यादी तपासण्याचं काम आजही करायचं होतं. निपाणीच्या देवीचंद कॉलेजमधले प्रा. अच्युत माने, मोहन बुडके आणि स्वतः डॉ. बाबा आढाव यासाठी दुपारी निघणार होते. त्यांच्याबरोबर निघालो. मी आणि मोहन बुडके मोटरसायकलवर होतो, प्रा. माने आणि बाबा स्कूटरवर!

निपाणी-कोल्हापूर हा मुख्य रस्ता सोडून उजव्या हाताला वळलो. दगड—मातीचा अस्सल रस्ता. एखाद्या छोटया गावातच घेऊन जाण्याची हमी देणारा.

जात्रट आलं. एका लहानशा घरापुढं गाडी थांबवली. लगेच गाडीभोवती खंडीभर पोरं जमा झाली. घराबाहेर पाटी होती— 'पॅरीस टेलर्स'. घराच्या ठेंगण्या दारातून आत गेलो. छोटयाशाच जागेत दोन शिवणयंत्रं होती. कापडं पसरून बेतायचा मोठा फळाच आम्हाला बसायला दिला. गावातली मोठी माणसं आली. पाय पोटाशी घेऊन बोलू लागली.

जात्रटमधला एकजण जबर जखमी झाला होता. त्याला कोल्हा-पूरच्या रुग्णालयात ठेवलं होतं. बहुतेक पाय तोडावा लागणार होता. सहा तारखेला गावातल्या काही स्त्रियांना अटक झाली. त्यांच्याबरोबर सात-आठ-दहा वर्षांची चार पोरं होती. त्यांनाही पोलिसांनी पकडून नेलं आणि नंतर थोड्या वेळानं 'वय लहान आहे' हे लक्षात आल्यावर परत आणून सोडलं; पण हे लक्षात येण्यासाठी त्यांना चिकोडीपर्यंत, म्हणजे सुमारे पंचवीस किलोमीटर जावं लागलं.

श्री. बुडके यानी सर्व माहिती लिहून घेतली. सध्याच्या परि-स्थितीची कल्पना दिली आणि आता काय करावं, असं तुम्हाला वाटतं, असं विचारलं. कोणीच फारसं काही बोलेना. मग श्री. बुडके यांनी पुन्हा विचारलं—

'सहा तारखेनंतर गांवची बैठक वगैरे झाली की नाही?'

'हा, झाली की!'

'मग? बैठकीत काय चर्चा झाली?'

'नाही, तशी विशेष काही चर्चा झाली नाही.'

'पण मग आंदोलनाबाबत शेतकऱ्याचं काय मत पडलं?'

'हेच की, आपलं टिकून राह्यचं.'

'पण 'टिकून राह्यचं' म्हणजे काय?'

'म्हणजे हेच की, शरद जोशी, सुभाष जोशीसारखं टिकून राह्यचं. सोडायचं नाही.'

गावातल्या माणसांनी बंदुकीच्या दस्त्याचा, लाठीचा प्रसाद खाल्ला असताना, काही स्त्रिया तुरुंगात असताना आंदोलन तसंच पुढं चालू ठेवण्याचा निर्णय घेतला होता आणि तो ते अशा तऱ्हेनं सांगत होते की, त्यात विशेष काही नव्हतंच.

मला एकदम पुण्यातल्या एका खास बैठकीची आठवण झाली. आसाम-आंदोलन जेव्हा ऐन भरात होतं तेव्हा आसाममधील परि-स्थितीवर विचार करण्यासाठी पुण्यातल्या विचारवंताची एक खास बैठक आमदार प्रा. ग. प्र. प्रधान यांनी बोलावली होती. ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी, प्रा. गं. बा. सरदार, रा. प. नेने, सय्यदभाई, प्रा. राम बापट, विनायकराव कुलकर्णी, प्रा. प्रभाकर पाध्ये अशी पुण्यातली मातब्बर मंडळी बैठकीला उपस्थित होती; पण त्या ठिकाणी आसाममधल्या परि-स्थितीवर फारशी चर्चा झालीच नाही. तर या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करणाऱ्या आणि आसामच्या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा काढावा असे दोन्ही बाजूंना (आंदोलक आणि शासन) आवाहन करणाऱ्या पत्रकातील मसुद्याची वाक्यरचना काय असावी, यावरच या विचारवंतामध्ये खडाजंगी माजली.

साहजिकच आहे. ते शहरातले विचारवंत होते आणि इथं जात्रट-

सारख्या खेडेगावातले अर्धपोटी शेतकरी होते. तेवढा फरक पडणारच!

जात्रटच्या-पुढे जैलवाडी, नजरेच्या टप्प्यात मावणारी ही वाडी. माती-दगडाची बुटकी घरं. बुटकी दारं. कुठे नांगरलेली जमीन, तर कुठे औषधापुरता हिरवेपणा. आमच्या गाड्या लांबूनच दिसल्यावर लहान पोरं उड्या मारायला लागली, मोठी माणसं निरखून पाहू लागली. काही तरुण भेटले. बाबानी आणि प्रा. माने यानी त्यांच्याशी थोडं बोलणं केलं. गावातल्या चार-पाच स्त्रिया अटकेत होत्या, यापलीकडे गावाचं फारसं नुकसान झालेलं नव्हतं.

'बरं मग अहवालाचं काय ?' बाबानी प्रश्न केला. 'हवा कायम आहे !'–अनपेक्षित उत्तर.

'म्हणजे ?'

'म्हणजे असं की माणसं आदेशाची वाट पहाताहेत. आता स्वस्थ बसायची इच्छा नाही.'

'नाही, नाही. मी आंदोलनाच्या हवेबद्दल नाही विचारत. मी म्हणतोय की, या आंदोलनात तुमच्या गावानं घेतलेल्या सहभागाची सर्व माहिती देणारा अहवाल केव्हा तयार करणार ?'

'अहवाल ? म्हणजे नेमकं काय ?'

'म्हणजे तुमच्या गावातल्या किती लोकांनी या आंदोलनात भाग घेतला, बायकांनी कसं काम केलं, आंदोलनानंतरची गावाची परिस्थिती काय आहे, कुणाला काही अडचण आहे का, अशी सर्व माहिती एकत्रित लिहून तुम्ही निपाणीला शेतकरी संघटनेकडे पाठवायची.'

'हा, हा–असं होय ! ते करतो. आम्ही म्हटलं, अहवाल म्हणजे काय असतं कुणास ठाऊक.'

जैलवाडीहून आमचा मोर्चा निघाला तो बेनाडीकडे. महाराष्ट्राचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब देसाई याची ही सासुरवाडी. अर्थात एवढ्या वरिष्ठ मंत्र्याची सासुरवाडी असल्याचा गावाला काहीच फायदा झालेला दिसत नव्हता. गाव आपलं होतं तिथंच, धुळीतच राहिलं आहे.

बेनाडीचे गावकरी आम्हाला एका प्रशस्त चावडीसारख्या ठिकाणी घेऊन गेले. प्रत्येक गावातच पोर-टोरं आणि बायामाणसं लांबून लांबून कुतूहलान निरखत उभी असायची, तशीच ती इथही जमली. कुणी तरी पाण्याचे तांबे घेऊन आले. एकानं चहाची ऑर्डर सोडली.

गावाच्या परिस्थितीची माहिती देताना एकदम तिघं–चौघं उत्साहानं बोलायला लागायचे. मग त्यांच्यातलाच एकजण म्हणायचा, अरे यकेकजण सांगा,येकेकजण सांगा. त्यानुसार कोणी तरी दोन-तीन वाक्यं म्हणायचा की पुन्हा त्याने दिलेल्या माहितीमध्ये भर घालणं, सुधारणा करण, दुरुस्त्या सुचवणं हे प्रकार सुरू व्हायचेच. प्रत्येकालाच शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांशी बोलायचं होतं. दडपण, भीती, दहशत याचा इथे मागमूसही नव्हता.

बेनाडी गावचे सुमारे दीड हजार सत्याग्रही आंदोलनात सहभागी झाले होते. सहा एप्रिलला त्यांच्यापैकी फक्त चार-पाच स्त्रियानाच अटक झाली. कारण पुरुषानी अटक करून घेण्यासाठी आपापल्या गावानुसार रांगा लावल्या होत्या. पण बेनाडीच्या गावकऱ्याचा नंबर येण्याआधीच धुमश्चक्रीला सुरुवात झाली.

आम्ही बसलो होतो त्याच्या थोड मागं उजव्या हाताला गावकऱ्यांनी गावातला तंबाखू रचून ठेवला होता. एक महिना होत आला होता. स्त्रियांनी कारखान्यातल्या रोजगाराची फिकीर न करता बहिष्कार टाकला होता. गरिबी माणसाला लाचार आणि भ्रष्ट बनवते, हा सिद्धांत बेनाडी गावानं खोटा ठरवला होता.

बेनाडीहून सौंदलग्याला आलो. बाबांजवळ मृत व जखमींच्या असलेल्या यादीतल्या एका मरण पावलेल्या शेतकऱ्याच्या गावाचा आम्हाला तपास लागत नव्हता. आधी जाऊन आलेल्या चारी–पाचही गावात कुणाला काही माहीत नव्हतं. सौंदलग्याला कळलं की तो नागनूरचा होता. लगेच आमच्या गाड्या नागनूरच्या दिशेनं धावू लागल्या.

'इसम नामे कृष्णा दादू पाटील. उमर अंदाजे बासष्ट, राहणार नागनूर, हा सहा एप्रिल १९८१ रोजी निपाणी येथे झालेल्या गोळीबारात मयत झाला आहे.' माणूस कोणीही असो, त्याचं अपघाती निधन किंवा खून झाला की पोलीसदप्तरी अशी नोंद होते. या घटनाविषयी पोलिसांना वाटणारा 'इंडिफरन्स' त्यांच्याकडल्या दप्तरी नोंदीमध्येही व्यक्त होत असतो, तो असा !

नागनूरला पोचलो नि समजलं की, कृष्णा पाटील हा त्याच गावचा रहिवासी होता. आता त्याच्यामागे दोन मुली आणि पत्नी असा परिवार आहे. आज सकाळीच कृष्णाचा मृतदेह ताब्यात मिळाला आणि लगेच त्याच्यावर अंत्यसंस्कारही करण्यात आले. दोघे-तिघेजण हे सांगत असतानाच आणखीही काही शेतकरी जमले. मग आम्ही सर्वजण एका खोलीमध्ये जाऊन बसलो.

काकासाहेब हजारे या विशीतल्या पोराचा बाप रावकृष्ण हजारे याच्यावर ३०७ कलमाखाली खुनाच्या प्रयत्नाचा आरोप लावण्यात आला होता आणि हे कलम लावलेल्या पंचवीसजणाबरोबर त्याला चिकोडीच्या जेलमध्ये ठेवण्यात आलं होतं. आज सकाळीच काकासाहेब बापाची भेट घेऊन आला होता. बाप काय म्हणत होता, असं विचारल्यावर काकासाहेब बोलला, 'त्यानं सांगितलंय की, आम्ही सगळेजण आतमध्ये खुशाल आहोत. आमची काळजी करायची नाही. तुम्ही बाहेर धीर सोडायचा नाही.'

माणसं दोन-दोन, तीन-तीनच वाक्यं बोलत होती. पण त्यांच्यामध्ये वक्तृत्वाच्या धबधब्यानेही फुलवता येणार नाहीत असे रोमांच फुलवण्याचं सामर्थ्य होतं.

तुमच्या माहितीतल कोणी बेपत्ता वगैरे आहे का, असं विचारल्यावर एकानं सांगितलं की, तसं बेपत्ता वगैरे बहुधा कोणी नसावं. कारण जखमी झाले त्याना आम्हीच उचलून आणल. पोलिसांच्या हाती कुणालाही लागू द्यायचं नाही, हे पक्कं ठरवल होतं. त्यामुळं ओळख नसलेल्या, आसपासच्या गावातल्या जखमी सत्याग्रहींनाही त्या धावपळीत आम्ही उचलून आणलं.

'बरं मग आता पुढचं काय ते बोला ना !' बाबानी मोठ्या खुबीनं गाडी आंदोलनाच्या वळणावर आणली. एक शेतकरी म्हणाला की, 'आजच्या पेप्रावरनं असं दिसतय की केंद्र सरकारही तंबाखूला भाव द्यायला नाही म्हणत आणि राज्य सरकारही नाही म्हणतंय. तेव्हा आता शेतकऱ्यानी स्वत.च्याच पायावर उभ राहलं पाहिजे. आम्हाला व्यापारी नकोत आणि हे राज्यकर्तेही नकोत ! साखरेची जर फॅक्टरी उभी राहू शकते तर आमची का होऊ नये ?

मलपृष्ठ १ वर

# हरियाना :

## बन्सीलाल येत आहेत

वा. दा. रानडे

इंदिरा कांग्रेसची राजवट असलेल्या निरनिराळ्या राज्यामध्ये मुख्यमंत्र्याविरुद्ध बंडखोरी चालू दिली जाणार नाही; तसे कोणी वागल्यास त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशारा विद्याचरण शुक्लांना केंद्रीय मंत्रिमंडळातून बडतर्फ करून पंतप्रधान श्रीमती गांधीनी दिला; पण त्याचा फारसा परिणाम न होता बंडखोर गटांच्या हालचाली चालूच आहेत. हरियानामध्ये तर हे प्रकर्षाने दिसून येत आहे.

भारताच्या राजकारणात हरियानाची एक परंपरा आहे. १९६७ च्या निवडणुकीनंतर सरकार पाडण्यासाठी आयाराम–गयारामची साथ प्रथम हरियानात सुरू झाली. आयाराम–गयारामाचे आदिपीठ म्हणून त्याची ख्याती झालेली आहे. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत केंद्रात पुन्हा इंदिरा गांधीच्या हाती देशाने सत्तेची सूत्रे सोपविली. त्याबरोबर हरियानात आयाराम–गयारामांच्या लाटेने पुन्हा उचल खाल्ली. सत्तारूढ जनतापक्षाचे सर्व आमदार इंदिरा कांग्रेसला मिळाले. भजनलाल यांचेच सरकार अधिकारावर राहिले. फक्त त्याने जनता पक्षाची पाटी काढून टाकून इंदिरा कांग्रेसची पाटी लावली. निवडणुका न लढविता हरियानाची सत्ता अलगद आपल्या हाती येत आहे तर ते का सोडा, असा विचार करून इंदिरा गांधींनी या सामुदायिक पक्षांतराला मान्यता दिली.

पण यातूनच पहिल्यापासून इंदिरा गांधीबरोबर असलेले मूळचे इंदिरा कांग्रेसवाले आणि नव्याने आलेले आयाराम यांच्यात संघर्ष सुरू झाला. मुख्यमंत्री आमचा हवा, मंत्रिमंडळात मूळच्या इंदिरा कांग्रेसवाल्यांना महत्त्वाचे स्थान हवे, अशी मागणी त्यांच्या गटाने करून भजनलाल यांना पदच्युत करण्याच्या हालचाली सुरू केल्या. नव्या मुख्यमंत्र्यांना एक वर्ष तरी काम करू द्या, मग जरूर वाटल्यास नेतृत्वबदलाचा विचार करू, असे सूत्र इंदिराजींनी काही महिन्यांपूर्वी मांडले होते. भजनलाल मंत्रिमंडळास एक वर्ष झाल्याने आता नेतृत्वबदलाच्या मागणीने पुन्हा जोर केला आहे.

बंडखोर गटाचे नेते रिझकराम यांनी पंतप्रधान श्रीमती गांधींना काही महिन्यापूर्वीच एक निवेदन सादर केले. त्यात मुख्यमंत्री भजनलाल आणि काही मंत्र्यांविरुद्ध भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले होते. मुख्यमंत्री भजनलाल यांनी तडजोडीची तयारी दर्शविली, पण रिझकराम यांनी या तडजोडसूचना फेटाळून लावल्या. भजनलाल यांनी एका अधिकाऱ्यामार्फत मध्यस्थीचे प्रयत्न केले. हा अधिकारी माजी मुख्यमंत्री बन्सीलाल यांच्या निकटच्या अधिकाऱ्यापैकी एक होता; पण या मध्यस्थीलाही यश आले नाही. मुख्यमंत्र्यांना स्वत:लाच आपले आसन डळमळीत वाटू लागल्याच्या बातम्या असून त्यामुळे बंडखोर गटाचा जोर वाढत आहे.

दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे, माजी मुख्यमंत्री, बन्सीलाल यांनी राजकारणात उघडपणे भाग घेण्यास सुरुवात केली आहे. केंद्रात इंदिरा गांधी सत्तेवर आल्यानंतर जे आमदार इंदिरा कांग्रेसमध्ये आले त्यांच्यावर त्यांनी जोरदार हल्ला चढविला. एक वर्ष मौन पाळल्यानंतर आता बन्सीलाल उघडपणे बोलू लागले आहेत. ते योजनापूर्वक टाकलेले पाऊल आहे. केंद्रीय नेत्यांची संमति मिळाल्यानंतर त्यांनी हा पवित्रा घेतला असला पाहिजे, असा अंदाज करण्यात येत आहे. याला दुजोरा देणारी घटना म्हणजे मुख्यमंत्री भजनलाल यांनी बन्सीलाल यांच्याविरुद्ध केलेल्या तक्रारींची केंद्रीय नेत्यांनी काही दखलच घेतलेली नाही.

भजनलाल सरकारचा निषेध करणारी जी वक्तव्ये बन्सीलाल यांनी अलीकडे केली त्याविरुद्ध ही तक्रार होती. मध्यप्रदेशच्या अर्जुनसिंग सरकारविरुद्ध प्रचारमोहीम केली म्हणून विद्याचरण शुक्लाविरुद्ध जर कारवाई केली जाते तर बन्सीलाल यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का केली जाऊ नये, असे भजनलाल गटास वाटणे स्वाभाविक आहे; पण येथे एक लक्षात घेतले पाहिजे की, शुक्ल यांच्याविरुद्ध केलेली कारवाई शिस्तभंगासाठी केलेलीच नाही; तसे असते तर कांग्रेस अध्यक्ष, सरचिटणीस यांनी तसे स्पष्ट निवेदन प्रसिद्ध केले असते. कार्यकारिणी किंवा पार्लमेंटरी बोर्ड यांनीही शुक्लाबाबत काही ठराव केलेला नाही. त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची कारवाई इंदिरा गांधींनी केली आहे, ती पंतप्रधान म्हणून. पक्षाध्यक्ष या नात्याने पक्षपातळीवर त्यांनी काहीही कारवाई केलेली नाही. दुसरे असे की, बन्सीलाल मुख्यमंत्री व्हावेत असे केंद्रीय नेत्यांना वाटत असेल तर त्यांच्याविरुद्ध कारवाई ते कशी करतील! वास्तविक गेल्या वर्षी भजनलाल मुख्यमंत्री झाले त्याच वेळी मुख्यमंत्री बनण्याची बन्सीलाल यांची धडपड होती, पण केंद्रीय नेत्यांनी त्यांना काही काळ बाजूला राहायला सांगितले. एक वर्ष त्यांनी मौन पाळले तेवढी शिक्षा त्यांना पुरे झाली, असे केंद्रीय नेत्यांना वाटत असेल असे दिसते.

बन्सीलाल यांच्या बाजूने पद्धशीर अनुकूल प्रचारमोहीम उघडण्यात येत आहे. ते सुधारले आहेत अशी प्रतिमा निर्माण करण्यात येत आहे. आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात बन्सीलाल यांनी अत्यंत तडफेने काम करून राज्याची प्रगती फार झपाट्याने घडवून आणली; मुख्यमंत्रिपदी त्यांच्यासारखाच नेता हवा, असा या साऱ्या प्रचाराचा सूर आहे.

हरियानातील नेतृत्वात लागलीच बदल करून बन्सीलालना मुख्यमंत्रिपदावर आणले जाईल असा याचा अर्थ नाही. त्यांना मुख्यमंत्रिपद हवे असले तरी आपल्यामागे स्थिर बहुमत आहे अशी खात्री झाल्याशिवाय ते हे पद स्वीकारणार नाहीत. सध्याच्या पक्षाबद्दल त्यांना तशी खात्री वाटत नाही. भजनलाल गट पुन्हा उलटला तर बन्सीलाल मुख्यमंत्रिपदावर फार काळ राहू शकणार नाहीत. तेव्हा विधानसभेचे विसर्जन करून हरियानात काही काळ राष्ट्रपति राजवट आणावी आणि मुदतपूर्व निवडणुका घ्याव्यात, असा बन्सीलाल व त्यांचे समर्थक यांचा प्रयत्न राहील. विधानसभा विसर्जित करण्यात येणार अशी हवा हेतुपूर्वक पसरविण्यात येत आहे. विधानसभेचे गेले अधिवेशन हे शेवटचेच अधिवेशन, अशी सभासदांची समजूत आहे. तेव्हा सभापतींनी सभासदांबाबत उदार धोरण स्वीकारावे, अशी विनंती रिझकराम यांनी सभापतींना केली होती. विधानसभा बरखास्त केली जाणार नाही; पूर्ण मुदत संपेपर्यंत ती अस्तित्वात राहील, असे मुख्यमंत्री भजनलाल यांनी पुन:पुन्हा सांगितले, तरी त्यावर विश्वास न ठेवता एक प्रकारच्या अनिश्चित वातावरणातच हे अधिवेशन भरले व संपले.

विधानसभेची मुदत पुढच्या वर्षी संपत असल्याने रीतसर निवडणुका होतीलच, तेव्हा आताच मुदतपूर्व निवडणुका कशासाठी घ्यावयाच्या, असा एक प्रश्न उपस्थित होतो. एक वर्षाने परिस्थिती आणखी बिघडण्याचा संभव आहे. तेव्हा सत्ता मिळविण्याच्या दृष्टीने आताच मुदतपूर्व निवडणुका घेणे चांगले, असे भजनलालविरोधी गटास वाटते. सामुदायिक पक्षांतरामुळे भजनलाल गटाला विधिमंडळ पक्षात जे अवास्तव महत्त्व आले आहे ते त्यांना कमी करावयाचे आहे. निवडणुकीशिवाय ते शक्य नाही. म्हणून विधानसभाविसर्जन व नव्या निवडणुका या गटाला आताच हव्या आहेत, पण प्रश्न केवळ हरियानाचा नाही. कर्नाटकातही पक्षांतरातूनच इंदिरा कांग्रेसच्या हाती सत्ता आली. हरियानात विधानसभा विसर्जित केली तर कर्नाटकात तशीच मागणी होईल; म्हणून याबाबत निर्णय घेणे इंदिरा कांग्रेस नेत्यांना सध्या कठीण जात आहे. ❑

## मुक्ताफळे

# उत्तर नसलेले प्रश्न

अखिल भारतीय इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस वसंतदादा पाटील हे पुन्हा एकदा सत्तासंन्यास घेऊन विधायक कार्याला वाहून घेणार आहेत. विधायक कार्याला वाहून घेणे केव्हाही चागलेच. मुख्य निवडणूक-आयुक्त शकधर यांनी भारतातील निवडणुकीचे अनेक वर्षे व्यवस्थापन केले आहे. ते म्हणतात–

'बुद्धिवान व चारित्र्यवान व्यक्ती सत्तास्थानी येण्याची देशाला खरी गरज आहे. निवडणूक ही समर्थ लोकांना सत्तेवर आणण्याची एक प्रक्रिया आहे; परंतु गेल्या तीस वर्षात निवडणुकांमध्ये समर्थ व्यक्ती दडपल्या गेल्या आणि अकार्यक्षम व्यक्ती पुढे आल्या!'

अशा परिस्थितीत उरल्यासुरल्या चारित्र्यवान व्यक्तीदेखील राजकारणाचा व सत्तेचा संन्यास घेऊन विधायक कार्याकडे वळल्या तर भारतात काय बरे होईल? समजा, देशात खूप विधायक कार्ये सुरू झाली आणि त्याचबरोबर गुंड, समाजघातकी, स्मग्लर, काळा बाजारवाले हे सर्व सत्ताधीश झाले तर विधायक कार्याची शोभा वाढणार आहे का? दादाच सांगतात–

'इंदिरा काँग्रेसचे चांगले चाललेले नाही. पक्षहित तर सोडाच, पक्षाचे कार्यकर्ते पक्षाची शक्ती कमी होईल असेच वागत आहेत. एकमेकाची निंदा-नालस्ती, हेवेदावे, मत्सर, परस्पराचे पाय ओढणे या प्रकाराना ऊत आला आहे. कुणी कार्यकर्ते जीव तोडून काम करताना दिसत नाहीत!'

अरेरे! पक्षाची अशी अवस्था असताना दादानी विधायक कार्यासाठी निघून जाणे म्हणजे घरात मुले एकमेकाच्या उरावर बसलेली असताना बाईने विधायक कार्यासाठी घरातन जाण्यासारखे नाही का? या मडळीना शिस्त लावणे, सुधारणे हे कार्य पुरेसे विधायक नाही का? हे कार्य कुणीच केले नाही तर इंदिरा गांधीसह या देशाचे काय बरे होईल? नका हो नका– दादा, तुम्ही दुसरे कोठलेही विधायक कार्य केले नाही तर नाही का चालणार? हे एवढे विधायक कार्य तसेच टाकून तुम्ही गेलात तर काय होईल ते शकधराना विचारा तरी! ते म्हणतात–

'राजकीय पक्षांनी प्रथम स्वत.ला सुधारले पाहिजे, त्यानंतर बाकीच्या सुधारणा आपोआप होतील. कारण त्या सर्व सौंदर्यप्रसाधनासारख्या आहेत. हिमाचल प्रदेश आणि हरियाना येथील सरकारांचा कारभार कसा चालला आहे? पक्षांतर केलेल्या सर्वांना इंदिरा काँग्रेसने विविध मंडळांची अध्यक्षपदे दिली आहेत आणि या मंडळीना कोणतेही कामच नाही!'

तेव्हा राजकीय पक्ष सुधारणे ही पहिली विधायक सुधारणा असताना, इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस दादा– तुम्ही दुसरे विधायक कार्य कशाला शोधता?

२.

'महाराष्ट्रातील बुद्धिवान चळवळीची शोकांतिका' या विषयावर सांगली येथे बोलताना जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते ना. ग. गोरे म्हणाले–

'रूढी, परंपरा, देवधर्म, चातुवर्ण्याची कल्पना आणि बुवाबाजीला प्रतिष्ठा या सर्व गोष्टी आज आपल्या समाजात उफाळून येत असल्याचे चित्र पाहिल्यावर महाराष्ट्रातच काय पण संपूर्ण देशात बुद्धिवानाचा सपशेल पराभव झाला असेच म्हणावे लागेल!'

परंतु याच व्याख्यानात ते पुढे म्हणाले–

'हिंदुस्थान निदान सध्या आहे तेवढा तरी रहावा असे वाटत असेल तर बुद्धिवादाची कास धरण्याखेरीज गत्यंतर नाही. तरुण मंडळीनी याचा अंतर्मुख होऊन विचार करावा–'

आता ज्या बुद्धिवादाचा सपशेल पराभव झालेला दिसतोय त्याचीच कास पुनः पुन्हा का बरे धरायची? बुद्धीपलीकडे माणसाला सत्प्रवृत्त बनवणारे अन्य काही असते का? असल्यास त्याची कास का धरू नये?

बुद्धिवादाचा पराभव सांगताना नानासाहेब म्हणाले– 'या देशात सर्वांसाठी समान नागरी कायदा असावा असे सर्वजण म्हणतात; पण इंदिरा गांधी म्हणतात की, सर्व घटकांच्या लोकांकडून ही मागणी आली पाहिजे. अशी मागणी येण्याची वाट सरकारने का पहावी?'

का पहावी हे बुद्धिवादाने आपल्याला सर्वांना समजते. पण हे घडवून आणायला बुद्धिवादाचा काय उपयोग? 'मुंबई सकाळ'चे माधव गडकरी यांनी अंतुले याना स्पष्ट विचारले–

'तिन्ही धर्मातील(हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन) व्रतवैकल्ये ही समाजाला निरुपयोगी ठरली आहेत. धर्मात सुधारणा घडवून आणण्यास तुम्ही तयार आहात काय? तुम्ही समान नागरिक कायदा आणणार आहात काय?'

बिनतोड बुद्धिवाद. मुख्यमंत्र्याचे उत्तर काय?

'सर्वधर्मसमभाव याचा अर्थ समान नागरी कायदा असा नाही!'

काय बुद्धिवादी इंदिराजी आणि बुद्धिवादी अबदुल रहमान अंतुले यानी चर्चा करून हे ठरवले की काय? जोपर्यंत हे दोघे 'तुमची मते आम्हाला मिळाली नाहीत तरी चालेल, पण आम्ही समान नागरिक कायदा करणारच, असे म्हणत नाहीत तोपर्यंत काय करायचे? आणि हे दोघे असे म्हणणारच नाहीत.

–तरी धरायची का तरुणानी बुद्धिवादाची कास अंतर्मुख होऊन?

३.

श्री. यदुनाथ थत्ते, माजी संपादक 'साधना' यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये एक लेख लिहून दलित भगिनीना धोक्याचा इशारा दिला. (१२–३–८१) 'इस्लामचा स्वीकार केलात तर दु:खद अनुभव वाटयाला येईल– स्त्रियाना एक उत्पादनक्षेत्र यापलीकडे इस्लाममध्ये स्थान नाही. मानव म्हणून

त्यांना कोणतेही हक्क नाहीत.'

यावर सौ. शमीम काझी नावाच्या मुस्लिम भगिनींनी 'म. टाइम्स' मध्ये पत्र लिहिले. त्यात त्या म्हणतात–

'अंग-प्रत्यंगाचे प्रदर्शन करण्यास इस्लामने स्त्रियांना मज्जाव केला आहे. किंबहुना पडदा पाळण्यास सांगितले आहे.

...'मुस्लिम स्त्रियांवर खरोखरच मुस्लिम पुरुष अत्याचार करीत असतील तर त्या बहुसंख्येने त्याबद्दल आवाज उठवतील! उगाच दलित महिलांना धोक्याचा इशारा श्री. थत्ते यांनी देऊ नये.'

शमीनताई, भारतीय सिनेसृष्टीत अंग-प्रत्यंगाचे प्रदर्शन करणाऱ्या बहुसंख्य तारका मुसलमान आहेत. यामुळे इस्लाम धोक्यात आल्याचे दिसत नाही! का बरे आला नाही धोक्यात? मुस्लिम स्त्रियांवर मुस्लिम पुरुष अत्याचार करीत नाहीत, हे आम्हाला ठाऊक आहे. परंतु मुस्लिम पुरुषांनी हिंदु स्त्रियांवर केलेल्या अत्याचारांचा निषेध मुस्लिम स्त्रिया कधी करतात का? ही भाषा योग्य नाही शमीमताई! कोणाही पुरुषाने कोणाही स्त्रीवर अत्याचार केला तर स्त्री म्हणून मुस्लिम स्त्रियांनी आवाज उठवायला आता शिकले पाहिजे. निदान भारतात रहाणाऱ्या भगिनींनी तरी. शमीनताई, तुम्ही इस्लामी स्त्रिया धर्माचा जेवढा अभ्यास करता तेवढा हिंदुस्थानच्या इतिहासाचा का हो करीत नाही? निदान फाळणीचा इतिहास तरी वाचाल की नाही? केलाय कधी या इतिहासाचा मुसलमान स्त्रियांनी निषेध? का नाही केला आजतागायत?

–ग्यानबा



# एका भारतीय लिपीची आवश्यकता

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

इंग्रजी भाषेच्या भारतातील स्थानाबद्दल नुकत्याच झालेल्या एका परिसंवादात एका वक्त्याने सांगितले की, 'इंग्रजी ही परकी भाषा म्हणून उगाच भुई धोपटणाऱ्या सज्जनांनी कृपया एक गोष्ट लक्षात ठेवावी की संपूर्ण देशाला एकत्र ठेवणारे एक महत्त्वाचे सूत्र म्हणून इंग्रजी भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इंग्रजीचे भारतातून उच्चाटन करण्यास वेळ लागणार नाही; पण त्याऐवजी 'गुंफण भाषा' (Link Language) म्हणून एक सर्वमान्य भाषा आपल्याला जोपासावी लागेल. 'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्' वगैरे आदर्श ठीक आहेत; पण प्रत्यक्षात संपूर्ण भारतदेखील आपण एकत्रित भाषेने जोडू शकलो नाही. हे सत्य आहे.'

एके काळी संपूर्ण भारतातील विद्वत्-भाषा म्हणून संस्कृत भाषेने फार मोलाची कामगिरी बजावली; पण आपणच घालून घेतलेल्या काही कर्मठ बंधनांमुळे या भाषेचा वापर समाजातील विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित राहिला. अन्य प्रादेशिक भाषा आणि बोलीभाषा विकसित झाल्या. संस्कृतमध्ये असणारे ज्ञान वाढण्याऐवजी सीमित होऊ लागले. पुढे पुढे नष्टप्राय झाले. आज संस्कृतची वेगाने पीछेहाट होत आहे, संस्कृतमधून बातम्या वा संस्कृत नाटकांचे प्रयोग होत असले तरी! ज्यू लोकांनी इस्राइलमध्ये 'हिब्रू' ही अशीच पुरातन आणि मृतप्राय झालेली भाषा पुनरुज्जीवित करून राष्ट्रभाषा म्हणून वापरण्यास सुरुवात केली आहे, हे जितेजागते उदाहरण डोळ्यांपुढे असल्यामुळे आपल्याही देशात राष्ट्रभाषेचे स्थान संस्कृत घेऊ शकेल, असा अनेकजणांना विश्वास वाटतो. कोठल्याही भारतीय भाषेमध्ये वैज्ञानिक क्षेत्रातील संज्ञांना पारिभाषिक शब्द शोधायचे झाले तर संस्कृतकडे धाव घ्यावी लागते आणि अशा शब्दांची संस्कृतमध्ये कधीही वाण पडत नाही. सर्व भारतीयांना हे पाहिल्यावर संस्कृत राष्ट्रभाषा व्हायला काहीच हरकत नाही असे वाटते; पण इस्राइलमध्ये हिब्रू आणि भारतात संस्कृत यात इतर फरक पुष्कळ आहेत. ते असे–

१. बहुतेक इस्रायली सुशिक्षित, निदान साक्षर होते. भारतात सर्वजण साक्षर व्हायलादेखील आणखी किती वर्षे जातील कोण जाणे!

२. जगातील अनेक देशांतून हे लोक इस्राइलमध्ये आणले गेले. त्यामुळे त्यांच्या पोलिश, फ्रेंच, जर्मन, इंग्रजी या मूळच्या भाषांव्यतिरिक्त अन्य कोणतीच भाषा त्यांना ठाऊक नव्हती. अशी भाषा तातडीने निर्माण करणे इस्रायली नेत्यांना त्यामुळे आवश्यक होते. अन्यथा हे लोक परत गेले असते वा भांडत बसले असते. भारतात अनेक भाषा असल्या तरी सर्व भाषांच्या लोकांना एकाच ठिकाणी रहावे लागत नाही. प्रत्येक भाषेचा मोठा प्रदेश आहे.

३. लोकसंख्या आणि आकार याबातीत इस्रायल भारताच्या तुलनेने अगदी छोटे राष्ट्र होते.

त्यामुळे भारतात संस्कृत लोकभाषा, राष्ट्रभाषा आणि ज्ञानभाषा होणे सध्या तरी अवघड आहे.

या दृष्टीने अगदी प्राथमिक पाऊल म्हणून मी एक लिपीची योजना सुचवणार आहे.

उत्तर भारतात प्रवास करताना रेल्वेस्टेशन, बसस्टॉप, रस्त्यांची नावे, दुकानांची नावे इत्यादि गोष्टी समजण्यास इंग्रजी येत नसणाऱ्या माणसालाही अडचण पडत नाही. कारण लिपी एकच असल्यामुळे हा मजकूर वाचता येतो आणि समजतो; पण दक्षिण भारतात कोणी इंग्रजी न येणारा माणूस गेला की संपलेच! बसचा मार्ग काय, क्रमांकसुद्धा त्याला वाचता येणार नाही. कारण लिपी सर्वस्वी वेगळी. तेव्हा या प्राथमिक

अडचणी दूर करण्याकरता आणि आपण भारतीय एक आहो, ही भावना जोपासण्याकरता सर्व राष्ट्रांला एक भाषा नसली तरी एक लिपी असणे अत्यंत आवश्यक आहे.

युरोपमध्ये अनेक राष्ट्रे आणि अनेक भाषा असल्या तरी अक्षरलिपी एकच (म्हणजे रोमन) आणि अंकलिपीही एकच (म्हणजे अरेबिक) असल्यामुळे प्रवास करताना काहीही अडचण भासत नाही. उलट त्या देशात एक-दोन दिवस काढताच तिथल्या भाषेतले अनेक शब्द सहजरीत्या अवगत होतात. भारतात हे होणे सहज शक्य आहे. मात्र त्याकरता या सर्व भारतीय भाषाची लिपी एकच असणे आवश्यक आहे.

ही लिपी कोणती असावी ? अनेक लोकांना ही लिपी 'रोमन' (म्हणजे सध्याच्या इंग्रजी भाषेची लिपी) असावी असे वाटते. याला ही मंडळी पुढील कारणे सांगतात.

(१) ही जवळजवळ सर्व जगात समजली जाते. त्यामुळे परदेशी प्रवाशाना अडचण पडणार नाही. (चीननेही आता त्यांची अत्यंत क्लिष्ट चित्रलिपी सोडून देऊन ही लिपी स्वीकारली आहे असे ऐकतो.)

(२) फक्त २६ अक्षरे. त्यामुळे शिकायला सोपी.

(३) टंकलेखन व मुद्रण याकरता अतिशय सुलभ. कारण फक्त एकापुढे एक अक्षरे येतात. जोडाक्षरे, काना, मात्रा, वेलांटी हे प्रकार नाहीत.

(४) गोव्यात कोकणी भाषा रोमन लिपीत लिहिण्याचा प्रयोग झाला आहे.

इतर अनेकाच्या मते ही लिपी देवनागरी असावी. त्याला कारणे अशी—

(१) ही अत्यंत शास्त्रशुद्ध लिपी आहे. त्यामुळे एकाच लेखनाने दोन वेगळे उच्चार ही रोमन लिपीत येणारी अडचण इथे ९९% सभवत नाही. (काही १% उदाहरणे— उद्या आणि विद्या यातील 'द्या' चा उच्चार, 'पाप-पुण्याचा' आणि 'मुबई-पुण्याकडे' यातील 'ण्या' चा उच्चार) पण काही सकेत योजून ही १% त्रुटी दूर होईल.

(२) संस्कृत, हिंदी, मराठी या तीन मोठ्या भाषा ही लिपी आधीच वापरतात. शिवाय गुजराथी, बगाली, पंजाबी यांना ही अगदी जवळची आहे.

(३) टंकलेखन आणि मुद्रण यात सुलभता यावयाची तर मात्र या लिपीत खूपच सुधारणा कराव्या लागतील. स्वा. सावरकरानी या बाबतीत प्रयत्न केले. मुंबईचे 'आयुध' हे मासिक याबाबत एक मोहीम चालवीत आहे; पण अशा सुधारणा घडवून आणणे हे भलतेच महत्त्वाकांक्षी काम आहे. बर्नार्ड शॉ यांनी आपल्या मृत्युपत्रात मोठी रक्कम इंग्रजी लिखाण उच्चारानुसारी व्हावे याकरता आवश्यक असणाऱ्या सुधारणा करण्याकरता राखून ठेवली होती. त्याविरुद्ध न्यायालयात धाव घेण्यात आली आणि कोण्या एका व्यक्तीच्या लहरीखातर परंपरागत लेखनपद्धती बदलण्याचा पायंडा पाडू नये, असा निर्णय परंपराप्रेमी ब्रिटिशानी घेतला असे वाचल्याचे स्मरते.

उर्दू भाषा भारतात सर्वत्र बोलली जाते. बऱ्याच हिंदुत्वनिष्ठ मंडळींना ही भाषा उगाचच परकी आणि शत्रूची असल्यासारखी वाटते. देवनागरीत उर्दूचा वापर सर्वत्र सुरू झाला तर ही भावना खूपच कमी होईल. सिंधी, काश्मिरी या भाषासुद्धा उर्दू लिपी वापरतात. त्यांनी देवनागरी वापरणे निश्चितच जास्त श्रेयस्कर ठरेल.

दक्षिण भारतात तेलगू, मल्याळम्, कानडी आणि तमीळ या भाषाना स्वतंत्र लिपी आहेत. त्यामुळे त्या विनाकारण एकमेकीपासून दुरावल्या आहेत. सर्वांनी देवनागरीचा वापर सुरू केल्यास भाषांतर्गत देवाण-घेवाण पुष्कळच सुलभ होईल.

सर्व भाषाकरता एक लिपी होण्यात व्यावहारिक अडचणी खूप येतील; पण त्या सोडवणे शक्य आहे. भावनात्मक अडचणीवर मात करणे मात्र अत्यंत अवघड काम आहे; पण इथेही राष्ट्रीय भावनेला आवाहन करून या अडचणीवर मात करावी लागेल. शिवाय यात प्रत्येक भाषा जशीच्या तशी रहाणार असल्यामुळे आणि देवनागरी ही केवळ एका कुठल्या तरी भाषेची लिपी नसल्यामुळे फारसा विरोध होणार नाही असे वाटते. शासनाला या गोष्टीकरता खूपच प्रयत्न करावे लागतील; पण साहित्य परिषदा, विद्यापीठे यांनी या कामाची सुरुवात म्हणून जनतेची मनोभूमिका तयार करण्याचे काम आतापासूनच सुरू करायला हवे.

एक लिपीची पहिली पायरी म्हणून आपण सर्व भारतीयानी अंक लिहिण्याकरता अरेबिक आकडे वापरायला सुरुवात केली तर ? घड्याळे, कॅलक्युलेटर्स, मोजपट्ट्या, टॅक्सीमीटर, मोटारीचे नंबर, शास्त्रीय उपकरणे, पेट्रोल पंप, नोटाचे नंबर, लॉटरी तिकिटाचे नंबर या सर्वांकरता आपण हे आकडे वापरतोच. तेच सर्वांनी सर्व व्यवहारात वापरायचे. टपाल खात्याने पिनकोड सुरू केले आहे. अनेक लोक हे आकडे त्यावर भाषेतील अंकलिपीत लिहितात. त्यामुळे या पिनकोडचा उद्देशच नष्ट होतो. कोणत्याही लिपीत पत्ता असला तरी टपाल-कर्मचाऱ्याला ते पत्र योग्य ठिकाणी पाठवता येते हा पिनकोडचा मोठा फायदा. हे आकडे कोणालाही समजतील अशा लिपीत लिहिले तरच हा फायदा होणार ! तेव्हा सर्वत्र हे जगन्मान्य झालेले आकडे वापरायला सुरुवात करून आपण हे पहिले पाऊल टाकू या. मग दुसरे पाऊल राष्ट्रलिपी आणि तिसरे पाऊल राष्ट्रभाषा !

□


प्रसिद्ध झाले.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

मूल्य : रुपये पंधरा

# सावधान! मलेरियाची साथ येत आहे

आपल्या कुटुंबातील कोणा माणसास ताप आला आहे का? त्याकडे दुर्लक्ष करू नका. तो मलेरिया असू शकतो. मलेरिया निरोगी माणसांना पण अचानक होतो आणि त्यामुळे अशक्तता येते आणि कधीं कधीं मानसिक अस्वस्थता पण येते. मलेरिया साधारणपणे पूर्ण गांवात, शहरात अथवा प्रदेशात एकदम पसरतो.

## लक्षणें


मलेरियाची ही कांही लक्षणें :

- एकदम हुडहुडी भरून कापरे भरते आणि ते कांहीं तास राहते.
- चटके लागतात आणि डोके भयंकर दुखते.
- अखेरीस खूप घाम येतो, अशक्तता येते आणि ताप उतरतो.

## उपाय

ताप आल्याबरोबर ताबडतोब रक्त तपासणी करण्यात आली पाहिजे. तात्कालिक उपाय म्हणून क्लोरोक्विनचा प्रारंभिक डोस देण्यात आला पाहिजे. रक्त तपासणीत मलेरियाचा [illegible] झाल्याचे आढळल्यास, लगेच कडक उपचार करून, पांच दिवस मलेरिया प्रतिबंधक औषधे देण्यात आली पाहिजेत.

**ताप जास्तच वाढल्यास, रोगी बेशुद्ध झाल्यास अथवा वातात आल्यास रोग्याला जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात, औषधालयात अथवा रुग्णालयात हलवा. तेथे त्याला मोफत वैद्यकीय सल्ला मिळेल आणि उपचार करण्यात येईल.**





### मलेरियावर प्रतिबंध घालण्यासाठीं

- आपल्या घरात अथवा घराभोवती घाणपाणी साठू देऊ नका. त्यात डांसांची पैदास होते. हे डांसच मलेरियाचे मूळ कारण असतात. घाणपाणी काढून टाकणें शक्य नसेल तर त्यात केरोसिन शिंपडा.
- वेळोवेळी जंतुनाशक औषधांची फवारणी करण्यास येणाऱ्या पथकांना मदत करा. तसेच इतरांना हे काम करण्यास प्रवृत्त करा.
- आपल्या घरात सर्वत्र व्यवस्थित फवारणी झाली आहे, याची खात्री करून घ्या. स्वयंपाकघर, देवघर, कोठार अथवा गोठा यांना वगळू नका.
- फवारणी चालू असताना खाद्यपदार्थ आणि चारा—वैरण झाकून ठेवा.

**माणूस — डांस यांची साखळी तोडा**

राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन कार्यक्रम
(आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय)
२२ शामनाथ मार्ग, दिल्ली-११००५४.

davp 80/428

# उत्तर-मीमांसा : १ :

स. शि. भावे

## अध्यक्ष रेगन यांच्या खुनाचा प्रयत्न : सामान्य माणसाच्या मनात साचलेला विद्वेष

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन यांच्या खुनाच्या प्रयत्नाची चर्चा सध्या जगभर चालू आहे.

अमेरिकेत काय किंवा इतरत्र काय अथवा वर्तमानात काय किंवा इतिहासात काय, मोठया किंवा मोठया पदावरील व्यक्तीच्या खुनाचा प्रयत्न ही काही अपवादात्मक घटना म्हणता येणार नाही.

दक्षिण अमेरिका, आफ्रिका, अरब प्रदेश, आग्नेय आशिया-जगाच्या केवढया तरी भागात सत्तांतराचा सोपा, जवळचा आणि हुकमी रस्ता म्हणून अधिकारी व्यक्तीची हत्या केली जात आहे. बांगला देशात अध्यक्ष मुजीब याची हत्या हे अगदी जवळचे उदाहरण.

या हत्यांमागे उघड उघड राजकीय सत्ता मिळवण्याचा हेतू असतो. खून करणारा किंवा बहुधा करविणारा सत्तेवर येतो. प्रत्यक्ष खून करणाराना शिक्षा होत नाही. त्यांना मानाची पदे मिळतात किंवा अन्य मित्रराष्ट्रांत त्यांचे पुनर्वसन होते. सुमेरसिंग-खरकसिंग गारद्याना सरदारी मिळाली असे आपण आपल्या इतिहासात वाचतो. मुजीब याचे खुनी लष्करी अधिकारी सध्या चीनमध्ये सुरक्षित, सुखी जीवन उपभोगीत आहेत अशी वार्ता आहे.

या खुनाचे एक वैशिष्टय असे की, आपणांसारख्या सामान्य माणसांच्या मनात अशा खुनासंबंधी तशी साशंकता नसते. म्हणजे कुतूहल असते, खुनासारख्या घटनेचा स्वाभाविक थरार (thrill) असतो. खुनांची हकीकत सांगणारी पुस्तके वाचायला आवडतात; पण हे खून का होतात, कशासाठी होतात याचे उत्तर सामान्य माणसाना माहीत असते. फार वरच्या पातळीवर, सत्तेसाठी या मारामाऱ्या चालू आहेत. आपल्यापर्यंत त्याचा स्पर्श कधीही पोचणार नाही, आपण फक्त ही साठमारी दुरून बघायची, कल्पनेने ते ते थरारक क्षण अनुभवायचे-ही भूमिका सामान्याना माहीत , असते, कबूलही असते.

पण ली हार्वे ओस्वाल्डसारखा एक सामान्य माणूस अध्यक्ष केनेडीचा खून करतो तेव्हा सामान्य माणसाचे कुतूहल केवळ कुतूहल राहत नाही. त्याचे अवस्थातर खऱ्या जिज्ञासेमध्ये होते. कशासाठी या सामान्य माणसाने हा खून केला ? हे गूढ आपल्याला छळू लागते. गोडसेने महात्माजींचा खून केला. पुराणातरी एका व्याधाचा बाण श्रीकृष्णाला लागला. असामान्य व्यक्तीच्या हत्येशी सामान्य माणसाचा संबंध अनादिकाळापासून असा का चालत आला आहे ?

याची काही उत्तरे सतत दिली गेली आहेत.

एक म्हणजे या खुन्याचा करविता धनी कोणी वेगळाच असतो. हे खुनी म्हणजे केवळ भाडयाने घेतलेली साधने असतात. मोबदल्याचे प्रकार वेगळे वेगळे असतात. कधी पैसे, कधी संभाव्य आपत्तीपासून अभय, कधी शरीर, कधी भावनात्मक बंधन; पण मोबदला कशाही प्रकारचा असला तरी खुनाची कृती ही भाडोत्री असते.

दुसरे एक कारण दिले जाते ते तत्त्वनिष्ठेचे. ज्या नेत्याचे खून होतात त्याची तत्त्वे खून करणाऱ्यांना पटत नाहीत आणि खून केल्यामुळे त्या त्या नेत्याच्या मतप्रचाराला आणि प्रभावाला खीळ बसेल अशी त्यांची अपेक्षा असते. विचारांच्या भिन्नतेसाठी खून हे सुसंस्कृत नव्हेत, खुनाने विचार कधी मरतही नाहीत. म्हणजे खुनाचा मार्ग त्या खुनाचा हेतू विफल ठरवितो. अशा खुनी लोकाना अतिरेकी म्हणता येईल; पण त्यांच्या कृतीमागील प्रामाणिकपणा किंवा मनपूर्वकता हजार हिस्शांनी निर्विवाद असतात. एका वेगळया प्रकारचे ते हुतात्मे असतात. कारण त्याना व्यक्तिश: स्वत:ला काहीही मिळवायचे नसते.

सध्याच्या मानसचिकित्सेच्या युगात आणखी एक कारण वारंवार दिले जाते, ते मनोरुग्ण अवस्थेचे. गरिबी, बेकारी, महत्त्वाकांक्षेतील अपयश, प्रेमभंग इत्यादीच्या यातना माणसाला सोसवत नाहीत. मग माणूस आतून एकलकोंडा आणि बाहेरून आक्रस्ताळा होतो, बेजबाबदार होतो. मनावरचा ताबा सुटलेल्या या अवस्थेत तो अघोरी, क्रूर कर्म करायला प्रवृत्त होतो.

काही वेळा असा, आक्रस्ताळेपणा काही वेगळया कारणांतून निर्माण होतो. काहीजवळ जन्मापासून शारीरिक किंवा मानसिक दुबळेपण असते. ही एक प्रकारची अपंगताच. नव्या मानसोपचारतंत्रात ही अपंगता विशेष विचारात घेतली जाते. कोणाला आनुवंशिकतेने बुद्धीचा कस कमी मिळालेला असतो. कोणाला काही व्यंग असते. या दुबळेपणाचे कधी अती कौतुक होते, कधी त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. हे झाले 'आपल्या' माणसाचे. 'परक्या'-कडून तर या दुबळेपणाची उपेक्षाच होते. कधी उपहास होतो, चेष्टा होते. या साऱ्याने अपंगाच्या मनात स्वत.विषयी घृणा आणि इतरांविषयी तिरस्कार अशा भावना निर्माण होतात. त्याचा मनाचा निकोपपणा जातो. ती मने अतिरेकी स्वप्नाळू होतात. वास्तवातही ही मने आपली स्वप्नेच जोपासतात. आपल्या स्वप्नाचे रूपांतर सत्यात व्हावे म्हणून अशी अपंग, दुखावलेली, अतृप्त मने काय वाटेल ती अतिरेकी कृत्ये करू शकतात.

अध्यक्ष रेगन याच्या खुन्याबाबत सध्या हे विश्लेषण दिले आहे. अप्राप्य प्रेमाच्या प्राप्तीसाठी त्याने हे एक विकृत दिव्यच केले, अशी मीमांसा त्याने एका नवोदित नटीला लिहिलेल्या पत्राने सुरू झाली आहे. ज्यूडी फॉस्टर या नटीविषयी प्रेम वाटणारा आणखी एक तरुण, खुनी हल्ला करणारा हिंकली याचा शेजारी, एडवर्ड मायकेल

रिचर्डसन हाही रेगन यांना खुनाची धमकी दिल्याने नुकताच गजाआड गेला आहे.

या वैयक्तिक वैफल्याच्या आणि त्यातून उद्भवणाऱ्या विकृतीच्या मीमासेची आणखी एक दिशा म्हणजे समाजात शिरलेल्या दोषांची मीमांसा. अमेरिकन समाजात हिंसाचाराची विकृती पसरली आहे, अशी मीमांसा सध्या सुरू झाली आहे. भौतिक प्रगतीचे शिखर गाठूनही किंवा गाठल्यामुळे (!) हा समाज विकृत झाला आहे, असे म्हणताना अनेक भारतीयांना थोडे आत्मसमाधान जाणवले तर ते स्वाभाविक म्हणावे लागेल. अर्थात असे सूक्ष्म समाधान मानणाऱ्यांनाही हे कबूल करावे लागेल की, आपला समाजही काही उपरोक्त दोषांपासून मुक्त नाही.

ही मीमांसेची दिशा वरवर पाहता ढोबळ वाटते. (मुझे गुनाहगार किसने बनाया? 'सोसैटी' ने ! अशा डायलॉगांनी हिंदी चित्रपटांत ही मीमांसा विशेषच बटबटीत केली जाते !) पण सत्य हे आहे की, याबाबतीत समाजमीमांसा मुळात ढोबळ नाही. जिथे ही मीमांसा ढोबळपणाने केली जात असेल तिथे आपण रेंगाळू नये; पण अशी मीमांसा ही केलीच पाहिजे !

औपचारिक सामाजिक पहाण्यांवर किंवा हजारशेसाठ अहवालांवर ही मीमासा आधारित असणार नाही. चिंतनावर आणि चिंतनातील विश्लेषणावर ही मीमांसा अधिकतर अवलंबून असेल. म्हणजे निरीक्षणाचा आधार इथे नसतो असे नव्हे; पण हे निरीक्षण म्हणजे औपचारिक पद्धती वापरून केलेले कोष्टकपूर्ण निरीक्षण नव्हे.

असे एक विश्लेषण मांडावे असे मनात फार येत होते. याच वेळी अशा मीमांसेची उपयुक्तता एका अनुभवी, विद्वान समाजसंशोधकानेही मान्य केलेली वाचण्यात आली आणि बरे वाटले. मुंबईच्या टाटा समाज विज्ञान संस्थेचे संचालक आणि ख्यातनाम समाजशास्त्रज्ञ डॉ. मा. स. गोरे यांनी हा विचार व्यक्त केला आहे.

मुंबईस प्रेस गिल्ड ऑफ इंडियाच्या एका समारंभात, 'जेनेसिस ऑफ क्राइम इन मेट्रोपोलिटन बाँबे' या विषयावर ते बोलत होते (८-४-८१). त्यांचे महत्त्वाचे सूत्र असे की, 'समाजातील लोकाची अंत:प्रवृत्ती काय आहे व ती कशी काम करते यावरच गुन्हेगारी काबूत ठेवणे व राहणे अवलंबून असते. या संदर्भात पोलिसांची संख्या महत्त्वाची नाही !'

रेगन यांच्या खुनाच्या प्रयत्नाच्या निमित्ताने सामान्य माणसांच्या अंत:प्रवृत्तीचा शोध घेणे उपयुक्त होईल असे वाटते.

सर्वांना माहीत असलेले एक सूत्र असे की, सामान्यता ही असामान्यतेचा स्वाभाविक द्वेष करते. (Mediocrity hates excellence). पण नुसते हे सूत्र उच्चारून सामान्य आणि असामान्य यांच्यातील 'प्रेम-द्वेषसंबंधा'चा उलगडा होणार नाही. अधिक तपशिलाने आणि इतिहासाच्या साक्षीने हा संबंध पाहिला पाहिजे.

इतिहासकाळापासून असामान्यांना विभूतिमत्त्व कोण देत आले ? तर ते सामान्यानीच दिले. हेही विधान थोडे ढोबळ झाले. खरा प्रकार असा की, असामान्यातीलच काहींनी (शिष्यांनी) उरलेल्या असामान्याना (गुरूंना) विभूतिमत्त्व द्या, असे सामान्यांना (भक्ताना) सांगितले आणि असामान्यांच्या प्रभुत्वाला सामान्याची संमती मिळविली. गुरु-शिष्य- भक्त असा त्रिकोण आदिकाळापासून या ना त्या रूपात सतत कार्य करीत राहिला. राजकीय क्षेत्रात हा त्रिकोण राजा-मंत्री-प्रजा असा झाला. (आपण वेगळ्या अर्थाने याला सामाजिक मूलत्रिकोण म्हणू)

भक्तांच्या स्वयंस्फूर्त स्वीकाराचा आधार होता तोवर हा त्रिकोण व्यवस्थित चालला. सामान्यांच्या स्वयंस्फूर्त स्वीकाराचे रहस्य होते त्यांच्या दुबळेपणात. या दुबळेपणाने ते असामान्यांना भीत, अजूनही भितात. ज्याला आपण भितो त्याचे आपण संरक्षण मागतो. उदाहरणार्थ, देवच पुण्य देतो आणि पाप देतो.

पण या भीतीच्या आणि संरक्षणाच्या संबंधात अपरिहार्यपणे आणखी एक छटा मिसळते. ती आदर-द्वेषाची किंवा प्रेम-द्वेषाची.

सामान्य हे वेडे नसतात. ते medio-cre, म्हणजे मध्यम, सरासरी दर्जाचे असतात. त्यांच्याजवळ उत्तम गुणग्राहकता असते. भक्त, अनुयायी, निष्ठावंत सेवक, फॅन्स हे सारे या गुणग्राहकतेतूनच निर्माण होतात. असामान्यतेने हे दिपतात, आकर्षित होतात, असंख्य वेळा त्या असामान्यतेचे अंकित होतात; विकृती म्हणजे गुलामही होतात. एका नेत्यामागे लाखो अनुयायी, एका बुवामागे लाखो भक्त ही स्थिती विकृतच म्हणावी लागेल; पण या मोहित होण्याच्या मुळाशी सामान्य माणसाची खरीखुरी गुणग्राहकता असते हे विसरून चालणार नाही

इतिहासच असे सांगतो की, सामान्यांची ही गुणग्राहकता बहुतेक असामान्यांनी स्वत:च्या व्यावहारिक फायद्यासाठी राबविली आहे. पुराणातरी श्रीकृष्ण आणि इतिहासांतरी छत्रपती शिवाजीमहाराज असे किंवा ज्ञानेश्वर-तुकारामादि संतासारखे काही मोजके अपवाद आपण सोडू; पण बहुतेक असामान्यानी सामान्यांना असे ओरबाडलेच आहे यात शंका नाही.

गंमत अशी की, आपण असे ओरबाडले जात आहोत, हे सामान्याना अर्धवट कळत-नकळत पण, जाणवत असते. या जाणिवेतून, असामान्यत्वाकडून नेहमीच होणाऱ्या या अपेक्षाभंगातून सामान्याचा द्वेष निर्माण होतो. दुबळेपणामुळे तो व्यक्त होत नाही, तो साचत जातो.

याच्याही मुळाशी मूलभूत जीवप्रेरणा आहे, कोणाही जीवमात्राला अटकाव, बंदी आवडत नाही. असा अटकाव, बंदी जाणवली की जीवमात्राची पहिली प्रतिक्रिया, आक्रमण करून बंदी तोडण्याचीच असते. नदीचे पाणी वाटेत आलेल्या शिळेला वळसा घालते; पण साधा विंचू, तो दगडावरही आपली नांगी मारणार. साधे लहान बाळ. अशा अटकावाच्या प्रत्येक क्षणी असे बाळ विलक्षण क्रूरतेने झगडा करते. पराभूत होणे, बंदी होणे, त्यातच सुखी होणे ही जीवाची मूळ प्रेरणा नाही. कारण असा अटकाव, अशी बंदी ही, 'जिवंत असणे' या मूळ स्थितीला विरोधी असते.

अशी बंदी जीव नंतर जी मान्य करतो ती समाजजीवनातील अपरिहार्यता म्हणून; पण असा पराभव मान्य करतानाच त्या पराभवासबंधी भयंकर चीड मनात निर्माण होते. आपण असे दुबळे का असावे, या प्रश्नाचा विषाद साचत जातो.

हा विषाद दूर होणे आणि स्वतःचे सामान्यत्व मान्य होणे ही पायरी अशक्य

मिसते; पण या पायरीसाठी समाजाची आणि विशेषत: समाजातील सामान्यत्व असामान्याची मदत आवश्यक असते. असामान्यत्व हा दोष समजला नाही तर अशी मदत त्याना करता येईल. यातून गुणवत्ता आणि गुणग्राहकता याचा परस्परसंबंध निर्माण होऊ शकेल.

ही परस्परता ध्यानता येणे आणि मान्य होणे ही आवश्यक गोष्ट आहे. खरे म्हणजे अशी परस्परता ही खरे समाधान देणारी वस्तुस्थिती आहे सामान्याजवळ त्याची त्याची विशिष्ट गुणवत्ता असते. या गुणवत्तेबाबत असामान्यानी गुणग्राहक असणे जरुरीचे आहे. वर शिवाजीमहाराजांचे उदाहरण दिले आहे. त्याच्या जोडीने लोकमान्य टिळक, महात्मा गाधी याचीही नावे आठवून पाहावी. हे थोर पुरुष सामान्याच्या गुणांबाबत कटाक्षाने गुणग्राहक होते म्हणूनच त्याचा जयजयकार करताना अनुयायांना आणि जनतेला स्वत च्या प्रतिष्ठेचा संकोच झाला असे वाटले नाही. उलटपक्षी आपली तोकडी गुणवत्ता त्याच्या मन पूर्वक आणि गौरवपूर्ण स्वीकाराने कृतार्थ झाली असेच त्यांना वाटले.

पण हे झाले अपवाद. स्वत च्या सामान्यत्वाला स्वत:च्या असामान्य गुणवत्तेवर स्वार होऊ देणारेच जास्त. असे असामान्य समाजजीवनाचा तोल बिघडवतात. स्वत:च्या असामान्यतेचे फायदे स्वत:ला, मुलाबाळाना मिळावे यासाठी झटतात. हे काही केवळ आपल्याच देशात होते असे नाही. अगदी क्रातिकारक रशियात व चीनमध्येही हेच होत आहे. चिनी कम्युनिस्ट नेत्याची पुढील पिढी आपले उच्च शिक्षण खास सवलतीखाली निवडक अमेरिकन विद्यापीठात घेत आहे. ब्रेझनेवचे अप्रतिवीर नेतृत्व मान्य करणाऱ्या नव्या प्रिसिडियममध्ये ब्रेझनेव याचे चिरंजीव व जामात याना स्थान मिळाले आहे (कम्युनिस्ट विरोधकानी विशेष आनंदित होण्याचे कारण नाही. जगातील सर्वांत जुनी लोकशाही ब्रिटनमधील. तेथे मध्यंतरी श्री. मॅकमिलन पतप्रधान होते. त्याच्या पहिल्या मत्रिमंडळात चर्चिल, ईडन व स्वत: मॅकमिलन याचे नातेवाईक महत्त्वाच्या जागावर होते.) म्हणजे असे की, असामान्य माणसात जो माणूस असतो त्याला वाटते की आपले असामान्यत्वही आपल्या मुलाबाळाना पुरवून-पुरवून खाता यावे.

समाजधारणेपासूनची कितीक शतके हीही इच्छा सामान्यानी पुरविली. वंशपरंपरा राजकीय गाद्या, धार्मिक गाद्या (establishment ला 'गादी' हा चागला प्रतिशब्द मिळाला!) सतांच्याही गाद्या–बिनतक्रार मान्य केल्या.

पण गेल्या दोन-चार शतकांच्या काळात ही बिनतक्रार 'स्वामी–निष्ठा' सपत आली आहे. त्याला प्रेरणा असामान्यांपैकी खऱ्या सज्जनानीच दिली आहे. याचे सर्व क्षेत्रातील एक चागले फळ म्हणजे कोठेही असामान्यत्व गृहीत धरण्यास आज सामान्य तयार नाहीत. वय, पदवी, घराणे, पद, अधिकार इत्यादी तपशिलाच्या आधाराने आजवर असामान्यत्वाची मिरास भोगता येत असे. आता ही मिरास संपली आहे.

सामान्यानी असामान्यत्व गृहीत धरणे जसे संपले तशी गृहीत असामान्यत्वाची टवाळी–टिंगल ही नवी प्रवृत्ती सामान्यात निर्माण झाली आहे. कोन्या मोटारीतल्या झुळझुळीत कपड्याची आणि तुकतुकीत चेहऱ्याची टवाळीच आज सर्वत्र आहे. 'ही सारी ऐट आमचे सामान्यत्व पिळून, ते कायम ठेवून चालली आहे. आम्ही तुम्हाला ती सुखाने भोगू देणार नाही!' अशी दातओठ खाऊन चीड सामान्यांच्या नजरेत आली आहे. त्या नजरेत नवे आव्हान, नवी धमकी आली आहे. आपला स्वत:चा वरचढपणा गाजवून पाहावा अशी ठुसठुस मनात आली आहे. अशा ठणक्याचे अपरिपक्व, बेजबाबदार आविष्कार म्हणजे खून, बलात्कार, दरोडे आणि इतर असंख्य विकृती.

साऱ्या जगात आज ही केवळ समस्या राहिलेली नाही. ती अत्यंत स्फोटक अशी आणीबाणी झाली आहे. निरनिराळ्या देशात निरनिराळ्या कारणांनी सामान्य–असामान्य असे वैर उधाणले आहे. वंश, जात, आर्थिक स्तर अशा अनेक कारणांनी निर्माण झालेली ही दरी आज कोयनेच्या शिवसागराच्या तळाशी असलेल्या प्रस्तर-भेगेसारखी दबावाने फाटायला आली आहे. एकदा का ही भेग फाटली की त्या प्रचंड भूकंपात नष्ट होणे एवढाच पर्यायउरेल! त्या प्रस्फोटक भूकंपाच्या आधीची पूर्वकपने अशा खुनानी किंवा खुनाच्या प्रयत्नांनी आपल्याला हल्ली जाणवत आहेत.

आजचे असामान्य या कपनांनी शहाणे झाले तर ते अजून हा प्रस्फोट टाळू शकतील. आपल्या देशात बाबा आमट्यासारख्याचे प्रयत्न याच दिशेने चालू आहेत. प्रश्न आहे, आमचे आजचे बहुसंख्य असामान्य सामान्याची आजची खरी अंत:प्रवृत्ती केव्हा जाणतील? □


## 'अक्षर दिवाळी' – १९८०

**१९८० च्या दिवाळी अंकातील कथा, कादंबरिका, कविता व्यंगचित्रे, ललित व वैचारिक लेख असे निवडक साहित्य**

संपादक मंडळ—य. दि. फडके, स. शि. भावे, आनंद यादव, प्र. ना. परांजपे, दिनकर गांगल

दि. १६–५–८१ रोजी प्रकाशित होणार.

डेमी आकार, सुमारे ४०० पृष्ठे, मूळ किंमत रु. ३२/–

मर्यादित प्रतीसाठी घरपोच सवलतीची किंमत रु. २२/–

११ प्रती मागविणारास नजिकच्या एस्. टी. अगर रेल्वेस्थानकापर्यंतच्या वाहतूक खर्चासह रु. २४२/– ऐवजी रु. २००/– फक्त

ड्राफ्ट अगर मनीऑर्डरने आजच रक्कम धाडा.

**विश्वकर्मा साहित्यालय** | २०३५ सदाशिव, टिळक पथ, पारिजातजवळ, पुणे ४११ ०३०.

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ इंदिराजींचे ताठर धोरण

विद्याचरण शुक्ला याना ज्या पद्धतीने इंदिराजीनी बडतर्फ केले त्या पद्धतीवर काही मंडळी खूष असली तरी त्याचे अनेक स्वपक्षीय सहकारी चागलेच हादरले आहेत. १९ मार्च रोजी इंदिराजीनी त्यांना बोलावून घेतले. पंधराएक मिनिटे त्यांच्या कारभाराचा खरपूस समाचार घेतला आणि दोन तासात राजीनामा देण्याची सूचना त्यानी शुक्लाजीना केली. राजीनामा हाती पडताच तो लगोलग राष्ट्रपती भवनात पाठवला आणि आकाशवाणी व दूरदर्शन यानी शुक्लाजी कसे नालायक होते याचा तपशील पुरवून त्यांच्या बडतर्फीचा सविस्तर वृत्तांत सादर केला. शुक्लाजीच्या हकालपट्टीबाबत पुरेसे भाष्य झाले असल्याने त्याबाबत पुन्हा काही लिहिण्याचे प्रयोजन नाही. परंतु शुक्लाजीच्या हकालपट्टीने एक गोष्ट निश्चितपणे स्पष्ट झाली आहे. बाईंनी आपले जुने ताठर धोरण पुन्हा स्वीकारले असून महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घ्यायचा आणि त्याची लगोलग अमलबजावणी करायची हे त्यांच्या कारभाराचे वैशिष्टय पुन्हा उफाळून आले आहे. माजी रेल्वेमंत्री कमलापती त्रिपाठी यांच्या राजीनाम्याचा घोळ महिनाभर चालू होता. शुक्लाजीच्या बाबतीत जी कारणे दिली जातात तीच कारणे त्रिपाठींच्या बाबतीतही होती; पण त्यांचा उदंड अनुनय करण्यात आला. खाते बदलून घेण्याबाबत सुचवण्यात आले. राजीनामा दिल्यावरही तो इंदिराजीच्याकडे तसाच पडून होता आणि अखेरीस कमलापतीजी काहीच ऐकण्यास तयार होईनात तेव्हा त्याना केवळ नाइलाजाने मोकळे करण्यात आले. शुक्लाजीच्या बाबतीत हा फालतू घोळ नाही. त्यांच्या संदर्भात बाईंनी स्वतःपुरता निर्णय घेतला, तो त्यांना सागितला आणि राजीनामा येताच लगोलग त्याना मोकळे करण्यात आले. पूर्वी इंदिराजीनी मोरारजीभाईंना ते उपपंतप्रधान व अर्थमंत्री असताना, ज्या पद्धतीने दूर केले होते, त्या पद्धतीशी शुक्लाजीची हकालपट्टी मिळती-जुळती आहे. शुक्लाजीबाबतचा निर्णय हा प्रामुख्याने पक्षाच्या मजबुतीसाठी केला असल्याने केंद्रामध्ये मंत्रिपद भूषवून राज्याचे राजकारण खेळणाऱ्या झैलसिंग, केदार पांडे यासारख्या मंडळीनी योग्य तो बोध घेतला आहे. वसंतदादा पाटिलांच्या तोंडी पुन्हा एकदा निराशेतून उद्‌भवलेल्या निवृत्तीची भाषा आली असून शंकरराव चव्हाण यानी आपल्याला मुख्यमंत्रीपदाबाबत रस नसल्याचे आवर्जून स्पष्ट केले आहे. इंदिराजी स्वपक्षीय मुख्यमंत्र्याच्या पाठीशी इतक्या मजबूतपणे उभ्या राहिल्या आहेत की, पक्षातर्गत राजकारण खेळून स्वपक्षीय मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला सुरुंग लावू पहाणारी मातब्बर मंडळी ठिकाणी आली आहेत. पक्षशिस्तीच्याबाबत कोणाची गय केली जाणार नाही, हे इंदिराजीनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. केवळ पक्षशिस्तीच्या बाबतीतच हे ताठर धोरण आहे असे नव्हे, तर राज्यकारभाराच्या बाबतीतही त्यानी त्वरित निर्णय व लगोलग अंमलबजावणी हे आपले धोरण कठोरपणे अमलात आणले आहे.

### आयुर्विमा संपाबाबत कठोर भूमिका

आयुर्विमा कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या संपाला जनतेची अथवा विमाधारकांची सहानुभूती नाही. शासनानेही या बाबत निश्चित निर्णय केले असून आयुर्विमा महामंडळाची पाच विभागांमध्ये विभागणी करणारे विधेयक लोकसभेने मंजूर केले आहे. आयुर्विमा महामंडळ आणि सार्वजनिक क्षेत्रामधील अन्य संस्था याच्या पगारामध्ये असलेली प्रचंड तफावत भरून काढण्यासाठी आयुर्विमा महामंडळाबाबत काही अप्रिय आणि कठोर निर्णय घ्यावेच लागणार आहेत. आज या महामंडळाचा तृतीय श्रेणीमधील कर्मचारी आपल्या वेतनश्रेणीच्या अखेरच्या टप्प्यावर दरमहा दोन हजार नऊशेबासष्ट रुपये उचलतो. भोपाळ हेवी इलेक्ट्रिकल्समध्ये हे प्रमाण एक हजार सहाशेसव्वीस रुपये तर एअर इंडियामध्ये हे प्रमाण एक हजार आठशेचौदा रुपये असे आहे. आयुर्विमा महामंडळाच्या बाबत ताठर धोरण स्वीकारण्याच्या सूचना इंदिराजीनी दिल्या आहेत. संपवाल्यानी दोन महिन्यांची तयारी ठेवली असली तरी सहजी त्यांना काहीही मिळणार नाही. आहे ते टिकवण्यासाठी आपली धडपड आहे, असा त्यांचा दावा असेल तर तोही मंजूर होणार नाही.

एकंदरीतच संप या प्रकाराबाबत इंदिराजीनी ताठर भूमिका स्वीकारली आहे बंगलोरमधील सार्वजनिक क्षेत्रामधील पाच मोठ्या कारखान्यांनी संप लावून धरला होता. सत्तर-पंचाहत्तर दिवसानंतर तो कठोरपणे मोडून काढण्यात आला. रेल्वेखात्यामधील लोकोमनच्या बाबतीतही असेच ताठर धोरण स्वीकारले गेले आहे. गुजराथमधील राखीव जागांच्याबाबत मागण्या घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांना इंदिराजीनी राखीव जागाबाबतचे निर्णय बदलता येणार नाहीत, हे स्पष्ट केले. तथापि हुशार विद्यार्थ्यांची कुचंबणा होणार नाही या दृष्टीने काय करता येईल हे आपण जरूर पाहू, असे सांगून त्यानी या मंडळीनी राज्याच्या मुख्यमंत्र्याबरोबर चर्चा करावी असा सल्लाही या मंडळीना दिला. आसाम प्रश्नाबाबतही इंदिराजीनी काही निर्णय मनोमन घेतलेले दिसतात. आंदोलकाना त्या अवाजवी कठोरपणे वागवत नसल्या तरी तडजोडीच्या मर्यादाही त्यांनी स्पष्ट केल्या आहेत.

### इंदिराजींच्या लोकप्रियतेमध्ये वाढ

इंदिराजीच्या नेतृत्वावर सर्वसामान्य जनतेचा विश्वास आहेच. तथापी जनतेला अपेक्षित असलेल्या काही गोष्टी त्यांच्या हातून झाल्या की, त्याच्या लोकप्रियतेमध्येही लक्षणीय वाढ होते. इंडियन मार्केट ब्युरो रिसर्चतर्फे करण्यात आलेल्या त्रैमासिक चाचपणीमध्ये इंदिराजींचा पाठपुरावा करणाऱ्या मंडळीमध्ये निश्चितपणे वाढ झाल्याचे दिसून येते. चवदा प्रमुख शहरातून केलेल्या या चाचणीमध्ये विविध क्षेत्रामधील पाच हजार आठशेपंचवीस व्यक्तीना, इंदिराजीच्या कारभाराबाबत तुम्ही समाधानी आहात का असमाधानी आहात, असा प्रश्न विचारण्यात आला असता, ५९% टक्के लोकानी आपण समाधानी असल्याचे सागितले. केवळ चार महिन्यापूर्वी म्हणजे नोव्हेंबर १९८० मध्ये केलेल्या चाचपणीच्या वेळी हे प्रमाण

केवळ ३९ टक्के होते. नोव्हेंबर ८० मध्ये त्यांच्या कारभाराबाबत सर्वांत जास्त नाराजी मुंबईमध्ये व्यक्त झाली होती. मुंबईमधील ज्या मंडळीकडे त्या वेळी विचारणा करण्यात आली होती त्या मंडळीपैकी ६४ टक्के लोकानी आपण त्यांच्या कारभाराबाबत समाधानी नसल्याचे मत नोंदले होते. तथापी आता म्हणजे मार्चमध्ये केलेल्या पाहणीत हे प्रमाण ६४ टक्क्यावरून एक्कावन्न टक्क्यावर घसरले आहे. नोव्हेंबर ८० मध्ये पाटणा येथे त्यांच्या कारभाराबाबत ज्या मंडळीकडे विचारणा करण्यात आली होती त्या मंडळीपैकी ५५ टक्के लोकांनी इंदिराजींच्या कारभाराबाबतची आपली नाराजी नोंदवली होती. आता केलेल्या पाहणीत हे प्रमाण ५५ टक्क्यांवरून ३७ टक्क्यापर्यंत खाली आले आहे. तर याउलट त्यांच्या कारभाराबाबत समाधानी असणाऱ्या मंडळीचे प्रमाण ३९ टक्क्यावरून ५९ टक्क्यावर गेले आहे. पाटणा आणि मुंबई येथील बदल महत्त्वपूर्ण असल्याने त्याची विस्ताराने दखल घेतली. तथापि त्यांच्या कारभारांवर पसंतीचा परिपूर्ण शिक्कामोर्तब श्रीनगरमध्ये पहावयास मिळतो. तेथील चाचपणीमध्ये ९० टक्के लोकानी आपल्याला त्यांचा कारभार पसंत असल्याचे सुस्पष्ट मत नोंदवले आहे.

केवळ शहरी भागातून करण्यात आलेल्या या चाचपणीला तसे प्रातिनिधीक म्हणता येत नसले तरी सार्वजनिक जीवनाबाबत जरा जास्त जागरूक असलेल्या मतदाराची ही चाचपणी, वारा कोणत्या दिशेने वाहतो आहे याची जाणीव करून देणारी आहे. चाचपणीमध्ये भाग घेणारी मंडळी प्रामुख्याने राजकीय निर्णयामुळे प्रभावित झालेली दिसतात. तथापि देशासमोरील गंभीर आर्थिक समस्याची कोंडी फोडण्याबाबत इंदिराजी जोपर्यंत यशस्वी होत नाहीत आणि वाढत्या महागाईला जोपर्यंत आळा बसू शकत नाही तोपर्यंत इंदिराजींच्या लोकप्रियतेबाबतचा निर्णायक कौल मिळणे अवघड आहे. पक्षशिस्थितीच्या धोरणाची कठोर अंमलबजावणी झालीच आहे. राजकीय परिस्थितीवर चांगली हुकमत पैदा केल्यावर आता भेडसावणाऱ्या आर्थिक आघाडीवरील प्रश्नाची सोडवणूक जर इंदिराजी करू शकल्या तरच हा लोकप्रियतेचा फुगा फुगत राहील, अन्यथा त्यातील हवा कमी झाल्याखेरीज रहाणार नाही !

## □ सिंधु सभेची स्थापना

सिंधी कल्चरल अँन्ड फाईन आर्टस फौंडेशन या नव्यानेच स्थापन झालेल्या संस्थेच्या पत्रकार परिषदेचे बोलावणे आले तेव्हाच ठरवून टाकले, अवश्य जायचे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत या समाजाने वाटचाल केली आहे. जेथे जेथे ही मंडळी गेली तेथे तेथे त्यांना विरोध झाला. कधी तो उघड असेल तर कधी सुप्त असेल; पण विरोध होता एवढे निश्चित. नको असताना चिकटून रहाणे आणि आपल्या अस्तित्वाची चुणुक दिसण्याइतके सामर्थ्यशाली बनणे ही काही साधी गोष्ट नव्हे. आज सिंधी समाज म्हटले की उल्हासनगर आणि पिंपरी डोळ्यांसमोर येते. पिंपरीचा परिसर सोडून उरलेल्या पुण्यामध्ये आज या मंडळीची संख्या जवळ जवळ तीस हजाराच्या घरात आहे. आपण एकत्र यावे, आपल्या समाजासाठी, तसेच इतरेजनासाठी काही करावे या भावनेतून ही मंडळी एकत्र आली असून त्यानी ' सिंधु सभा, पुणे ' ही संस्था स्थापन केली आहे.

आपला जसा गुढीपाडवा तसा या मंडळीचा ' चेटी चांद ! ' चेटी चांद म्हणजे सिंधी नववर्षदिवस. या वर्षी हा दिवस सात एप्रिलला होता. याच दिवशी त्यानी सिंधुसमाजाबद्दल माहिती देण्यासाठी पत्रकाराना बोलवले होते.

सिंधी समाजाबद्दल, आपली म्हणजे मराठी माणसाची प्रतिक्रिया काही चांगली नाही. लुच्चे लेकाचे, असाच सर्वसाधारण समज. प्रत्यक्ष माहिती करून घेण्याची फारशी उत्सुकता आपण कधी दाखवलीच नाही. सिंधी माणूस लुच्चा आणि कमालीचा गलिच्छ असा गैरसमज आपण सतत बाळगत आलो. विलक्षण प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत या समाजाने जे मोठे यश मिळवले आहे त्याचे आपल्याला कधीच कौतुक वाटले नाही. अत्यंत संपन्न असा हा समाज देशावर फाळणीची कुऱ्हाड कोसळताच रस्त्यावर फेकला गेला. हिंदुस्थान आपला मानून मंडळी येथे आली. देशभर विखुरली गेली. त्या वेळची म्हणजे ४७ सालची एक आठवण विष्णु सहानी यानी सांगितली. ते म्हणाले, ' त्या वेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री कै. बाळासाहेब खेर याना आमच्या समाजाची काही मंडळी भेटायला गेली. तुम्ही पाकिस्तान सोडायला नको होते, असा सल्ला मुख्यमंत्र्यानी दिला ! सिंधी कुटुंबाच्या ससेहोलपटीच्या अंगावर शहारा आणणाऱ्या सत्यकथा त्यांना आम्ही सांगितल्या. त्यांना वाईट वाटले; पण आपण फारसे काही करू शकणार नाही, हे त्यांनी लगोलग स्पष्ट केले. आमची मंडळी म्हणाली, जेथे काही धंदा-उद्योग करता येईल अशी जागा आम्हाला द्या ! बरीच खळखळ केल्यावर त्यांनी उरळी-कांचनला जागा द्यायचे कबूल केले. आमच्या लोकांनी जागा नाकारली. अखेरीस उल्हासनगरची जागा देऊ केली. आम्ही ती स्वीकारली. ज्या जागा देण्यात आल्या त्या कमालीच्या गलिच्छ होत्या. गुरांसाठी बांधलेले गोठे रिकामे करून आम्हाला देण्यात आले. तक्रार करण्याची सोयच नव्हती ! जे मिळेल ते स्वीकारून राहणे आवश्यक होते. उल्हासनगरमध्ये आमचा समाज स्थिरावला. उल्हासनगरचे नाव फारसे चांगले नसल्याचे कोणी बोलून दाखवले. त्यावर काहीसे चिडूनच सहानी म्हणाले, गोष्टी बोलायला सोप्या आहेत; पण खिशात पैसा नाही. उद्याच्या भवितव्याची खात्री नाही. रहायला धड जागा नाही. अशा परिस्थितीमध्ये संत्रस्त झालेल्या मंडळीनी आर्थिक कोंडी फोडण्यासाठी काही लांड्यालबाड्या केल्या असतील; पण ती काही आमच्या समाजाची वृत्ती नव्हे. मरायचे का जगायचे, असा प्रश्न समोर असताना, जगायचे निश्चित केल्यावर धडपड करणे आवश्यकच होते. एके काळी नकली माल पुरवण्याबाबत जपानही बदनाम होता; पण आज उत्कृष्ट दर्जाचा माल देणारा देश असा जपानचा लौकिक आहे. उल्हासनगरमधून आज बाजारपेठेमध्ये येणाऱ्या मालाचा दर्जा उत्तम असल्याचा दावा त्यानी केला.

सिंधी समाज हा काही धर्मवेडा समाज नव्हे. स्वतःच्या चालीरीतीबाबत हा समाज आग्रही असला तरी देशाच्या कोणत्याही भागात सामावून जाण्याची क्षमता या समाजामध्ये आहे. वरुण देव झुलेलालचे पूजन महत्त्वाचे असले तरी, शिखांच्या गुरुद्वाराप्रमाणे याची प्रार्थनामंदिरे असतात. गुरु नानक यांचा जन्मदिवस या समाजातर्फेही साजरा होतो. हिंदू देव-देवताचे पूजन ही मंडळी करतात. विशेषतः गणेश व शिव-पार्वती ही त्याची दैवते. सत्यनारायणाची पूजाही या समाजात घातली जाते, केली जाते. आपल्या समाजाबद्दल ही मंडळी अतिशय आपुलकीने बोलत होती; मराठी मंडळीना

महाराष्ट्र आहे. गुजराथी मंडळींना गुजराथ आहे. तेलगू, तामीळ भाषिकांना त्यांची त्यांची राज्ये आहेत ! आमचा एकच समाज असा की जो संख्येने मोठा ! परंतु त्यांना स्वतःचे राज्य नाही; देशभर ही मंडळी विखुरली आहेत. जेथे राहतील तेथील समाजात मिळून-मिसळून राहतील; पण हे असेच चालू राहिले तर दोन पिढ्यांमध्ये आपला समाज नामशेष होऊन जाईल असे त्यांना वाटते. पंजाबी व मुस्लिम समाजाचा त्यांच्यावर पगडा असला तरी अजून जुनी मंडळी सिंधी समाजाची वैशिष्ट्ये टिकवून धरून आहेत. आपण काही हालचाल केली नाही तर आपला समाज बघता बघता विरून जाईल, *अशी भीती त्यांना वाटते.* सिंधी भाषेला मान्यता असली तरी सिंधी साहित्य आणि सिंधी भाषेचा अभ्यास याबाबत उपेक्षाच होते. इतरांकडून तर होतेच, पण आमच्या समाजाकडूनही होते, असा त्यांचा दावा आहे. या समाजामध्ये धनवान मंडळी आहेत. केवळ व्यापार-उदीम करणारी मंडळी, असे या समाजाचे जे चित्र रंगवले जाते ते बरोबर नाही, असे आम्हाला आग्रहपूर्वक सांगण्यात आले. केवळ पुण्यापुरते बोलायचे झाले तर निम्मा समाज व्यापार-उद्योगात गुतला असला तरी पन्नास टक्के मंडळी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात आज नोकऱ्या करतात.

स्वसमाजाच्या विलयाची भीती वाटून आज ही मंडळी एकत्र आली असली तर ते स्वाभाविक मानावे लागेल. त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या कामासाठी समाजामधील अनेक मंडळी पुढे सरसावली आहेत. वेळेचा प्रश्न त्यांनाही आहे; पण काही निष्ठा असल्याखेरीज अशा स्वरूपाचे काम होऊ शकत नाही अशी धारणा असल्यानेच अतूर संगतानी, बल्ल अजवानी, गोपालदास मनवानी, ईश्वरलाल अहुजा, विष्णु सहानी यांच्यासारखी मंडळी पुढे सरसावली आहेत. आपल्या समाजामधील व्यक्तींची माहिती व पत्ते एकत्र असलेली एक डिरेक्टरी त्यांनी गेल्याच सप्ताहामध्ये प्रकाशित केली असून या संस्थेतर्फेच गेल्या सप्ताहामध्ये झुलेलालच्या पूजेअर्चेचा कार्यक्रम, तसेच करमणुकीचे अन्य कार्यक्रम सादर करण्यात आले. प्रसिद्ध संगीतदिग्दर्शक बुवो सी. रानी यानी या कार्यक्रमामध्ये भाग घेतला होता. सिंधु कल्चरल अँन्ड फाइन आर्टस फौंडेशन या संस्थेने अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या आहेत. श्री. सहानी म्हणाले, जागेची गरज पूर्ण करण्याच्या पाठीमागे आम्ही आहोत. चांगली जागा मिळाली तर पैसा उभा करणे फारसे अवघड जाणार नाही. बहुउद्देशीय सभागृह बांधणे, निवृत्त मंडळींना निवारा उपलब्ध करून देणे, सिंधी भाषा, वाङ्मय, संस्कृती व कला यांची जोपासना व अभ्यास व्हावा म्हणून स्वतंत्र संस्था स्थापन करणे, सिंधी समाज-जीवनाचे प्रतिबिंब असलेले म्यूझियम उभारणे, सिंधी समाजाचे उर्वरित समाजाशी उत्तम संबंध प्रस्थापित व्हावेत यासाठी प्रयत्न करणे यासारखी उद्दिष्टे या नवीन संस्थेसमोर असून उत्साहाचा पहिला बहर असल्याने मंडळी कसून कामाला लागलेली दिसतात.

## □ रणजी करंडक स्पर्धेमध्ये मुंबई विजयी

देशामधील सर्वोत्तम क्रिकेटखेळाडू मुंबई संघाजवळ असले तरी या खेळाडूंना भारतीय संघामध्ये स्थान असल्याने भारतीय संघ दौऱ्यावर असेल तर देशातर्गत सामने खेळण्याची जबाबदारी दुसऱ्या फळीवर येऊन पडते. या वर्षीच्या रणजी करंडकस्पर्धांचे वेळी, भारतीय संघ ऑस्ट्रेलिया-न्यूझिलंडच्या अयशस्वी ठरलेल्या दौऱ्यावर असल्याने, रणजी करंडक स्पर्धेसाठी, मातब्बर मंडळी संघाला उपलब्ध नव्हती आणि तरीही या संघाने चांगले लक्षवेधी यश मिळवले. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष दुसऱ्या फळीमधील खेळाडूंनी रणजी करंडक खेचून आणून साजरे केले. रणजी करंडकस्पर्धेमधील अंतिम सामन्यात मुंबईला दिल्ली संघाबरोबर टक्कर द्यावी लागली. साखळीस्पर्धेच्या पहिल्या फेरीतून बाहेर पडताना दिल्ली संघाच्या नाकी दम आला होता. उपांत्यपूर्व व उपांत्य सामन्यात प्रतिकूल परिस्थितीवर मात करून दिल्ली संघाने अंतिम फेरीमध्ये प्रवेश मिळवला खरा; परंतु अंतिम सामन्यात दिल्लीची डाळ शिजू शकली नाही. परदेशी दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाच्या न्यूझिलंडमधील केविलवाण्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर रणजी करंडक स्पर्धेमधील अंतिम सामन्याचे मूल्यमापन केले पाहिजे आणि भारतीय संघाची निवड करताना काय बदल केले पाहिजेत हे तपासून पाहिले पाहिजे. पराभूत दिल्ली संघाच्या बाजूने विचार केला तर मदनलालची कामगिरी खचित नजरेत भरते. त्याने ११८ धावा देऊन ८ गडी बाद केले. तसेच दुसऱ्या डावात आपल्या संघाची पडती बाजू सावरण्याचा प्रयत्न केला. दिल्लीचे चार फलंदाज केवळ ८४ धावा जमवून परत आले असताना मदनलाल आला. त्याने ७६ धावा केल्या. ज्या पद्धतीने तो फलंदाजी करत होता ती पद्धत लक्षात घेता तो दिल्लीला डावाच्या पराभवापासून वाचवू शकेल असे वाटले होते. त्याने यष्टिरक्षक सुरेंद्र खन्नाबरोबर पाचव्या विकेटसाठी ११८ धावाची भागीदारी केली खरी; परंतु जोडीदार खन्ना बाद झाल्यावर मदनलाल फार वेळ टिकाव धरू शकला नाही. या सामन्यात विजयी मुंबई संघातर्फे खेळणाऱ्या अशोक मंकडने २६५ धावा करून आपली सर्वोत्तम धावसंख्या नोंदवली. तसेच आपल्या संघाचा विजयही निश्चित केला.

दौऱ्यावरून परतलेल्या भारतीय संघाच्या कामगिरीवर नजर टाकली तर गावस्कर, विश्वनाथ, वेंगसकर, यशपाल शर्मा या बिन्नीच्या फलंदाजानी घोर निराशा केली हे मान्य करावेच लागेल. विशेषत: विश्वनाथचे अपयश खुपणारे वाटले. येत्या हिवाळ्यात इंग्लंडचा संघ भारताच्या दौऱ्यावर येत आहे. त्या वेळी संघाची निवड करण्याचे काम तसे अवघड असले तरी काही धाडसी फेरबदल करणे आवश्यक वाटते. विश्वनाथला फार तर एक सामना खेळू द्यावे आणि तो जर निष्प्रभ ठरला, तर त्याची उचलबांगडी करून रणजी करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात २६५ धावांचा डोंगर रचणाऱ्या अशोक मंकडला फेरसंधी द्यावी. अशोक मंकडची शिफारस निर्दोष आहे असे नव्हे. विशेषत: रणजी करंडक स्पर्धेमधील त्याची धावसंख्या लोभस असली तरी खेळ, विशेषत: फुटवर्क काही अपेक्षेइतके चांगले नव्हते. बंपर्सला तोंड देणेही त्याला अवघड जात होते; पण विश्वनाथ जर २०–२५ धावाच करत असेल तर असा बदल करून पाहणे गैरसोयीचे निश्चितच नाही. मदनलालच्या फलंदाजीतही बंपर्सला तोंड देण्याचे सामर्थ्य नाही. तरीही दौऱ्यावरील अन्य खेळाडूंपैकी रॉजर बिन्नीने इतकी निराशा केली आहे की, त्याला उचलून त्याच्या जागी मदनलालची शिफारस करणे अगत्याचे वाटते. अंतिम रणजी करंडक सामन्यात शतक झळकावणाऱ्या गुलाम पारकरनेही कसोटी सामन्यात समावेश होण्याइतपत योग्यता सिद्ध केली आहे तथापि गावस्कर, चौहान व श्रीनिवासन असताना या आघाडीवीराची वर्णी लागणे अवघड दिसते. एक मात्र निश्चित की, इंग्लंडच्या संघाच्या या आगामी दौऱ्याच्या वेळी जास्तीत जास्त खेळाडूंना संधी देण्याचा प्रयत्न निवडसमितीकडून केला जाईल. □

श्यामचा संसार (कथा आठवी)

फिरोझ रानडे

# श्यामच्या मुलीचे लग्न होते त्याची कथा

'अंजूच्या लग्नाची मला फार काळजी आहे बाई!' एका संध्याकाळी राधा मेथीची भाजी निवडता निवडता श्यामला म्हणाली. बायकाना कोणत्याही गंभीर विषयावर व बराच वेळ चालणारी चर्चा करावयाची असेल तर त्या साधारणतः मेथीची भाजी निवडायला घेतात असे श्यामने पाहून ठेवले आहे.

अर्थात अंजूचे लग्न हा काही तसा काळजी करण्यासारखा विषय नव्हता; पण ज्या वेळी राधाला काळजी करण्यासारखे काही उरत नसे वा आठवत नसे त्या वेळी घरात फार खर्च होतो व अंजूचे लग्न कधी होणार ह्याची ती काळजी करत असे

घर-खर्च हा एक असाच राधाचा काळजी विषय की ती तो केव्हाही काढत असे. ह्यात घर-खर्चाची काळजी असेच; पण त्याहीपेक्षा आपण जेवढी काटकसर करू पहातो तेवढी काही नवरा, मुलं करत नाहीत व मुलगी तर बिलकुलच नाही, असा राधाचा भाव असे; पण घर-खर्च कमी करावयाचा तर त्याचा खर्च करताना विचार नको का करायला? मेथी निवडता-निवडता खर्च कसा कमी होणार?

घर-खर्चाबाबत श्यामचे असे स्वच्छ मत होते की, जेवढा पगार मिळतो तेवढा खर्च होणार. पगार कमी मिळत असता तर खर्चही कमी झाला असता; पण राधाला हे श्यामचे मत म्हणावे तेवढे स्वच्छ वाटत नसे. असो.

पण राधाचा आजचा चर्चेचा विषय घर-खर्च नसून अंजूचे लग्न हा होता व राधाने ज्या तऱ्हेने चेहरा गंभीर केला होता त्यावरून व मेथीची भाजी निवडायला घेतल्यावरून ते स्पष्ट दिसत होते.

बायकाचा मूड चागला असेल त्या वेळी त्या मटार सोलायला घेतात. त्यात नवऱ्याला व मुलांना सहभागी होता येतं व नवऱ्याने व मुलानी मधून मधून मटार खाल्ले की कौतुकाने 'अहो, असे मटार संपवलेत तर उसळ करू तरी कसली?' असे म्हणता येते. मटार सोलताना चारगट विनोद करता येतात व बायकोला हसू आणता येते; पण मेथीची भाजी अशी सामुदायिक निवडण्याची भाजी नाही. ती फक्त बायकाच निवडू शकतात. त्यामुळे घरातली सगळी जबाबदारी आपल्यावरच फक्त कशी आहे हे त्या नवऱ्याला, मुलांना दाखवू शकतात. दुसरं असं की, बायकोच्या मनात असेल तर मेथीची भाजी एक मिनिटात निवडून होते नाही तर त्यालाच अर्धा-पाऊण तास पण लागतो. म्हणून तर बायका गंभीर चर्चेच्या वेळी मेथीची निवड करत नसतील ना?

'अहो, मी म्हणत होते की अंजूच्या लग्नाची मला फार काळजी वाटते बाई!' राधा परत एकदा विषय डिवचून म्हणाली.

'अग, पण तुझे वडील म्हणतात ना नेहमी की लग्न ही योगायोगाची गोष्ट आहे म्हणून! आपण काळजी करून काय होणार?'–श्याम.

'माझ्या वडलांनी म्हटलेले सोयीचे तेवढे बरे लक्षात रहाते? ते नेहमी काटकसरीने रहा–या डिपार्टमेंटच्या परीक्षा द्या असे सांगतात. ते काही लक्षात रहात नाही!' राधा रागाने म्हणाली.

'अग...पण...मी' श्याम तत-पप करू लागला. गाणारे गाताना मधूनच 'सरगम' का काय करतात ना, तसं श्यामचं राधाशी व साहेबाशी बोलताना बऱ्याच वेळा असे 'सरगम' होत असे. गाणाऱ्याच्या सरगमवर श्यामने एक दंतकथाही रचली होती.

एकदा एक गाणारा असाच गायला बसला. माऊन थोडा वेळ झाला तेवढ्यात त्याची बायको तेथे आली. सकाळी बायकोने काही आणायला सागितले होते ते गवईबुवा विसरून गेले होते. मग बायकोला बघताच त्याची तत-पप सुरू झाली. आता शागीर्दांसमोर व लोकांसमोर नाचक्की होणार ह्या धास्तीने जास्तच तत-पप होऊ लागले. मग त्यांनी त्या तत-पपला 'ऑफीशिअल' स्वरूप देऊन त्याचा 'सरगम' केला.

राधा चांगल्या मूडमध्ये होती त्या वेळी श्यामने ही दंतकथा तिला सुनावली होती; व त्या वेळी राधा खूप हसलीपण होती. पण आता तशा काही दंतकथा सांगायची वेळ नव्हती नाही तर काळ आला असता.

साधारणपणे श्यामला दोन तीन मिनिटे सरगम करू दिल्यावर राधा म्हणाली, 'मी काय म्हणते त्याचा गंभीरपणे विचार करा. उगाच योगायोग व फालतू विनोद नकोत!'

'बरं, मग काय म्हणतेस तू?'

'मी काही म्हणत नाही. मुलगी तुमची-तुम्ही लग्न करणारे. मी कोण बोलणारी? पण रहावत नाही म्हणून परत परत बोलायला जाते. तुमची ही तऱ्हा आणि तुमच्या मुलीची दुसरी तऱ्हा!' राधा अशा स्वरात बोलली की जो फक्त जाणकारच जाणू शकेल. (अजाणकारानी आताच जाणलं नाही तरी चालेल. योग्य वेळ आली की त्यांना कळेलच)

'काय बाई आहे पहा! आता म्हणत होता की मी काय म्हणते ते ऐकून घ्या!' श्याम म्हणाला. अर्थातच मनातल्या मनात. आता माणसाने काय करावे? अर्थात हे सर्व मनाशी बोलणे असल्यामुळे राधाला श्याम चुप बसला आहे असे वाटले म्हणून ती म्हणाली, 'आता का मुलीचा विषय निघाल्यावर दातखिळी बसली? मुलीला बोललेलं आवडलं नसणार!'

एक वेळ हिंदुस्थानातल्या सगळ्या जाती-जमाती गुण्यागोविंदाने नांदू लागतील पण आई व मुलगी व तीही वयात आलेली मुलगी, गुण्याच काय पण नुसतं गोविंदाने पण नादू शकणार नाहीत! असे का होत असावे ह्याचा श्याम पुष्कळ वेळा विचार करी. आई एक देव मानणारी, तर मुलगी ६३ हजार देव मानणारी. आईला तिखट आवडत असेल तर मुलीला अजिबात तिखट नको. मुलीला काळा रंग आवडत असला तर आईला

पांढरा ! अशी किती उदाहरणे द्यावीत ?

ह्यात आणखी एक म्हणजे बायकोला नेहमी वाटत असते की नवरा मुलीच्या बाजूचा व आपल्या मनाविरुद्ध वागण्यास मुलीला फूस लावत असतो

अजूनही श्याम चुपच होता; पण त्याबद्दल राधा काही न बोलता पुढे म्हणाली, 'अहो, अंजू मागल्या वर्षी बी.ए.झाली. एकवीस वय झालं तिचं. आतापासून स्थळ बघायला लागू तेव्हा तेवीस–चोविसाव्या वर्षी लग्न होईल आणि आज-काल लग्नाला पैसा किती लागतो कल्पना आहे का ?'

'पण आपण लग्नाला जास्त पैसा खर्चच करावयाचा नाही आणि आता हुंडाविरोधी मोहीम, स्त्री-स्वातंत्र्याचा लढा त्यामुळे मराठी सुशिक्षित लोकांत हुंड्याचे प्रमाण कमी झाले असणार ! '–श्याम.

राधा श्यामकडून अशा उत्तराची वाटच पहात होती जणू. चवताळून ती म्हणाली, 'अहो, त्या सगळ्या बोलायच्या गोष्टी ! अशिक्षित हुंडा घेत असतील तर सुशिक्षित हुंडा नको, पण मानपान हवेत, घेणे-देणे हवे व 'पोझिशनला'ला योग्य असे 'रिसेप्शन' हवे म्हणून पैसा उकळतात ! 'पोझिशन' त्याची पण पैसा खर्च करायचा मुलीच्या बापानं ! मी म्हणते कमीत कमी तीस हजार रुपये खर्च येईल !'

'काय तीस हजार रुपये ?'–श्याम.

'हो, कमीत कमी तीस हजार रुपये !' श्यामला बिचकलेला पाहून राधाला खूप आनंद झाला. असं बिचकावून बिचकावून तिला श्यामला अंजूच्या लग्नाचा प्रश्न किती गंभीर आहे ते दाखवायचे होते. त्याला आणखी बिचकवण्याकरता ती पुढे म्हणाली, 'अहो, हा फक्त लग्नाचा खर्च, त्यात आणखी रिसेप्शनचा खर्च, देण्या-घेण्याचा खर्च. माझं ऐका सगळे मिळून पंचेचाळीस हजार रुपये खर्च येईल !'

'अबब, एवढा खर्च येईल ?' पूर्वीचे लोक आश्चर्य दाखवण्याकरता 'अबब'चा सर्रास उपयोग करत असत तसे श्यामने करून आश्चर्य दाखवले.

'तर काय ?' राधा म्हणाली. राधाचे आता विषयाचे गांभीर्य पटवून झाले होते. आता प्रश्नाची निकड किती आहे हे पटवावायचे राहिले होते. म्हणून तिने भाजी निवडण्याचे थांबवले व म्हणाली, 'अहो. पंचेचाळीस हजार रुपये ह्या वर्षी लग्न केले तर, दर दिवसागणिक किंमती काय वाढताहेत बघता आहात ना ? ह्याच लग्नाला दोन वर्षांनी साठ ते पासष्ट हजार रुपये खर्च येईल बघा.'

आता श्यामला अबब म्हणायचं पण भान राहिले नाही. एवढे मोठाले आकडे डॉलर्सचे असतील कदाचित्; पण त्याने वर्ल्ड बँक वेगळ्या वेगळ्या देशाना कर्ज देते त्या संदर्भातच फक्त असले आकडे वाचले होते; पण आपल्यालाही असा पाच आकडी खर्च करायला लागेल अशी त्याला कल्पना नव्हती.

हे सगळे भाव श्यामच्या चेहऱ्यावर दिसलेले पाहून राधाला योग्य ते समाधान वाटले.

'अहो, उगाच का मी अंजूच्या लग्नाची काळजी करते ?'

'बरोबर आहे तुझं काळजी करणं !' श्याम नेहमी खरखरीत लागणारा टर्किश टॉवेल ओला झाल्यावर जसा मऊ लागतो त्या आवाजात म्हणाला, 'आता ह्या आठवड्यातच पुण्याच्या, नाशिकच्या सगळ्या नातेवाइकांना लिहतो. ऑफिसमधल्या वयस्क लोकाना सांगून ठेवतो.'

मग राधाचे व श्यामचे ह्या लग्नाच्या मोहिमेत कोणाकोणा नातेवाइकाची मदत होईल, ह्याबाबत बोलणे सुरू झाले. त्यातली एक तऱ्हा अशी की, श्यामने आपल्या कोणा नातेवाइचे नाव सुचवले की, राधा म्हणावयाची, 'त्याचं नका सांगू काही. अडी-अडचणीला उपयोगी पडणारी माणसं नाही आहेत ती !' तेव्हा यादीत फक्त राधाच्या माहेरची माणसं व इतर लोक ह्याचाच समावेश झाला.

तोपर्यंत राधाचं मेथी निवडणं संपलं होतं. भात व मेथीची पातळ भाजी खाऊन आज आपण एक खूप मोठे काम पार पाडले, ह्या भावनेने ते कुटुंब झोपी गेले.

अंजू पुण्याला एका होस्टेलमध्ये गेले तीन–चार वर्षं राहात होती. पुण्याला राधा-श्यामचे चिक्कार नातेवाइक होते. पुण्याला होस्टेलमध्ये राहणाऱ्या व चिक्कार नातेवाइक असलेल्या मुलीचे जे होते तेच अंजूचे झाले. म्हणजे त्या चिक्कार नातेवाइकातल्या एका योग्य मुलावर तिचे प्रेम बसले व त्यानी लग्न करावयाचे ठरवले.

एक दिवस श्याम घरी आला तर राधा अगदी खूष होती. आंबोळ्या का काय ते चहाबरोबर खायला केले होते. श्याम चहा पीत असताना राधा म्हणाली, 'मी नेहमी म्हणते की माझी मुलगी मोठी गुणाची व भाग्याची आहे म्हणून !'

श्यामला चहा पिता पिता ठसका लागला. राधाचे हे मत व हृदयपरिवर्तन कसं, केव्हा व का झालं हे त्याला कळेना; पण शहाण्या माणसाने बायकोला काही विचारू नये. न विचारता आपणहून बायका जेवढी माहिती देतात तेवढी काही विचारल्यावर देत नाहीत. म्हणून श्याम आपला ठसका वाढवत राहिला.

'मी नेहमी म्हणत नसे का की अंजूच्या लग्नाची मला काळजी अशी नाही आहे म्हणून ? अहो, पोरीनं नशीब काढलं ! आज दादाचे पत्र आले आहे. आपली विजूमावशी आहे ना ? माझी मावसबहीण हो, तिच्या मुलाच्या- अविनाशच्या– ती प्रेमात पडली व त्याच्याशी लग्न करायचं म्हणते आहे ती !'

होणार होणार म्हणता म्हणता अंजूचे लग्न झाले. सासरची मंडळी पुण्याची असूनही सरळ-साधी होती. त्यामुळे लग्नात मानपान-हुंडा, रुसणी-फुगणी काही न होता, लग्न अगदी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. अंजू सासरी गेली; पण मावशीच सासू असल्यामुळे ते 'सासर' असे कधी वाटलेच नाही तिला.

काही दिवसानंतरची गोष्ट. एक दिवस श्याम संध्याकाळी घरी आला, बघतो तो काय ? राधा मेथीची भाजी निवडत होती. श्यामने अजाणता विचारले, 'आता परत मेथीची भाजी ?'

'अहो, अंजूचे सासरी कसे होणार याची आता मला काळजी लागली आहे !'

खरे म्हणजे काळजी करण्यासारखे काही नव्हते, हे राधालाही चांगले माहीत होते व श्यामला पण माहीत होते; पण श्यामला एवढाच आनंद होता की राधाला काळजी करायला विषय मिळाला. म्हणून तो म्हणाला,'

'बरोबर आहे तुझे काळजी करणे'

□

पुस्तके

# डोळा पहाट माझ्या होती तशीच आहे

—संजीवनी

'मी दिवाणी !' संजीवनीबाईंचा नवा काव्यसंग्रह अचानक हाती येतो. कुतूहल वाटतं. मुखपृष्ट कुणाचं ? प्रथम तो गडद निळा व मग फिकट निळा, मग पांढुरका रंग मनात भरतो. बीजेची वाटावी अशी रेखीव चंद्रकोर आणि चार-दोन रेषांमधून वेडावणारा चेहरा. अस्पर्शाला व्यक्त करण्याची ही परिचित वाटणारी चित्रशैली कुणाची ! पद्मा सहस्रबुद्धे तर नव्हे ? महाराष्ट्र टाइम्सवरची मागच्या दोन वर्षांच्या दिवाळी अंकांची मुखपृष्ठं आठवतात. पान उलटून पाहते तर तेच नाव.

या संग्रहाचं नाव मात्र खास संजीवनीबाईंच्या शैलीतलं. त्यांच्या काव्यसंग्रहालाच ठेवावं असं. 'चंद्रफूल', 'चित्रा', 'परिमल' यांच्या रांगेत शोभून दिसेल असं. 'चित्रा'पूर्वीचे किती संग्रह असतील ? मी माझी पुस्तकं शोधून काढते. 'काव्यसंजीवनी' पहिला. मग 'राका', 'संसार' आणि 'छाया'. असे तीन. नंतरचे हे तीन–चार. शिवाय गीतांचे दोन संग्रह, बालगीते. एकूण दहा–पंधरा संग्रह झालेच की ! किती वर्षं लिहिताहेत बाई ! मी पुस्तक उघडून पाहते. जन्म १९१६.

१९३२ साली कोल्हापूर साहित्यसंमेलनात बाईंनी कवितावाचन केलं. त्यालाही आज सुमारे ५० वर्षं होत आली. मराठी कवितेच्या या मधल्या अर्धशतकात किती तरी पाणी वाहून गेलं. स्वातंत्र्य मिळालं. मर्ढेकराची कठीण, निर्मम नवता प्रचंड पाणलोटासारखी फुसाडत आली. जीवनानं नव्या युगाशी हातमिळवणी करण्याकरता किती धडपड केली ! किती मूल्यांची पडझड झाली. सासारिक आणि सामाजिक जीवनात काय काय बदलन गेलं...

बाईंच्या कवितेत याचे धक्के कसेकाय नाही जाणवले ? पाडगावकराच्या 'धारानृत्या'त आणि 'सलाम'मध्ये केवढा फरक आहे, बदल आहे. बाई अशा बदलल्या आहेत का ? नाहीच. त्याची काव्यविषयक जाणीव विस्तारत गेली आहे; पण जीवनाकडे पहाण्याची, अनुभव घेण्याची त्याची शैली कशानेही बदललेली नाही. त्यांनीच म्हटले आहे ना, 'मला वाटायचे—अजूनही वाटते, की कलावंताला सदैव स्वप्नाच्या सावलीत राहता यावे. प्रत्यक्षाला सतत सामोरे जाण्याचे दिव्य त्याला करायला लागू नये.'

बाई अशा स्वप्नांच्या सावलीतच गेली ५० वर्षे कवितेत रमल्या आहेत. वास्तवातले सगळे विदारक रंग त्याच्या स्वप्नानी सुंदरतेत परावर्तित केले आहेत. आतून उद्ध्वस्त होण्यापासून मोडून-तोडून-चुरगाळून जाण्यापासून त्याना वाचवणारा एक रोमँटिक स्वप्नमयतेचा कोष त्यांच्या कवितेभोवती इंद्रधनूसारखा फिरत राहिला आहे. पन्नास वर्षं झाली. त्याला जराही धक्का लागलेला नाही.

'दान देणार असलीस तर ते स्वप्नांचंच दे आई।

सत्याची भाकर मला पचणार नाही गं नाही। —' हे त्यानी 'चंद्रफूल'मधे म्हटले नव्हते का ? आणि

माध्यान्हीचा वरुनी जरि सूर्य तापताहे।

डोळा पहाट माझी होती तशीच आहे।'

हे इथेही म्हटलेले आहेच ना !

या स्वप्नजिण्याला सतत उद्गार देणारी बाईंची कविता गेल्या पिढीत किती लोकप्रिय होती! येता—जाता, रेडिओवर, काव्यमैफलीत त्याचा आवाज, त्यांची भावमधुर गाणी ऐकू येत. पु. शि. रेगे, सदानद रेगे, दिलीप चित्रे, खानोलकर हे सारे तेव्हा जीवनाच्या वासलेल्या जबड्यात काळाच्या सवेदना खेचून नेत होते. जगण्याला भिडणारे त्याचे शब्द थरारून—झपाटून टाकत होते. अस्वस्थ करीत होते. त्या काळात, (त्याआधी आणि त्यानंतरच्याही काळात) पद्माताईंच्या बरोबरीने सजीवनीबाईंची कविता काव्यगायनाच्या मैफली धुद करीत होती. लय-तालाचे घुगुर बाधून भावविभ्रमानी मोहित करीत होती.

आजच्या पिढीच्या कवितेत हा रोमँटिक रंग सापडणार नाही. गीतरचनेचा हा लोभसवाणा साचा मिळायचा नाही आमच्या जगण्याने आम्हाला सौदर्यवादाशी रेंगाळू दिलेच नाही. आम्ही असह्य ताणानी भरलेल्या जीवनात एक खेचाखेच, एक ओढाताण घेऊन उतरलो आहोत. बाईंचा स्वप्नकोष आजच्या नव्या कवितेला सोसणारा नव्हे. नित्याचे धक्के आणि हादरे अनुभवून, खोल मनाचा शोध घेऊन आजचे कवी, वास्तव सन्मुख कवितेत सर्वस्व ओततहेत. त्यांना अनोळखी वाटेल का हा बाईंचा नवा संग्रह? पण काव्यवाचकांना मात्र बाईंचा शब्द, बाईंची ओळ परिचित आहे. 'पोळणारी वाट आहे येथली । सोबतीला दे कृपेची साउली ॥' हा आर्त सहजभाव, 'अजून झुलणे सरले नाही' चा बेभान क्षण, 'नजर एकटक बघता वरती । असाच काचनकळस दिसावा ॥' ही चिरवाञ्छा—सगळे ओळखीचे तर आहे. सासारिक जीवनातली सुख—दुःखं वेचणारी, प्रेमात आणि ईश्वरी श्रध्देत रंगून जाणारी, हर्षामर्षांना जोजवून वत्सलतेने कुरवाळणारी बाईंची शब्दकळा त्याच परिचयाच्या कोवळिकीने मनात येणारी आहे.

आणखीसुध्दा एक आहे. संग्रहाच्या शेवटी बाईंचे स्वतःच्या काव्यप्रवासाविषयीचे निवेदन आहे, प्रामाणिक. अगदी आजवरच्या त्याच्या काव्यनिर्मितीवरून आपण त्याचा जशी अपेक्षा करू तसेच. बाईंनी त्यात शेवटी म्हटले आहे —'मला कधीकधी ह कवित्वाचे ओझे जड वाटते.' — खरेच अस कधी झाले असेल का ? त्याच्या कवितेतून तरी असे झालेसे कधी वाटले नाही. ता आकात कुठे यापूर्वी दिसला नाही. या सग्रहातही नाही; पण त्या पुढे म्हणतात का, 'क्षणार्धात पुन्हा मी विलक्षण कळवळ्यांने आपल्या कविवृत्तीत मग्न होऊन जाते—' हे मात्र जाणवते. दिसते.

या अद्यापी असलेल्या काव्यमग्नतेतून आणखी एक सग्रह बाहेर येईल ? कवितेचे ओझे जड होतानाचा आकातही त्यात सापडेल ? मी वाट पहायचे ठरवले आहे.

—अरुणा ढेरे

मी दिवाणी : (काव्यसग्रह)
सौ. सजीवनी मराठे
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : ८८, मूल्य : ८ रुपये.

# माळ

## चित्रमय कथांचा संग्रह

'माळ' हा श्री. विद्याधर पुंडलीक यांच्या अकरा लघुकथांचा संग्रह आहे. या लघुकथांचे विषय विविध आहेत. यात वारीला जाणाऱ्या स्त्री-पुरुषांची ओली जवळीक आहे. प्राध्यापकाची पुस्तकी बडबड आहे. गाईच्या आगमनावरून पावसाची खूणगाठ बांधणारी आजी आहे. घरातल्या कर्जबाजारी चुकविण्यासाठी पळून जाऊन नंतर गोव्याच्या स्वातंत्र्यसंग्रामात पडून हुतात्मा झालेल्या माणसाची गोष्ट आहे. आपल्याला खूप काही तरी मोठे दुखणे आहे असे नेहमीच समजणाऱ्या प्राध्यापकाची गंमत आहे. स्वत:च्या झोपडीचे स्वप्न पहाणारा वांड मुलगा आहे. शेरलॉक होम्सच्या पराभवाची गोष्ट आहे. भ्रष्ट प्राध्यापक आणि त्याचे सत्त्वशील गुरु यांचा संघर्ष आहे. आईला त्रास देणारी अवखळ मुलगी आहे. दारूच्या नशेत आकंठ बुडालेला गवई आहे. कोनाड्याच्या चित्राचे गूढ आहे.

विषयानुकूल वातावरणनिर्मिती आणि ठसठशीत व्यक्तिचित्रे यामुळे सर्वच कथा चित्तमय झाल्या आहेत. लयीत चाललेली वारी, पावसाची चाहूल, लंडनचे धुके, बेलूर-हळिबेडीची शिल्पचित्रे सगळे सहजपणे डोळ्यासमोर उभे रहाते. 'बेकर स्ट्रीट'वरच्या आमच्या खोल्यांच्या काचा धुक्याने पूर्णपणे भिजल्या होत्या आणि त्यांच्या दवबिंदूंच्या चौकटीची अन् वर्तुळाची सुंदर अन् वेगवेगळी नक्षी त्या काचावर उमटली होती. बाहेरचे रस्ते अगदी अंधुक ओले दिसत होते आणि त्यावरून येणारे–जाणारे स्त्रीपुरुष, मुलेमुली, टॅक्सी आणि घोडेगाड्या ही सर्व रहदारी एका फार दूरच्या जगातली वाटत होती. इतक्या दूरवरची की, मधूनच कोणी कुणाला मारलेली हाक हीसुद्धा या जगातली वाटत नव्हती. (एलिमेंटरी, माय डिअर होम्स) किंवा भोवताली गर्द झाडी होती. इतकी की वरचं आकाश तिनं जवळजवळ लिंपून काढलं होतं. उंच वेडयावाकड्या माडाच्या झुपकेदार अन् नारळीच्या गच्च टोकदार झावळ्या, ताठच्या ताठ पोफळीचे डुलते शेंडे, सिल्व्हर ओकची आकाशाकडे चाललेली पानं, मधूनमधून हिरवेगार फणस अंगाखांद्यावर घेतलेली फणसाची झाडं–

'हिरव्या रंगाचे इतके प्रकार! लाल माती इतकी सतेज! पक्ष्यांचे इतके आवाज!' (बोलावणं)

–यासारखी वर्णनं कथांच्या चित्रमयतेची साक्ष देतात. 'आई गुडघ्यावर डोके टेकवून अन् जमिनीकडे टक लावून चहा करीत होती. मधूनमधून आधणातून वर येणाऱ्या वाफाकडे बघत होती!–वाफा हलत होत्या. आईचा गोरा चेहराही हलत होता.' (माझी झोपडी) हे शब्द कथांमधील व्यक्तिचित्राची झलक दाखवितात.

पण हे असूनही सर्व कथा अपेक्षित उंची गाठू शकत नाहीत. 'माळ', 'लांडगा आला रे आला', 'कोनाडा' या कथा आशयाच्या दृष्टीने पूर्ण वाटतात, तशा इतर सर्व कथा वाटत नाहीत. मास्तर आणि काशीबाई यांची एकमेकांविषयी ओढ, आंतरिक जिव्हाळा आणि दूरत्व यांचे सूक्ष्म पण हळुवार हाताने केलेले चित्रीकरण 'माळ' या कथेला एका वेगळ्याच कलापातळीवर घेऊन जाते. नवऱ्याच्या छळणुकीला कंटाळून आता पुन्हा घरी जाणार नाही असे सांगणाऱ्या काशीताईंना मास्तर विचारतात, 'काशीताई अन् जाणार कुठं? अन् एकदम मास्तरांच्या छातीत सारा जीव गोळा झाला.' मनाची ओढ आणि व्यवहाराची भीती यांचे एकजीव मिश्रण या एका वाक्यात प्रत्ययाला येते. अनेक बारीकसारीक प्रसंगातून ही जवळीक, चलबिचल दिसते. म्हणून मास्तर काशीताईंचा हात धरतात तेही खटकत नाही, शेवटी सोडून देतात तेही खटकत नाही. 'लांडगा आला रे आला' या कथेतील विनायकरावांचा आक्रस्ताळेपणा हसू आणतो आणि त्याबरोबरच सुधाबाईंनी त्यांची चालवलेली टवाळी आणि मधूनच खरोखरीचे शकित होणे, प्राध्यापकाचे स्वप्नात स्वत:च्या पापाच्या कबुल्या देणे यामुळे एक सुंदर कथा निर्माण झाली आहे. 'कोनाडा' या कथेस जुन्या शिल्पकृतीच्या सान्निध्यात पुनर्जन्माची गूढ कल्पना अगदी स्वाभाविकपणे फुलते आणि प्रत्ययकारी होते. मजेदार संवादांनी या कथेत आणखी रंग भरला आहे.

इतर कथा मात्र कधी ठरीव ठशाच्या तर कधी तोल ढळलेल्या वाटतात. 'बोलावणं' या कथेचे कथाबीज आव्हानात्मक आहे. कर्जबाजारी किसन पाळंदे त्यातून सोडवणूक करून घेण्यासाठी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतो, हा विषयच आव्हान करणारा. तेथे अटीतटीने झुजणारा हुतात्मा होतो ही गोष्ट तर आणखी विचार करायला लावणारी. तो कर्ज चुकविण्यासाठी संग्रामात गेला असे त्याची पत्नी म्हणते; पण ते खरे की ती त्याची आंतरिक प्रेरणा होती? की एकदा त्यात पडल्यावर आता गती नाही म्हणून त्याने ते अटीतटीचे लढणे स्वीकारले, ते कळत नाही. किसनच्या पत्नीचे नीतिबाह्य वागणे आणि त्याची ठरीव समर्थने यामुळे तर कथा अगदी सनसनाटी म्हणावी त्या पातळीवर जाते. 'शेवटी काय' या कथेत प्रा. राजे यांचा तास आणि त्या तासाला काय काय घडले याचे प्रतिवृत्त रंजकपणे सांगितले आहे एवढेच वाटते. 'गाय', 'माझी झोपडी', 'बंट्या' या तिन्ही कथात कुटुंबचित्रे आहेत; पण ही कुटुंबचित्रे विशिष्ट आशय व्यक्त करीत नाहीत. 'गाय' या कथेतील आजी लक्ष वेधून घेते; पण त्या गाईच्या येण्याचे महत्त्व अगदी आगंतुक उद्भवलेले वाटते. 'जेव्हा पहाट होते' आणि 'अपार' या कथा अगदी ठरीव ठशाच्या वाटतात. मूळचे ध्येयवादी आणि पुढे परिस्थितीने भ्रष्ट अशी माणसे किंवा व्यसनात बुडालेले कलाकार यांच्याविषयीच्या कथांना मराठीत तोटा नाही. 'एलिमेंटरी–माय डिअर होम्स' या कथेत रहस्यामुळे कुतूहल चाळवले जाते; पण ते रहस्य उलगडले जात नाही म्हणून कथा अपुरी वाटते.

काही कथांचा अपवाद वगळता एकंदर संग्रह आशयात तकलादू पण शैलीमुळे वेधक वाटतो.

–विनया खडपेकर

माळ
विद्याधर पुंडलिक
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे : १५७. किंमत : रु. पंचवीस.

# दोन वनविशेषांक

## ' वनशक्ति ' मासिक

सरकारी कारभार म्हणजे अलिबाबाची गुहा असते. सर्वसामान्य माणसाला आत काय चालले आहे याचा थांगपत्ता लागत नाही. शासनाचे उपक्रम, योजना, लोकांचा त्या योजनात अपेक्षित असणारा सहभाग याची माहिती लोकाना न मिळाल्याने, अशा योजनाना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही.

वनखाते हे अशाच शासकीय खात्यापैकी एक आहे. पर्यावरण, प्रदूषण, निसर्गातील असंतुलन हे शब्दप्रयोग हल्ली वारंवार आपल्या कानांवर येत आहेत. जगाचा गाडा सुरळीत चालू ठेवण्यासाठी झाडाचे– वनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महाराष्ट्रातील वनसंपत्तीत २१ टक्क्यापासून किमान ३३ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यासाठी हे खाते अनेक योजना अमलात आणीत आहे. जनसामान्याना त्याची माहिती व्हावी व त्यांचा अशा योजनांतील सहभाग वाढावा यासाठी एखादे संपर्काचे साधन असणे आवश्यक होते. ' वनशक्ती ' मासिकाच्या पहिल्या अंकाने ही आवश्यकता पूर्ण करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.

गेल्या ऑक्टोबर महिन्यात स्थापन झालेल्या वनखात्याच्या माहिती व प्रचार विभागाने ' वनशक्ती 'चे प्रकाशन केले आहे. ' वनाचे रक्षण– काळाची गरज ' हा महाराष्ट्र राज्याचे मुख्य वनसंरक्षक श्री. इ. म. कुरेशी याचा लेख वनसंपत्तीचे रक्षण का केले पाहिजे यामागची कारणमीमासा विशद करतो. हवेचे शुद्धीकरण, पाण्याची वाढती उपलब्धता, ध्वनिप्रदूषणाचे नियंत्रण, जमिनीची कमी होणारी धूप इ. मुद्द्याचा परामर्श या लेखात घेतलेला आहे. वनसंरक्षक श्री. अ. गं. ओक याचा लेख महाराष्ट्रातील वनांच्या आकडेवारीसह माहिती देतो. जंगलविकासाच्या विविध कार्यक्रमांची माहितीही या लेखात आहे. ' वन्य प्राणी आणि पर्यावरण सरक्षण ' या आपल्या लेखात श्री. शं आ. मुंडकूर वन्य प्राण्यामुळे होणाऱ्या पर्यावरण संरक्षणाची माहिती देतात. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत आढळणाऱ्या वन्य पशुपक्ष्याची माहितीही या लेखात आहे. वन्य पशुपक्ष्यांसाठी असलेल्या व प्रस्तावित अभयारण्याची आकडेवारी या लेखात दिलेली आहे. देशाच्या ५ पंचवार्षिक *योजनांमध्ये झालेल्या वनविकासाच्या* वाटचालीचा मागोवा सहाय्यक वनसंरक्षक श्री. भा. मो. कामे यांनी घेतला आहे. ' वृक्षोपनिषद् ' हे वृक्षांसंबंधी माहिती देणारे आगळेवेगळे पुस्तक ज्यानी लिहिले आहे ते श्री. पद्माकर कुलकर्णी ' राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये ' या सदरात या वेळी मेळघाटच्या व्याघ्रप्रकल्पाची माहिती देत आहेत. रखरखीत शहरी जीवनाला कंटाळलेल्यांना सुटीचा आनंद पुरेपूर मिळवून देणारी अशा प्रकारची अभयारण्ये ही यापुढे एक अत्यावश्यक गोष्ट व पर्यटनाला जाण्याची महत्त्वाची ठिकाणे होणार आहेत, हे कुलकर्णींचा लेख वाचल्यावर पटते. ' वने, आदिवासी आणि विकासयोजना ' या लेखमालेतील श्री. किरपेकर यांचा पहिला लेख या अंकात आहे. आकडेवारी सोडली तर या लेखात विशेष वाचण्याजोगें काही नाही. अर्थात प्रास्ताविक स्वरूपाचा हा लेख असल्याने अधिक तपशिलाची अपेक्षाही नाही. जंगलात असणाऱ्या अनेक प्रकारच्या झाडांपासून वस्तू तयार करण्याचे उद्योग चालू करता येणे शक्य आहे. ' वनशक्ती 'च्या या अंकात फूटपट्टी, टी स्क्वेअर *आणि ड्रॉइंगबोर्ड तयार करणाऱ्या* एका लघुउद्योगाची संकल्पना श्री. अ. रा. साळुखे यानी दिली आहे. जमाखर्चाची तपशीलवार आकडेवारी दिलेली असल्याने हा लेख फारच उपयुक्त झाला आहे.

अंकात ' ललित ' म्हणता येईल असा मजकूर म्हणजे ' वनापासून प्राप्त होणारी प्रसाधनसामुग्री ' हा श्री. चंद्रशेखर जोशी यांचा छोटासा लेख. पूर्वीच्या काळी स्त्रिया वनांपासून कोणती सौदर्यप्रसाधने मिळवीत हे शाकुंतल, मेघदूत इत्यादी काव्यातील उतारे देऊन सांगितले आहे. याशिवाय या अंकात वनखात्याच्या गेल्या काही महिन्यांतील कार्यक्रमांची माहिती देणारे ' वनवार्ता ' हे सदर व रेखाचित्रे, निसर्गवर्णनपर श्लोक असा मजकूर आहे.

एकंदरीत हा पहिला अंक माहितीपूर्ण व वाचनीय आहे. अंकातील रेखाचित्रांचा दर्जा मात्र सुधारावयास हवा असे सुचवावेसे वाटते. मांडणीमध्येही आणखी आकर्षकता आणता येईल. पुढच्या अंकाबद्दलच्या अपेक्षा या अंकामुळे वाढल्या आहेत, हे मात्र निश्चित.

दिलीप कुलकर्णी

[ संपर्क : प्रसिद्धी व माहिती अधिकारी (वन), महाराष्ट्र राज्य वनविभाग,

२७/२ सोमवार पेठ,

पुणे ४११०११,

किंमत : १.५० रु. वा. व. दिली नाही. ]

## ग्रामायन वार्षिक

ग्रामायनच्या वर्षभरातील कार्याची माहिती देणारा एक लहानसा अंक दरवर्षी प्रसिद्ध केला जातो ग्रामीण विकासातील अन्य स्वयंसेवी संस्थाच्या कार्याची माहिती देण्याचा प्रयत्नही या अंकात केला जातो. या वर्षी हा वार्षिक अंक थोडया मोठया आकारात ' वनविशेपाक ' म्हणून प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे. अक चालू एप्रिल– मे ८१ च्या सुमारास प्रसिद्ध होईल.

' वनसवर्धन व स्वयंसेवी संस्थाचे प्रयत्न ' असा अंकाचा मुख्य विषय असेल. विकासाच्या प्रक्रियेमध्ये अनेक प्रकारे वनाचा कसा उपयोग करता येईल, या दृष्टीने आतापर्यंत स्वयंसेवी संस्थांनी कोणते उल्लेखनीय प्रयत्न *केले आहेत याची चर्चा या अंकात केलेली* असेल. तसेच सामाजिक वनीकरणाच्या काही नव्या कल्पनाचा आणि शासकीय योजनाचा परिचय या अंकात करून दिला जाईल. स्वयसेवी संस्थाना वनीकरणाच्या प्रत्यक्ष कार्यासाठी मार्गदर्शक अशी माहिती देण्याचाही प्रयत्न राहील

या अंकासाठी ज्याना लेख, माहिती, सूचना असे काही साहित्य पाठवायचे असेल त्यांनी ते २५ एप्रिल ८१ पूर्वी पाठवावे ही विनंती.

सचिव, ग्रामायन

द्वारा साप्ताहिक ' माणूस '

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

फिनिक्स निवड

# On a Clear Day you can see General Motors

( John De Lorean looks inside )
Avon Books, Pages 286, $ 2–95.

द. लारीएन हा जगातील टॉप-फ्लाइट एक्झि-क्युटिव्ह होता. पगार डॉलर्स सहा लाख पन्नास हजार वर्षाला. याला सुमारे आठने गुणा म्हणजे रु. अर्ध्या कोटीचे वर. एवढ्या मोठ्या पगारावर त्याने पाणी सोडले. कारण त्याला कन्झ्युमरचा कळवळा आला. ज्या तऱ्हेने जनरल मोटर्स चार चाकावर टीनपॉट बांधीत होती ती तऱ्हा लारीएन याला पटली नाही. राल्फ नाडेरलाही ती तशी पटलेली नाही. राल्फ नाडेर हा अमेरिकेतील कन्झ्युमरचा चॅंपियन. या पुस्तकात त्याचा तीन-चार वेळेला उल्लेख आलेला आहेच; पण त्याला चॅंपियनशिपसाठी अर्ध्या कोटी रुपयाची नोकरी टाकावी लागली नव्हती !

कन्झ्युमर इज अकिंग, कस्टमर इज अ किंग, असे फार म्हटले जाते; पण मोठमोठ्या कंपन्यांच्या सबकॉन्शसमध्ये कन्झ्युमर इज अ नीट–वीट ( knif–wit) हेच एक ब्रीदवाक्य घुमत असते. जाहिरातबाजी करून माल खपवायचा व तुमच्या सुखासाठी अमकी वस्तू आवश्यक आहे असे मेंदूत ठसवून ग्रोथ–ओरिएंटेड, रीझल्ट–ओरिएंटेड कंपन्यांची घोडदौड चालू ठेवायची.

हे केव्हा तरी बदलावेच लागेल. ग्रोथ–ओरिएंटेड, रीझल्ट–ओरिएटेड, फास्ट एक्सपांडिग कंपनी पाहिली की कुणाही ॲन्टी–हीरोच्या पोटात गोळाच उभा राहतो ! कारण कंपन्या जसजशा मोठ्या होत जातात त्याच प्रमाणात माणूस लहानं लहान बनत जातो. जेव्हा माणसालाच अधिकाधिक महत्त्व दिले जाईल तेव्हाच तांत्रिक ज्ञान खऱ्या अर्थाने वयात आले असेल. शूमाकर व गांधीचे Small is beautiful तिथेच परत येऊन चाक थांबणार आहे. क्वालिटी ऑफ लाइफ आता फारशी राहिलेली नाही. त्याचे कारण फास्ट एक्स्पांडिग, ग्रोथ–ओरीएंटेड कंपन्या वगैरे. टाटा झाले, बिर्ला झाले, होवार्ड ह्युजिस व पॉल गेटी झाले. असल्या आंत्रप्रनर्सनी (entrepreneur) क्वालिटी ऑफ लाइफ सुधारली का ? क्वालिटी ऑफ लाइफ वृद्धिंगत करण्यासाठी अशा आंन्त्रप्रनर्सची जरूर आहे की जे प्रदूषणाचा विचार करतील, जे वाढीकडे लक्ष न देता माणसालाच जास्त महत्त्व देतील.

दस्तुरखुद्द अमेरिकेत जर कन्झ्युमरची फसवणूक केली जाते तर भारताविषयी बोलायलाच नको. एंजिने डिझाइन चुकीचे असल्यामुळे कितीसे लोक यमसदनास गेले असतील ? स्कूटर, मोटारसायकली, मोटारी याच्या सर्विसिंगबाबत कितीसे लोक समाधानी आहेत ? पद्मिनीमध्ये मागे तिसरा घुसला की हेडलाइटस् स्वर्गाकडे जायला बघतात व आतले पॅसेंजर्स कधीकधी तिथे जातात सुद्धा ! असे म्हणतात की, जगातील दोन विश्वयुद्धात जेवढी माणसे मेली त्याच्यापेक्षा जास्त आटो ॲक्सिडेंट्समध्ये मेलीत. आता तरी त्यासाठी काही भरीव करण्याची गरज आहे. एका स्वच्छ दिवशी प्रिमियर, बजाज, स्कूटर्स एंडिया वगैरेविषयी लिहिण्याची जरूर आहे.

तसं हे पुस्तक काही वर्षं आधीच लिहून तयार होतं; परंतु द लारीअनच्या सतत बदलणाऱ्या भूमिकेमुळे ते फार उशीरा प्रसिद्ध झालं. प्लेबॉय ते आधी छापणार होते. शेवटी ते लेखकानेच छापलं. याआधी आर्थर पी. स्लॉन यानी जनरल मोटर्सवर पुस्तक लिहिलं होतं. साहजिकच स्लॉन याचा उल्लेख या पुस्तकात दीड–दोन डझन वेळा केलेला आहे.

जनरल मोटर्स चे ' Corvair ' हे नवीन मॉडेल बाजारात आलं होतं आणि इतर कुठल्याही गाडीपेक्षा तिचा हाय–वे वरचा Performance भयानक होता. कॅडीलॅकच्या जी. एम. चा मुलगा ही गाडी चालवताना मृत्युमुखी पडला होता. आणखी एका अधिकाऱ्याच्या मेंदूला इजा पोहचली होती. एका डीलरचा मुलगाही ही गाडी चालवताना ठार झाला होता आणि तरीही कंपनी ह्याबाबत काहीही जबाबदारी पत्करायला संपूर्ण नाराज होती.

वरील किस्से हे आहेत जॉन द लारीएन ह्या जनरल मोटर्समधील अधिकाऱ्याच्या आत्मकथनातील काही भाग. अधिकाधिक वरच्या जागेवर काम करत असताना कंपनीच्या business ethics बद्दल झालेला भ्रमनिरास आणि अखेरीस राजिनामा देण्यात झालेली परिणती हा ह्या पुस्तकाचा गाभा.

मुळात ह्या जगप्रसिद्ध कंपनीबद्दल असं काही नावानिशी आणि आकेडीवारीसहित लिहिणं हे धाडसाचच; पण जॉन द. लारीएन ह्यानी जी. एम. मधील पारंपारिकता, ताठरपणा, बेपर्वाई, व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव ह्या सगळ्याबद्दलच अतिशय परखडपणे सांगितलं आहे.

जनरल मोटर्सचा चौदावा मजला म्हणजे कंपनीचे वरिष्ठ लोक. कर्मचाऱ्याला तिथपर्यंत जायला वर्षानुवर्षे लागतात; पण द. लारीएन याला टॅलंटमुळे तिथे पोचायला अक्षरशः लिफ्ट मिळाली.

१४ व्या मजल्यावर गेल्यावर टॉप मॅनेजमेंट संबंधीच्या अनुभवाचं सुरेख उपहासात्मक वर्णन आहे. अमेरिकेसारख्या देशातही ' I am stuck with you ' हे ऐकून घ्यावं लागत असेल, किंवा कपडे कुठले घालायचे हेही नियंत्रित केलं जात असेल, हे भयंकर आश्चर्यकारक वाटतं. ( लारीएनने जीन्स घातलेले कंपनीला आवडत नसे. ) १४ व्या मजल्यावरील अत्यंत निरर्थक आणि हास्यास्पद मीटिंगजचे तर मिस्किल आणि मौजेचं वर्णन आहे.

दिवस स्वच्छ असतो आणि खरं म्हणजे दृष्टी स्वच्छ असते तेव्हा जी. एम. चं चित्र दिसतं ते असं. Business ethics हा ह्या पुस्तकाचा गाभा खरा; पण त्याबद्दल बोलत असतानाच जॉन डी लॉरिअन ह्याचं व्यावसायिक व्यक्तिमत्त्व अतिशय सुरेख विकसित होत जाताना पहायला मिळतं.

विशेषतः जनरल मोटर्सच्या ' शेवरलेट ' ची जबाबदारी घेतल्यावर व्यवस्थापनाच्या सर्व क्षेत्रातील अवाढव्य समस्या, त्या हाताळण्याची पद्धती, आकडेवारीचा योग्य वापर, Communication ची दारे मोकळी करण्यासाठी वापरलेल्या युक्त्या, प्रामुख्याने Product–oriented असलेल्या उद्योगाला client–oriented करताना पडलेले प्रयास ह्या सगळ्याचंच अतिशय वेधक वर्णन या पुस्तकात आहे.

ज्या देशामध्ये व्यवस्थापनशास्त्राचा जन्म आणि विकास झाला असं मानलं जातं तिथेही शास्त्रशुद्ध व्यवस्थापनाचा अभाव असणं आणि त्या कल्पनेला विरोधही होणं हे नवलाईचं वाटतं. तर्कशुद्ध निर्णयाच्या अभावी 'vega' (वेगाचे बादल झाले होते!) चा अंगाशी आलेला प्रयोग हे ह्याचं बोलकं उदाहरण. अशा अनेक केसेस त्यांनी विस्ताराने चर्चिल्या आहेत आणि हे करताना ते नियोजन, संघटना, Co-ordinitaon, Communication अशा व्यवस्थापनाच्या अनेक पैलूंबद्दल कुठल्याही पाठ्यपुस्तकापेक्षा अधिक काही सांगून जातात.

विशेष म्हणजे ही चर्चा कुठेही नीरस होत नाही. अतिशय गतिमान पद्धतीने हे सारं वर्णिले आहे आणि वाचकालाही ते सतत पुढे खेचत राहते. मराठीमध्ये ह्या विषयांवरची पुस्तकेच फारशी नाहीत. जी आहेत त्यातही आमच्या आठवणीप्रमाणे फक्त अच्युत बर्व्यांच्या ह्या विषयावरील काही कथामध्ये ही गतिमानता आढळते. एकूणच अनुभवाचा भरगच्चपणा हे ह्या पुस्तकाचं वैशिष्टय सतत जाणवते. या-उलट मराठीतील उद्योजकांच्या चरित्रामध्येही ही उणीव सतत बोचत असते.कदाचित चरित्र लिहिण्यामागचा उद्देश आणि शैलीचाही हा फरक असेल.

सुनील दत्तासारखा जाड भुवयाचा हँडसम द. लारीएन. काही फोटोत दिसतोही तसाच; परंतु प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध एकाच माणसाची झुंज वगैरे हिंदी सिनेमासारखे यात काही नसून हे एक संतुलित पुस्तकआहे.

—रंजना कोल्हटकर
—जे. एन्. पोंडा.


☐ विविध विषयावर पुस्तके
☐ इंग्रजी—मराठी
☐ कात्रणयुक्त
☐ नव्या कोऱ्या अवस्थेत
☐ पाहिजे असलेले
☐ आगळे वेगळे
☐ फिनिक्स पुस्तक वाचा !

कागद महागणार आहे. दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून भाववाढीपासून मुक्त व्हा !

**फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०


रंगभूमी

## मूकाभिनयाचा उत्कृष्ट प्रयोग

# 'माइन अँड क्लाउन'

'माइम' या शब्दाचा शब्दशः अर्थ—नक्कल करणे, प्रस्तुत करणे असा आहे. खि. पू. पाचव्या शतकातही या प्रकारचा नाट्यप्रयोग झाल्याची उदाहरणे आहेत; पण पूर्वी यामध्ये शब्दाचाही वापर होत असे बाजारपेठा वगैरे सार्वजनिक ठिकाणी वेगवेगळे नकलाकार आपली कला सादर करत. प्राण्याचे किंवा वादळ-वाऱ्याचे आवाज यांची हुबेहूब नक्कल ही मंडळी करत; पण शब्द किंवा आवाज यांच्यापेक्षादेखील शारीरिक हालचालींना किंवा अभिनयाला नंतरनंतर जास्त महत्त्व येत गेले व शेवटी तर शब्द पूर्णतया मागे पडून 'माइम' म्हणजे पूर्णपणे 'मूकाभिनय' असे स्वरूप आले; पण फार पूर्वी या 'माइम'वाल्या मंडळींना विशेष महत्त्वाचे स्थान नव्हते.

अगदी अलीकडे मार्सेल मार्सो या जग-विख्यात फ्रेंच कलाकारामुळे 'माइम' हा प्रकार सर्वत्र पोचला आणि लोकप्रियही झाला. शरीराच्या प्रत्येक अवयवाचा पूर्ण वापर आणि मुद्राभिनयावर जबरदस्त हुकमत या दोन गोष्टी 'माइम'साठी अत्यंत आवश्यक असतात. वेगवेगळ्या व्यक्ती, त्यांच्या शरी-राची ठेवण, त्यांचे स्वभाव केवळ शरीराच्या माध्यमाद्वारा लोकांपर्यंत पोचवायचे हे मोठे कठीण काम आहे. सामूहिकपणे किंवा एक-टयाने 'माइम'द्वारा एखादी गोष्ट, नाटक सादर करता येते. मार्सेल मार्सोने यासाठीच या प्रकाराला 'मायमोड्रामा' असे नाव ठेवले आहे.

पुण्यामध्ये नुकताच माइम—कलाविष्का-राचा कार्यक्रम सादर करण्यात आला. थिएटर अॅकेडमी आणि ब्रिटीश कौन्सिलच्या वतीने नोला रे या कलावतीचा 'माइम अँड क्लाउन' हा कार्यक्रम सादर झाला.

नोला रे ही ऑस्ट्रेलियात जन्मलेली आणि गेली काही वर्षे युरोपात वास्तव्य करून राहिलेली. शरीराच्या लवचिकपणाची कसोटी पाहणाऱ्या 'बॅले' नृत्यप्रकाराचा तिने बारा वर्षे अभ्यास केलेला. त्याचे अनेक कार्यक्रम केलेले. नंतर सहा महिने तिने पॅरिसमध्ये मार्सेल मार्सोच्या 'माइम' शिकविणाऱ्या संस्थेत 'माइम'चाही बारीक अभ्यास केलेला. तिच्या या परिश्रमांचा प्रत्यय तिचा कार्यक्रम बघ-ताना सतत येत होता. मोजके दहा प्रसंग सादर करून तिने दोन-सव्वादोन तास प्रेक्ष-कांचे भरपूर मनोरंजन केले.

पूर्ण रंगमंचावर एकच खुर्ची, प्रसंगी तीही नाही. 'फाउल प्ले' या पहिल्या प्रसंगातच तिने प्रेक्षकांना जिंकले. रंगमंचावर आल्यापासून सतत शरीराची अर्थपूर्ण हाल-चाल. 'फाउल प्ले'त तशी कथा वगैरे काहीच नाही; पण तिच्या अभिनयाने तो प्रसंग विलक्षण रंजक झाला.

'द सर्जन'मध्ये तिने या पेशाची थक्क टिंगल उडवली. सर्जनाचा शस्त्रक्रियेविषयीचा जादा आत्मविश्वास, त्याची अतिरेकी स्वच्छता हे सर्व 'शालजोडीतला जोडा' या प्रकाराने नोलाने दाखवले. हात घाण होऊ नये म्हणून कोपराने नळ सोडणे, बराच वेळ हात धुणे आणि टॉवेलला न पुसता 'झटकणे' या हात झटकण्याच्या तिने दहा ते पंधरा पद्धती दाखवल्या. सर्जन ते हत्यार मागि-तल्यावर होणारा उशीर उभे राहण्याच्या पद्धतीवरून तिने दर्शवला. सर्जनचा शरीरात (पेशंटच्या) जाणारा हात केवळ अप्रतिम. शेवटी रक्त बघून भोवळ येणारा हा वेंधळा सर्जन पेशंटच्या जखमेबरोबर स्वतःचा हातही पेशंटच्याच शरीराला शिवून टाकतो.

'द सर्जन'पेक्षाही उत्कृष्ट झाला तो 'द गॅम्बलर' हा प्रसंग. मशीनमध्ये नाणं टाकायचे, खटका ओढायचा आणि जास्त नाण्यांची अपेक्षा करता करता कफल्लक व्हायचे, हा जुगाऱ्याचा नशिबाची परीक्षा बघण्याचा स्वभाव. त्या जुगाऱ्याच्या मनोव-स्थेचे सुंदर दर्शन नोलाने घडवले. जुगार खेळण्यासाठी पैसे नसले म्हणजे जुगारी चोरी, खून करायलाही मागे-पुढे पहात नाही, हेही नोलाने दाखवले. खटका ओढायच्या सवयीमुळे जुगाऱ्याचा होणारा दुर्धगातील अनपेक्षित अंत केवळ अप्रतिम.

मोकळ्यावर वाद्यवृंदाचे संचलन कर-णाऱ्या 'द कंडक्टर'ची दयनीय अवस्थाही

मोठी रंजक होती. संगीताची तालीम चालू असताना विमानानो किंवा गुरानी छळल्यास विचाऱ्या कंडक्टरने काय करावे? गाई, डुकरे व पक्षी याची 'समजूत' घालून झाल्याबर पुन्हा उठताना 'भरलेला' पाय दाखवण्याची अॅक्शन टाळधा घेऊन गेली.

बॅले या नृत्यप्रकाराची टिंगल उडवणारा 'द बॅले' हा प्रसंगही सुरेख झाला. बॅलेमधील अवघड कसरती न जमणारी, कशीबशी समेवर येऊन आदळणारी नर्तकी फारच सुरेख! 'नोलाज नॅस्टी माईम' हा धक्कादायक विनोदाचा अप्रतीम आविष्कार होता. त्यामानाने 'जस्ट एमिनंट', 'कोर्ट गेश्चर' फिके वाटले. 'कोर्ट गेश्चर' व 'द व्हायलिनिस्ट' खूप लांबलेही. प्रेक्षकांचा सहभाग घेणे ठीक आहे; पण लांबण झाली की प्रसंगातील गंमत जाते. 'द व्हायलिनिस्ट'ला तिने काही वस्तू आणल्या नसत्या तर बरे झाले असते. व्हायोलिनचा आकार केवळ अभिनयाने दाखवण्याइतपत ती नक्कीच समर्थ आहे. असे असताना तिने या वस्तू का आणल्या कोणास ठाऊक! ते जरा खटकले.

'फायनल मुव्हमेंटस्' हा जरा गंभीर प्रकार होता. विनोदी एकपात्री प्रयोगाच्या शेवटी काही तरी गंभीर गोष्ट सादर करण्याची जशी फॅशन आपल्याकडे आहे तसाच हा प्रकार. इथं शरीरावरील प्रभुत्व मात्र नोलाने दाखवले.

या संपूर्ण कार्यक्रमातील आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे अजिबात निवेदन नाही. सर्व प्रेक्षकाना दिसेल अशा पद्धतीने रंगमंचाच्या एका बाजूला सादर होणाऱ्या प्रसंगाची यादी. त्यावर प्रकाशझोत येतो-जातो.लोकाना कोणता प्रसंग(आयटेम)सादर होणार आहे ते त्यावरून कळते.

पार्श्वसंगीत आणि प्रकाशयोजना अचूक व पूरक म्हणजे काय त्याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हा कार्यक्रम! नोला स्टेजवर असो की प्रेक्षकात, प्रकाश बरोबर तिच्यावर पडणार. आवश्यक तेवढाच पडणार. अन्यथा प्रकाश नसणार. कुठेही चूक किंवा विसंगती नाही.

तीच गोष्ट संगीताची. संगीतामध्ये 'ध्वनी'देखील अंतर्भूत होतात. वेगवेगळ्या 'आयटेम्स'ना खास पाश्चात्य (पॉप नव्हे) संगीत तर होतेच (त्याच्या सांद्रतेची कल्पना नाही) पण 'द कंडक्टर'च्या वेळी विमान, पक्ष्याचे आवाज, 'द गॅम्बलर'च्या वेळी वापरलेला जुगारी मशीनचा, पोलीस सायरनचा-हे सगळे आवाज. यामुळे त्या त्या प्रसंगांची परिणामकारकता कमालीची उचावयाची. प्रकाश व संगीताचे श्रेय मॅथ्यू रिबू याच्याकडे जाते. नोलाच्या कंपनीचा हा दिग्दर्शक व तंत्रज्ञ आहे. नोलाबरोबर याचाही सत्कार केला गेला हे बरे झाले.

एकंदरीत नोला रे ही खरोखरच उत्तम कलाकार आहे यात वाद नाही. 'माइम' हा प्रकार बराच वेळ बघण्याची सवय नसलेला किंबहुना शब्दबंबाळ नाटक-सिनेमांची सवय असलेला प्रेक्षकगण सव्वादोन तास मनमुराद हसून खूष झाला, हीच तिच्या कलेची पावती म्हणावी लागेल. तसेच एक उत्तम व दुर्मिळ अशी कलात्मक संधी पुणेकरांना दिल्याबद्दल थिएटर अॅकेडमी व ब्रिटिश कौन्सिलचे आभार मानणे आवश्यक आहे.

—निखिल गजेंद्रगडकर

चित्रपट

# स्वामी हृषिकेशजींची 'हसरी गॅलरी'

सतीश जकातदार

विनोदी ढंगाने चढत्या कमानीत कळसाकडे जाताना झालेला गडबड-घोटाळा निपटल्यानंतर शेवट सुखद हे ठरलेलंच! परंतु त्यानंतरही 'नरम गरम' या चित्रपटाचा रामप्रसादला त्याचा मालक गौरीशंकर विचारतो, 'हे सर्व घडलं कसं काय?' तर रामप्रसाद उत्तरतो, 'ही सर्व माझे गुरू स्वामी हृषिकेशजीची कमाल!'

आणि खरोखरच 'नरम-गरम' चित्रपट म्हणजे हृषिकेश मुखर्जी या कल्पक माणसाचीच कमाल असते! हाच माणूस या चित्रपटाच्या चौदा रिळामध्ये अतिशय 'सटल्' परंतु तितक्याच हलक्या-फुलक्या पद्धतीने एक साधी सरळ गोष्ट सागतो.

हृषिदा हा तसा बाजारू चित्रपटाच्या दुनियेतील एका भला माणूस! आदर वाटावा आणि आदर करावा असा. दिलीपकुमारपासून अगदी अमिताभपर्यंतच्या सर्व कलाकाराच्या अभिनयाचे योग्य ते मोजमाप करून त्याना वाव देणारा, त्याच्या अभिनयक्षमतेचे चीज करणारा हुषार, कल्पक गृहस्थ. आणि म्हणूनच हृषिकेशला आमचं हिंदी फिल्म पब्लिक मानतं आणि समीक्षकानाही हृषिदाचं कौतुक करण्यापलीकडे पर्याय नसतो.

गांभीर्य आणि विनोद यातील अंधुक अशी सीमारेषा ओळखणारा, हसू आणि आसू याचे पक्के हिशेब मनात ठेवून प्रेक्षकांच्या पचनी पडतील अशा गभीर व अस्सल विनोदी प्रसंगाचे बेमालूम मिश्रण करण्याच्या तारेवरच्या कसरतीत कायम यशस्वी ठरलेला दिग्दर्शक!

मानवी जीवनातील साध्या, सरळमार्गी, काहीशा चलाख पण भाबड्या अशा सामान्य माणसांच्या जीवनात हरघडी घडणाऱ्या घटनांचे 'सूत्र' किंवा एखादी कल्पना हीच 'हृषिदांच्या चित्रपटाची कथा असते आणि ह्या सूत्राच किंवा ह्या कल्पनेचं बोट धरूनच हृषिदा आपली पटकथा रंगवतात, सजवतात. मग ते विविध छटाचे प्रसंग व विविध लकबी असलेली पात्रं निवडतात. प्रसंगाच्या अनुषंगाने व अनुरोधाने संगोपन करत हृषिदा त्यांच्या पात्राना मोकळे सोडतात आणि पुढे संपूर्ण चित्रपटभर फक्त एक ओघवता प्रवाह असतो-'सालीनं दगा दिल्याच्या' चालीवर केळीच्या सालीवरून घसरून पडणाऱ्या प्रसगाचा. शिवाय या ओघवत्या प्रवाहाला योग्य ते वळण, हिंदकाळे देत वळणारी सकलनाची खास अशी हृषिदाशैली असते ती वेगळीच!

'मुसाफिर', 'अनुराधा', 'अनुपमा'-

पासून अगदी अलीकडच्या 'सत्यकाम'. 'आनंद', 'अभिमान', 'नमकहराम' व 'मिली'पर्यंत गंभीर प्रकृतीकडे कल असणाऱ्या या चित्रपटानंतर हृषिदांनी हलक्याफुलक्या चित्रपटांची निर्मिती सुरू केली. 'बावर्ची,' 'अर्जुन पंडित,' 'चुपके चुपके', 'गुड्डी' 'गोलमाल', 'खुबसूरत' य, आपल्या परंपरेशी इमान राखणारा आणि अस्सल विनोदाचं भान ठेवणारा 'नरमगरम' आता त्यांनी सादर केलाय.

'नरम–गरम'चा नायक गौरीशंकर बाजपेयी हा कुडमुड्या ज्योतिष्याच्या फंदात अडकलेला श्रीमंत असा सद्गृहस्थ. शनी-राहूकेतू या ग्रहांच्या आदेशानुसार जगणाऱ्या आणि वागणाऱ्या या गृहस्थाची पत्नी मरून अनेक वर्षे झाली आहेत. त्याला सुमी नावाची 'गोड' मुलगी आहे. भविष्याच्या नादात मुलगी आणि 'कारोबारा'कडे गौरीशंकरचे दुर्लक्ष, तर त्याचा लहान भाऊ कालीशंकर दुग्धमिश्रित भांग पिऊन भारतीय स्त्रीच्या (पद्मिनी, झांसी) महान परंपरेत रमत आणि याच परंपरेची सदोदित आठवण करत गॅरेजचा कारोबार सांभाळत असतो. भविष्यवेडापायी भवानीशंकरच्या आयुष्यात निर्माण होणाऱ्या पेचप्रसंगांची 'फक्कड' सोडवणूक रसते त्याचा विश्वासू नोकर रामप्रसादकडे.

पण रामप्रसादला त्याचेही काही प्रश्न असतात. एकशेचाळीस रुपयांच्या तुटपुंज्या पगारावर किंवा खूष करणारी बातमी दिली तर मालकाकडून सन्मानाने मिळाणाऱ्या पाच रुपये बढतीवर त्याला आपलं जीवन रेटावं लागतं. अशा परिस्थितीत त्याचे गावाकडचे शाळामास्तर आपल्या सु 'स्वरूप' मुलीशी लग्न करण्याची गळ त्याला घालतात, परंतु रामप्रसाद परिस्थितीच्या रेट्यापुढे ही 'ऑफर' नाकारतो.

अचानकपणे कोण्या एका सकाळी हा शाळामास्तर (गावाकडीला घरावर जप्ती आल्यामुळे) आपल्या मुलगी व सामानासह रामप्रसादकडे 'आश्रया'साठी येतो. परिस्थितीच्या रेट्याने पंक्चर झालेल्या रामप्रसादाने सुमारे साडेचार लाख रुपये खर्चून 'र' या अक्षरापासून सुरू होणाऱ्या राजनारायण नावाच्या वकिलाकरवी मालकाच्या 'बंगल्या'च्या हक्काचा खटला ५३ वर्षांनंतर जिंकलेला असतो। आणि बाजपेयी खानदानची इज्जत वगैरे वाचवलेली असते. ह्या 'मोकळ्या बंगल्यात' रामप्रसाद या दोघाना राहायला सागतो... कोणालाही न सांगता.

पण भांडं फुटतं. इस्टेट मॅनेजर बंगल्यात येतो. मुलीच्या लग्नाचं टुमणं शाळामास्तर लावून धरतात... आणि मुलीकडे पाहिल्यावर मॅनेजरच प्रेमात पडतो ! बंगल्यात राहण्याची सवलत देऊन मॅनेजर मध्ययुगीन 'साकी'च्या स्वप्नात मग्न होतो. विंचूछाप मॅनेजरला धडा शिकविण्यासाठी रामप्रसाद ही बातमी तपशीलवारपणे कालीशंकरच्या कानावर घालतो. मॅनेजरच्या कानउघाडणीनंतर कालीशंकर या मंडळीना बंगल्यातून हुसकावून लावण्यासाठी येतो; परंतु मुलीचा पद्मिनीछाप अवतार आणि शाळामास्तरचं तेच टुमणं पाहून कालीशंकरही तिच्या प्रेमात पडतो ! आता या सापाला मारण्यासाठी रामप्रसाद हे सर्व 'प्रकरण' बनारसला ज्योतिषाकडे सल्ला घेण्यासाठी गेलेल्या भवानीशंकरच्या कानावर घालतो... संतप्त भवानीशंकर आपल्या बंदुकीसह बंगल्यात प्रवेश करतो... परंतु इथेही कलाटणी मिळते– ज्योतिष्याच्या सल्ल्यानुसार याही वयात पुनर्विवाहाचा योग भवानीशंकरच्या 'भागा'मध्ये लिहिलेला असतो. शाळामास्तरचं टुमणं आणि मुलीच्या रूपात स्वर्गवासी बायकोची प्रतिमा रेखाटून भवानीशंकर लट्टू होतात... आणि मग जो गडबड–घोटाळा उडतो तो अगदी थेट पडद्यावर पाहण्यासारखा–'सालीनं दगा दिला,' च्या चालीवर!

अतिशय हलक्या–फुलक्या कथाबीजावर आधारित या चित्रपटात हृषिदा आपलं सर्व कसब दाखवतात. चित्रपटाच्या सुरुवातीपासून अगदी शेवटपर्यंत अनपेक्षित, तसेच काही अपेक्षितही धक्के देणाऱ्या, हास्याची लकेर उत्पन्न करणाऱ्या प्रसंगाची झटाझट पुढे सरकणारी मालिका इथे आहे. तसंच इथं गांभीर्याचा आवही नाही किंवा बटबटीत विनोदाला वावही नाही.

ह्या चपखल आणि खुसखुशीत प्रसंगाची जुळवाजुळव करताना हृषिदाच्या 'टीम'मधील (खरं तर 'कुटुंब'च म्हणायला हवं) छायाचित्रकार जयवंत पाठारे, राहुलदेव बर्मन, संकलक खान, गुलजार, राही मासुम रजा ही पडद्यामागची तज्ज्ञ–कलाकार मंडळीही आपलं कसब दाखवतात. पाठारेंचा 'कॅमेरा' हृषिदाच्या प्रकृतीशी पूर्णतः मिसळला असल्यामुळं तो त्याच लयीत सरकतो गुलजारलिखित राहुलदेवची उणीपुरी दोन–चार गाणी साध्या चालीमुळे लक्षात राहात नसली तरी चित्रपटात आवश्यक वाटतात. गाणं चालू असताना मध्ये संवाद टाकण्याच्या अथवा गाण्यासाठी गाणं न ठेवता प्रसंगानुरूप एखादंच कडवं ठेवण्याचा हृषिदांचा खाक्या इथंही दृश्याना सुसंगतच ठरतो. ढब्बकन् घडणाऱ्या हास्यास्पद प्रसंगांची 'पूर्वतयारी' चालू असताना 'रहस्य' निर्माण करणारं पार्श्वसंगीतही माफक हसू उमटवायला कारणीभूत ठरतं.

संवादाच्या अनुरोधानं 'कट' करण्याच्या हृषिदाच्या संकलनशैलीचा प्रभाव खान जमानखान या नव्या संकलनकाराने जाणीवपूर्वक पेलला आहे. हृषिदांच्या प्रत्येक चित्रपटात वाङ्मयीन मूल्य संवादाद्वारे जोपासलं जातं. यामुळेच हृषिदाची पात्रं 'बोलकी' असतात आणि त्याच्या बोलकेपणापासूनच त्याचं व्यक्तिमत्त्व रेखाटलं जातं. परिस्थितिनुरूप घडणाऱ्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू, कंगोरे व्यक्त करण्यासाठी हृषिदा आणि त्यांचे सहकारी राही मासुम रजा संवादाचा समर्पक उपयोग करतात. आपल्या व्यक्तिमत्त्वाला लाजवेल अशा प्रकारे बोलल्यानंतर जीभ चावण्याचा प्रकार करायला भाग पाडणारे हास्यकारक शाब्दिक अंगविक्षेप करणारे संवाद 'दाद' देण्याइतपत उत्कृष्ट आहेत.

नवीन कलाकाराच्या शोधात असणाऱ्या हृषिदाच्या सर्वच चित्रपटात दिसणारा आणखी एक गुणविशेष म्हणजे कलाकाराची अचूक, योग्य अशी निवड ( बिमल रॉय या गुरूचा ठसा ). कुंडलीतील 'शरारती' ग्रहाच्या दलबदलूपणावर जगणारा असा विचित्र भवानीशकर उत्पलदत्तने प्रसंगानुरूप घडणाऱ्या घटनांचं भान ठेवून साकार केला आहे. वैचित्र्यपूर्ण लकबी आणि वैशिष्ट्यपूर्ण संवादाच्या चढ-उताराच्या साह्याने पचावन्न–साठ वर्षांच्या या गृहस्थाची 'लग्न होणार' या कल्पनेमुळे प्रयत्न करून तथाकथित तारुण्य मिळवण्याची दृश्यं उठावदार आहेत. कोणत्याही भूमिकेत 'नॅचरलपणा' दाखविण्याच्या या उत्पलदत्तकडून अभिनय आणि

आवाजाची कायमच वरची पट्टी लावणाऱ्या डॉ. लागूनी काही शिकावं असा एक अनाहूत मल्ला या निमित्तानं द्यावासा वाटतो.

'रजनीगंधा' पासून एकाच ठरीव ठशाच्या सरळमार्गी, परंतु परिस्थितीच्या कचाटयात सापडलेल्या (खरं तर विनोदी प्रसंगांच्या) रामप्रसादची भूमिका अमोल पालेकरने नेहमीच्या शिताफीने आणि या भूमिकेची सवय झाल्याने मारून नेली आहे. मात्र शेवटच्या चार-पाच रिळात त्याचे दर्शन घडत नाही. (बहुधा 'बिझी स्टार' असल्यामुळे हृषिदाना डेट मिळालेल्या नसाव्या) स्वरूप संपत आणि किरण वैराळे या नवतारकाची चेहरेपट्टी चित्रपटाच्या चचल प्रकृतीशी जुळणारी असून मिळालेल्या भूमिकात्यामध्ये 'फिट्ट' बसल्या (का बसवल्या!) आहेत. सुमीच्या भूमिकेत किरण वैराळेचा वयपरत्वे असलेला उच्छृंखलपणा जाणवण्याइतपत 'गोड' आहे, तर कुसुमची भूमिका स्वरूप संपतने संयतपणे निभावून नेली आहे. ए. के. हंगल, दिना पाठक, ओमप्रकाश, सुंदर ही हृषिदाच्या कुटुंबातील सदस्य मंडळी नेहमीच्या थाटात परत 'रिपिटेटिव्ह परफॉर्मन्स' सह हजर आहेत.

मराठी चित्र-नाट्य सृष्टीवर गाजणाऱ्या मराठी नट-नटयाना नियमितपणे 'चान्स' देणाऱ्या हृषिदानी यात पद्मा चव्हाण आणि निळू फुलेंना वाव दिला आहे. रत्ना या नवटंकीच्या मालकिणीच्या भूमिकेतील पद्मा चव्हाणची कैफियत लाजवाब आहे, तर केवळ दोन मिनिटांसाठी दिसणारे निळू फुले एकाच 'क्लोज अप' मध्ये 'निळू शैली'चा पैलू दाखवून जातात.

'नरम-गरम' मध्ये एवढं सर्व असूनसुद्धा चित्रपट संपल्यानंतर आठवून हसावं असा प्रसंग आठवत नाही. कारण थिएटरमधील केवळ तीन तास तुमचं लक्ष विचलित होणार नाही एवढंच हृषिदाचं 'लक्ष्य असतं. 'सुखद अनुभव' एवढ्या शब्दावरच प्रतिक्रिया बोलकी होते आणि लक्षात राहतो उत्पल दत्त आणि 'स्टार–ओरिएंटेड' दुनियेत चित्रपट हे दिग्दर्शकाचं माध्यम ही संकल्पना जोपासणारा 'ट्रिटमेंट फिल्ममेकर' हृषिकेश मुखर्जी!! □

# चित्रपटाबाहेर...

## गुंडांच्या तावडीत 'फिल्मी गुंड!'

गेल्या काही दिवसात 'फिल्मी गुंडांना' अशा काही भीतिदायक घटनांना तोंड द्यावे लागले की ज्या प्रकारच्या घटना त्याच्या वास्तव जीवनात कधीच घडल्या नाहीत! मात्र अशा घटना 'रुपेरी पडद्यावर' घडविण्यात व अगदी जिवंतपणे साकार करण्यात त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. चित्रपटात असहाय नायक-नायिकाचा आपल्या साथीदारासह (हर्क्युलस, टायगर, राका, जग्गू वगैरे) खास फिल्मी पाठलाग करणाऱ्या अमजदखान, रणजीत, मॅकमोहन आणि शक्तीकपूर या 'खलनायकाना' काही दिवसापूर्वी खऱ्याखुऱ्या गुंडाच्या पाठलागाने सळो की पळो केले. फिल्मी गंडळीच्या बंगल्याची गर्दी असलेल्या जुहू-पार्ले परिसरात या घटनांमुळे भयग्रस्त वातावरण निर्माण झाले आहे.

या गुंडाचा पहिला बळी ठरला शोले फेम 'गब्बरसिंग'! शूटिंग रापवून अमजदखान आपल्या बंगल्याकडे परतत असताना अचानकपणे पाच गुंडानी अमजदची गाडी अडविली. हे पाचही गुंड सुरे, चाकू, लाठ्या व तलवारीसह (खास फिल्मी ड्रेपरी) सज्ज होते. त्यानी गाडीच्या खिडक्याच्या काचाचा पार चक्काचूर केला. ते अमजदवर हल्ला करणार एवढ्यात संधी साधून या 'बंबईका महाराजाने' धूम ठोकली! अमजद गुंडाच्या तावडीतून वाचला!

फिल्मी खेड्यात अथवा अड्ड्यावर आपली 'एंट्री' करून आजुबाजूच्या लोकांचा थरकाप उडविणाऱ्या या फिल्मी गुंडाला खऱ्या गुंडांपासून जीव वाचविण्यासाठी धूम ठोकावी लागली. या घटनेबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना अमजदखान म्हणतो, 'अशा प्रकारच्या घटनांचा सराव नसलेली एखादी अभिनेत्री असती तर काय झाले असते कोण जाणे!'

'गब्बरसिंग' पाठोपाठच त्याचा शोलेतील सहकारी 'सांबा' फेम मॅकमोहन या खलनायकाचाही गुंडानी पाठलाग केल्याची घटना घडली. मॅकमोहनचे घर जवळच असल्यामुळे तो सहीसलामत सुटला... मात्र 'रणजीत' या खलनायकाला लागोपाठ चार अपघातांना तोंड द्यावे लागले. शेवटच्या अपघातात तर तो जखमी झाला. अजूनही या अपघातामागचे 'रहस्य' गूढच आहे!

शक्तीकपूर या खलनायकाच्या घरी तर काहीनी मित्र असल्याचा बहाणा करून चोरी करण्याचा प्रयत्न केला; परंतु नोकराच्या 'संगावधनाने मुद्देमाल सोडून चोर पळाले! 'स्वामीदादा' या चित्रपटाचे शूटिंग संपवून शक्तीकपूर घरी आला तेव्हा 'कमाल है चोर के घर मे चोर' या फिल्मी डायलॉगशिवाय त्याला काही बोलणे अशक्यच होते.
*

## 'फुलनदेवी'च्या शोधात चित्रपटकार

एकाच वेळी वीस जणांना यमसदनास पाठविणारी, 'बदल्याची' आग धुमसत असणारी डाकूंची राणी फुलनदेवीने देशातील तसेच परदेशातील वृत्तपत्रांचे मथळे अडवले. हातात स्टेनगन आणि जीनची पँट घालणारी ही फुलनदेवी आज उत्तर प्रदेशातील पोलिसांना सतावत आहे. पोलीस, सरकार आणि चंबळखोऱ्यातील जनता या फुलनदेवीमुळे त्रस्त आहे, तर आमच्या चित्रपटकाराना एक नवीच 'चुनौती' या प्रकारामुळे मिळाली आहे!

'मेरा गाव मेरा देश', 'कच्चे धागे' इत्यादी डाकूपट काढणारे राज खोसला आता फुलनदेवीकडे आकर्षित झाले आहेत. त्यानी फुलनदेवीवर चित्रपट काढण्याचे ठरविले आहे. उत्तर प्रदेशातील पोलीस फुलनदेवीच्या शोधात आहेत तर राज खोसला फुलनदेवीची भूमिका करू शकेल अशा लायक अभिनेत्रीच्या शोधात आहेत.

डाकूच्या जीवनाचा गौरव करणारे, त्याच्या 'साहसी' आणि 'बेडर' जीवनाचे कोडकौतुक आमच्या चित्रपट–दिग्दर्शकांनी नेहमीच केले आहे. 'मदर इंडिया', 'गंगा-जमना', 'मुझे जीने दो' पासून अगदी अलीकडच्या 'शोले' पर्यंत नको ते आकर्षण निर्माण होईल, त्याचे अनुकरण करावेसे वाटेल अशा पद्धतीनेच या डाकूच्या जीवनाचे चित्रण झाले आहे आणि फुलनदेवीच्या निमित्ताने प्रसृत झालेल्या माहितीमुळेही नेमके हेच पुन्हा घडले आहे.

आग्रा, कानपूर या ठिकाणी डाकूविरोधी मोहिमेचे सरकारी अधिकारी मोहनदास मेनन यांनी एका साप्ताहिकाला मुलाखत देताना जे म्हटले आहे ते इथे नोंद करण्यासारखे आहे. पोलीस तपासणीत एक डाकू मेनन यांना म्हणाला की, 'नेता कहते हैं तो अब 'शोले' जैसे बदला लेंगे!'

मेनन याचा अनुभव बराच बोलका आहे.
□

# निपाणी गोळीबार : पृष्ठ ३ वरून

आता आपलं आपणच सारं मिळवलं पाहिजे.

ज्या गावाने एका माणसाचा आंदोलनातल्या गोळीबारात झालेला भीषण मृत्यू पाहिला होता, त्याचं घर निराधार झालेलं पाहिलं होतं त्या गावातलाही शेतकरी ठामपणाने पुन्हा आपल्याच बळावर उभं राहण्याची भाषा करतो, हे थोडं अनपेक्षित होतं, धक्कादायकही होत. भारतातला हा 'नगा, भूखा हिंदुस्थान' कोणी जागा केला, कसा जागा केला, त्याच्यात हे बळ, हा आत्मविश्वास कसा फुलला ? *प्रत्येक प्रश्नाचं असं तर्कशुद्ध उत्तर काढण्याचा हट्ट धरायचाच असतो का ?*

या शेतकऱ्याशी बोलताना आणखी एक-दोन गोष्टी विशेषत्वानं जाणवल्या. एक म्हणजे सहा एप्रिलच्या घटनेमुळे आंदोलकामध्ये भीतीच, दहशतीचं वातावरण निर्माण झाल्याच्या बातम्या येत होत्या; पण प्रत्यक्षात मात्र तसं फारस कुठं जाणवलं नाही. उलट, बहुतेकांच्या मनात 'टिकून राहण्याची' भावनाच प्रखर होती. फार गाजावाजा करायचा नाही, पण आपला मुद्दाही सोडायचा नाही, असा समंजस संयम या अडाणी, अशिक्षित शेतकऱ्याच्या वृत्तीमध्ये होता.

दुसरं म्हणजे पोलिसांच्या निर्दयी कृत्याबद्दल शेतकऱ्यांच्या मनात संताप जरूर होता; पण त्याची जागा अजून आंधळ्या द्वेषानं किंवा सूडबुद्धीनं घतली नव्हती. अन्यथा, संधी साधून पोलिसावर हल्ले चढवणं त्याना अशक्य नाही. कारण 'गनिमी काव्यानं युद्ध' असं गोंडस नाव देऊन आंदोलकानी हे प्रकार यापूर्वी यशस्वीपणे केले आहेत. शेवटी पोलिसाच्या संख्येला कुठं तरी मर्यादा पडते, कोणत्याही ग्रामीण भागातल्या सर्व प्रकारच्या वाटा त्याना माहीत असतातच असं नाही. याचा फायदा आंदोलक सहज घेऊ शकतात. निपाणी परिसरात आज तरी हे दृश्य दिसत नाही, पण उद्या ते होणारच नाही, याचीही हमी देणं कठीण आहे कारण संयमालाही अखेर मर्यादा असतात !

तिसरं म्हणजे, श्री. शरद जोशी यांच्या आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीबद्दल आक्षेप घेताना काही टीकाकार असं म्हणतात की, अजूनही श्री. जोशींनी आपल्या अनुपस्थितीत काम पुढं चालू ठेवण्यासाठी दुसऱ्या. पातळीवरची फळी नीट बांधलेली नाही. काही अंशी या आक्षेपात तथ्यही आहे; पण निपाणीच्या परिसरात प्रा. सुभाष जोशींनी याबाबतीत चांगलं संघटन उभं केलं आहे. आंदोलन तितक्याच तीव्रतेनं पुढं चालू ठेवण्याचं कसब या फळीजवळ कदाचित नसेल, पण किमानपक्षी खेडोपाड्यात जाऊन आंदोलकाचं मनोधैर्य कायम ठेवण्याचं काम ही मंडळी आज चोखपणे पार पाडत आहेत. शिवाय कृति समितीचे काही भूमिगत असलेले सदस्यही त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करत आहेत.

इथं एक गंमतशीर भाग नोंदवण्यासारखा आहे. स्वत: प्रा. जोशी व त्यांच्या संघटनेतले काही कार्यकर्ते निपाणीच्या देवीचंद कॉलेजमध्ये प्राध्यापक, क्लार्क इत्यादी पदांवर काम करतात. निपाणीतला एक व्यापारी देवीचंद शहा याने तंबाखूच्या व्यापारातला पैसा या कॉलेजला देणगी म्हणून दिला आणि त्याच्या बदल्यात स्वत:चं नाव कॉलेजला द्यायला लावलं. त्यामुळं शेटजींच्या कॉलेजमध्येच नोकरी करून शेटजींच्याच तंबाखू कारखान्यात ही मंडळी स्त्री-कामगारांचा संप, सत्याग्रह, मोर्चे, घेराओ घडवून आणतात. (यापुढील भाग डावी आघाडीवाल्यांनी स्वप्नात रंगवायला हरकत नाही.)

निपाणी व परिसरातील सात – आठ तासाच्या वास्तव्यात सहा एप्रिलच्या घटनेनंतर निर्माण झालेलं वातावरण थोडं-फार प्रत्यक्ष पाहता आलं, अनुभवता आलं, पण सहा एप्रिल व त्याच्याआधीच्या एक-दोन दिवसात असं काय घडलं की ज्यामुळं एवढं अमानुष हत्याकांड व्हावं, याचं एक कोडं मनात होतं; शिवाय आंदोलन पुढं कोणतं वळण घेईल या संदर्भातही आंदोलनाचं पहिल्यापासून निरीक्षण करणाऱ्याकडून, आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांकडून काही अंदाज व्यक्त होतात का, याविषयीही कुतूहल होतं म्हणून कोल्हापूरच्या 'सकाळ'चे संपादक सदा डुंबरे, उपसंपादक विजयकांत साळुंखे आणि किशोर कुलकर्णी, तसंच आंदोलनातल्या काही भूमिगत कार्यकर्त्यांशी चर्चा केली. या चर्चेतून व्यक्त झालेली काही मतं इथं मुद्दाम देतो.

काहींच्या मते, सहा एप्रिलला पोलिसांनी जी कृती केली ती खरं म्हणजे ज्या दिवशी आंदोलन सुरू होणार होतं, त्याच दिवशी म्हणजे चौदा मार्चलाच घडणार होती. कारण पहिल्याच दिवशी आंदोलनाचा बोजवारा उडवण्याचा बेत होता, पण आंदोलनाबाबत कळवण्यात *आलेला अंदाज आणि प्रत्यक्ष परिस्थती यामध्ये* फारच फरक पडला. त्यामुळे आयत्या वेळी ही योजना रद्द करण्यात आली

त्यानंतर 'रस्ता रोको' आंदोलन सुरू झालं. हळूहळू वातावरण तापत हेतं. 'आंदोलननगरा'त सहभागी होणाऱ्या आंदोलकाची संख्या वाढतच होती. शासनावर एक प्रकारचं दडपण येऊ लागलं होतं. हे दडपण तीन प्रकारचं होत. एक, प्रत्यक्ष आंदोलनाची ताकद दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळं आलेलं पडपण, दोन, याचा फायदा राजकारणातला आपला विरोधी गट घेईल व आपल्यावर बाजी मारील या भीतीपोटी राज्यकर्त्यांवर आलेलं दडपण आणि तीन, तंबाखू-उत्पादकाची ताकद एवढी एकवटल्याचं पाहून हादरलेल्या व्यापाऱ्याकडून पोलिसावर येणारं 'दाम-दंडा'चं दडपण !

शेवटी चार एप्रिलला पोलिसांनी व्यापाऱ्यांना असं आश्वासन दिलं की, येत्या ३६ तासात पुणे-बंगलोर महामार्गावरील वाहतूक पूर्ववत सुरू होईल.

हे आश्वासन पूर्ण करण्यासाठी आंदोलकाविरुद्ध काही तरी कठोर उपाय योजावे लागणार,याचा पोलीस खात्याला अंदाज आला असावा. त्यामुळं एक-दोन दिवसातच त्यांनी 'रस्ता रोको' आंदोलनामुळं निपाणी परिसरात झालेली महागाई, नागरिकांची गैरसोय, व्यापारी-वर्गाला वाटणारी असुरक्षितता, बँकावरचा नियोजित मोर्चा व घेराओमुळं गावातल्या तेरा बँकांच्या व्यवस्थापकाना वाटणारी चिंता अशा विविध कारणांखाली विविध व्यक्तींकडून तक्रारी लिहून घेतल्या. सहा एप्रिलच्या कृतीचं समर्थन करण्यासाठी आता या तक्रारींचा वापर करण्यात येईल, असा अंदाज आहे.

शांतपणे स्वत:ला अटक करून घेणाऱ्या निष्पाप, निरुपद्रवी शेतकऱ्याना गोळ्या घातल्या जातात आणि व्यापाऱ्याच्या बगलबच्चानी दगडफेक केली तरी त्यांनाच दुखापत कशी होणार नाही, याची काळजी वाहणाऱ्या पोलीस खात्याकडून आणखी काय अपेक्षा असणार आहे ? या दोन घटनामधली अंतर्गत विसंगती जरी लक्षात घेतली तरी या सबंध प्रकारामागे निपाणीच्या परिसरातला हादरलेला व त्यामुळं बिथरलेला उन्मत्त व्यापारी वर्गच आहे,हे आवर्जून सांगण्याची गरज उरणार नाही.

या संदर्भात आणखीही एक घटना पुराव्यादाखल देता येण्यासारखी आहे. प्रा. सुभाष जोशी यांच्याबरोबर काम करणाऱ्या भाई धारिया यांची मोटार पोलिसांनी रिव्हॉल्व्हर रोखून अडवली. गाडी पोलीस स्टेशनकडे वळवण्यास फर्मावलं. तिथं डॉ. बाबा आढाव,

प्रा अच्युत माने, कागलचे सभापती शामराव देशाई इत्यादी माणसं गाडीतून उतरून पोलीस चौकीमध्ये जात होती. भाई सर्वांच्या शेवटी गाडीतून उतरले तोपर्यंत इतर माणसं आतमध्ये गेली होती. त्यामुळं भाई आणि त्यांचा ड्रायव्हर एकटेच राहिले होते. एवढ्यात 'त्यांना हाणा' अशा शब्दात तिथल्या ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्यानं हुकूम दिला आणि साठी ओलांडलेल्या भाईंवर पोलीस तुटून पडले! डॉ. बाबा आढाव या संपूर्ण घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत.

हा राग कुणाचा? पोलिसांचा? शासनाचा? उत्तर एवढं सोपं नाही. यात सर्वांत दुर्दैवाची बाब ही आहे की, प्रतिपक्षाला नेस्तनाबत करायला आता खाजगी मारेकऱ्यांची तरतूद करावी लागत नाही. तुमच्याकडं गडगंज संपत्ती असेल तर तुम्ही या देशातली अंतर्गत सुरक्षा व्यवस्था देखील स्वतःच्या आधिपत्याखाली आणू शकता-केवळ एका वाळक्या भाकरीच्या मोबदल्यात,एका चिरगुटाच्या मोबदल्यात, एका नाण्याच्या मोबदल्यात, तुमच्याकडं जास्त कसब असेल तर नाण्याच्या नुसत्या मंजूळ ध्वनीच्या मोबदल्यात तुम्ही हे करू शकता! आणि त्याबद्दल पूर्णतः नामानिराळे राहू शकता. कारण हे खून नसतातच. 'निपाणी येथे गेले बावीस दिवस चालू असलेल्या 'रस्ता रोको' आंदोलनानं आज अचानक हिंस्र वळण घेतल्यानं पोलिसाना गोळीबार करावा लागला. त्यामध्ये नऊ जण मरण पावल्याची वृत्तसंस्थेची बातमी आहे.' असं अधिकृत गोंडस रूप त्या घटनेला दिलं जातं. खाकी वर्दीआडून मारलेल्या गोळ्यानी अचूक वेध घेतलेला असतो!

आजच्या परिस्थितीत आणखी एक प्रश्नचिन्ह अनेकांपुढं उभं आहे ते म्हणजे, आता पुढं काय? निपाणीच्या परिसरातल्या शेतकऱ्याना मात्र हा प्रश्न फारसा पडलेला दिसत नाही. आंदोलन असंच पुढं चालू ठेवायचं, जास्त नेटानं लढवायचं अशी खूणगाठ त्यानी मनाशी बांधलेली दिसते. अर्थात लढवायचं हे ठीक आहे; पण कसं याबद्दल मात्र ते विशेष काही बोलू शकत नाहीत त्यांची सारी भिस्त आणि विश्वास प्रा सुभाष जोशी आणि शरद जोशी यांच्यावर आहे. त्यामुळं आजही सैन्य लढायला तयार आहे, गरज आहे फक्त त्याच्या हातात शस्त्र देण्याची, योग्य रणांगणावर प्रतिपक्षाशी त्याची गाठ घालून देण्याची!

अर्थात ही सर्व विशिष्ट घटनेतून निर्माण झालेली स्थानिक पातळीवरची चर्चा आहे; पण एकूणच अशा प्रकारच्या शेतकरी आंदोलनांची व्याप्ती यापुढं सतत वाढतीच राहील की त्याला वेळीच आवर घालता येईल, हा खरा मूलभूत प्रश्न आहे माझ्यासारखा सामान्य माणूस अशा स्वरूपाच्या प्रश्नाचं उत्तर देऊच शकणार नाही; पण 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून विरोधकानीही नकळतपणे गौरवलेल्या लोकमान्य टिळकांनी याबद्दल सुमारे नव्वद वर्षांपूर्वीच आपल्या अग्रलेखांमध्ये लिहून ठेवले आहे.

या अग्रलेखांची थोडी पार्श्वभूमी अशीः १८९०–९२ च्या सुमारास भारतातला शेतकरी आता आहे त्यापेक्षाही किती तरी खालच्या गर्तेत खितपत पडला होता. तेव्हा १८९२ च्या मार्चमध्ये राष्ट्रीय सभेचे चिटणीस ह्यूमसाहेब यानी दोन पत्रके प्रसिद्ध केली होती. या पत्रकामध्ये त्यांनी असं म्हटलं होतं की, 'हल्ली शेतकऱ्यांची जी स्थिती आहे ती तशीच कायम राहिल्यास लवकरच ते बंड करण्यास उद्युक्त होतील व एकदा जागोजाग अशा रीतीने दंगेधोपे होऊ लागले म्हणजे त्यात सरकार, जमीनदार, शिकलेले गृहस्थ वगैरे काही एक भेदाभेद न होता सर्वजण सारखेच बळी पडतील!' तेव्हा याबाबत कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी व सरकारने वेळीच योग्य उपाय करण्यास प्रवृत्त व्हावं, असं आवाहनही ह्यूमसाहेबानी या पत्रकात केलं होतं. त्यावरून बराच गदारोळ माजला. ह्यूमसाहेब अशा पत्रकाद्वारा सामान्य लोकांना बंड करण्याच्या चिथावण्या देतात, म्हणून त्यांना फाशी द्यावं किंवा गोळी घालून मारावं, अशीही मागणी काही अतिरेक्यानी त्या वेळी केली होती.

तेव्हा या संबंध विषयाव्रर लोकमान्य टिळकानी सहा डिसेंबर व १३ डिसेंबर १८९२ च्या 'केसरी'च्या अंकामध्ये लागोपाठ दोन अग्रलेख लिहिले. अग्रलेखाचं शीर्षकच आहे– 'हिंदुस्थानातील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावे लागेल काय?' देशातल्या शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचा आढावा घेऊन लोकमान्य लिहितात–

'शेतकीची निष्कृष्टावस्था म्हणजे आमच्यासारख्यास साऱ्या राष्ट्राचीच निष्कृष्टावस्था होय. आम्ही इंग्रज सरकारच्या चातुर्यास, वैभवास आणि कर्तबगारीस दुवा देऊन त्याचे गुण गाऊ व त्याचेच राज्य चिरकाल हिंदुस्थानावर राहो अशी इच्छा बाळगू; पण दुपारची वेळ कठीण आहे! राष्ट्रातील लोकास पुरेइतके धान्य देशातल्यादेशात उत्पन्न होण्याची पंचाईत पडू लागली व इतर उद्योगधंदे करून त्यात उत्पन्न झालेला माल परदेशी नेऊन त्याचा मोबदला त्या देशातून इकडे धान्य आणण्याची सोयही नाहीशी झाली म्हणजे वेळ कठीण आहे! राष्ट्रातील हजारो अथवा कोटयवधी शेतकरी केवळ इंग्रज सरकारचे राज्य सुख-शांततेचे आहे म्हणून दुष्काळ आल्याबरोबर सुखाने मरण्यास तयार होतील असे नाही अथवा निरुपयोगी झालेल्या घोडयाप्रमाणे सरकारचे हातूनही त्यास गोळी घालून संसारयातनेतून मुक्त करण्याचे धारिष्ट व्हावयाचे नाही! मग हे लोक करणार काय? एकदा हे भिकार देशावर अनावर सुटले म्हणजे मग लक्षावधी बागनेटानीही त्याचा प्रतिकार होणे अशक्य आहे जिकडे तिकडे एकच कल्लोळ होईल आणि या झंझावातापुढे लहान मोठी सर्व झाडे ह्यूमसाहेबांनी सर्क्युलरात लिहिल्याप्रमाणे जमीनदोस्त होतील!' ('केसरी' ६ डिसेंबर, १८९२)

लोकमान्य आपल्या १३ डिसेंबरच्या अंकातील अग्रलेखात या विषयाच्या संदर्भात पुढे लिहितात–

'...शेतकरीलोक जोपर्यंत अज्ञान आहेत, तोपर्यंत काही एक भीती नाही; पण दारिद्र्य व ज्ञान ही एकत्र झाली म्हणजे लागलीच त्याची चकमक झडून त्यापासून ठिणगी पडते, असे मि. ब्लंटसाहेबांनी म्हटले आहे. हे त्यांचे म्हणणे अगदी यथार्थ आहे व सरकारने नाही तर मध्यम स्थितीतील लोकानी तरी शेतकऱ्याची ही स्थिती सुधारण्याचे योग्य उपाय वेळीच अवश्यमेव केले पाहिजेत.

'...इंग्रजी राज्यावर जर पुढे-मागे काही संकट येणार असले तर उत्तरेकडून अगर वायव्येकडून येणार नाही. असली संकटे कितीही आली तरी ती निवारण करण्याइतके आपल्या सरकारचे सामर्थ्य आहे; पण सर्व देशातील प्रजाच अन्नास महाग होऊन दंगा करण्यास प्रवृत्त झाली म्हणजे मात्र वेळ कठीण येणार आहे! ती आल्यावर मग काही इलाज चालणार नाही, याकरिता आत्ताच सावध व्हावे हे बरे!'

टिळकांच्या दोन विस्तृत अग्रलेखामधल्या या काही अवतरणांमधूनही शेतकरी-आंदोलनाच्या भविष्यकालीन प्रवाहाचा थोडासा अंदाज बांधता येईल एखादी नदी कोणत्या सागराला जाऊन मिळणार आहे हे जसं तिच्या उगमापाशीच अलिखितपणे ठरलेलं असतं तसं या आंदोलनाचं आहे. इथं उगम तर झालेलाच आहे, विलिनीकरणाचा बिंदूही ठरला आहे अनिश्चित आहे ते फक्त या दोहोमधले अंतर आणि दिशा! हे अंतर कसं कापलं जातं ते मात्र त्या त्या वेळी साक्षी राहून पाहायचीच बाब आहे. अन्यथा, एका प्रतिभाशाली पुरुषानं नव्वद वर्षांपूर्वीच स्वच्छपणे मांडलेल्या विचाराच्या पहिल्याच वळणावर आपण आजही पुन्हा थबकू आणि प्रश्न करू– 'हिंदुस्थानातील शेतकरी लोकास खरोखरच बंड करावं लागेल काय?' □